सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ३० नोव्हेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक २४ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |


ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### आठवडाअखेरीस बाजार तेजीसह बंद



**मुंबई :** आठवड्याच्या शेवटच्या दिवशी शेअर बाजारात तेजी होती. मुंबई बाजारातील निर्देशांक ६८० अंकांनी वाढून ७९,७२५ वर बंद झाला, तर निफ्टीत ०.८५ टक्क्यांची वाढ होऊन तो २४,११८ वर बंद झाला. जागतिक बाजारातील सकारात्मक वातावरणामुळे देशांतर्गत बाजार तेजीत राहिले. भारती एअरटेलचा शेअर्स सर्वाधिक तेजीत होता. त्यापाठोपाठ सन फार्म, महिंद्रा, अल्ट्राटेक सिमेंट, अदानी पोर्ट्स, रिलायन्स इंडस्ट्रीज, लार्सन अँण्ड टूब्रो, मारुती सुझुकी आदी शेअर्सही वाढले होते. या तेजीमुळे दिवसभरात बाजार भांडवल वाढून ४४६.४७ लाख कोटी रुपये झाले. म्हणजेच बाजार भांडवलात तब्बल ३.४९ लाख कोटींची भर पडली.

# सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला?

## दोन दिवसांत मिळणार नवा मुख्यमंत्री | सत्तेच्या पेचात एकनाथ शिंदे गावाला

**नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासोबत गुरुवारी रात्री सकारात्मक चर्चा झाली. काळजी करू नका, महाराष्ट्राला येत्या दोन दिवसांत नवा मुख्यमंत्री मिळालेला असेल, असे संकेत काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी दिले. राज्यात सत्तेचा पेच कायम असतानाच एकनाथ शिंदे त्यांच्या दरे गावाला दोन दिवस मुक्कामासाठी गेले. दरम्यान, नवीन सरकारचा शपथविधी येत्या ५ डिसेंबर रोजी होणार असल्याची माहिती उच्चस्तरीय सूत्रांनी दिली.

आज सकाळी मुंबईकडे रवाना होण्यापूर्वी पत्रकारांशी बोलताना शिंदे म्हणाले की, मुंबईत महायुतीची आणखी एक बैठक होणार आहे.



त्यानंतर मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेण्यात येईल. गुरुवारी रात्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी अमित शाह तसेच जे. पी. नड्डा यांच्यासोबत महाराष्ट्रातील सत्ता स्थापन करण्याच्या मुद्यावर सुमारे दोन तास चर्चा केली. यानंतर फडणवीस आणि अजित पवार मुंबईकडे रवाना झाले होते. तर, शिंदे आज सकाळी मुंबईकडे निघाले. तत्पूर्वी ते पत्रकारांशी बोलत होते. मुंबईत चर्चेच्या एक ते दोन फेऱ्या होतील. त्यात मुख्यमंत्रिपदाचा अंतिम निर्णय घेतला जाईल आणि याबाबतची माहिती तुम्हाला लगेच कळविण्यात येईल, असे शिंदे यांनी सांगितले.

**माझा अडथळा राहणार नाही**

सरकार स्थापन करण्याच्या प्रक्रियेत माझा कुठलाही अडथळा असणार नाही. भाजपाचे राष्ट्रीय नेतृत्व जो काही निर्णय घेतील, तो मला मान्य असेल, असे मी आधीच जाहीर केले आहे. राज्यातील महिलांनी मला 'लाडका भाऊ' म्हणून जो सन्मान दिला आहे, तो माझ्यासाठी कोणत्याही पदापेक्षा फार मोठा आहे, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

**दोन दिवस मुक्काम**

दिल्लीहून मुंबईत परत आल्यानंतर शिंदे थेट सातारा जिल्ह्यातील त्यांच्या गावाकडे रवाना झाले. त्यांचा दोन दिवस मुक्काम असल्याने महायुतीची बैठक रविवारीच होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# शिवशाहीला भीषण अपघात; ११ प्रवाशांचा मृत्यू

## • गोंदिया जिल्ह्यातील घटना २९ जखमी, तिघांची प्रकृती चिंताजनक

**गोंदिया, २९ नोव्हेंबर**

दुचाकी चालकाला वाचविताना शिवशाही बस अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला उलटली. वेग अधिक असल्याने बस काही अंतर जमिनीला घासत गेली. यात ११ प्रवाशांचा मृत्यू तर २९ प्रवासी जखमी झाले. यातील तिघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. मृतांमध्ये ६ महिला व ५ पुरुषांचा समावेश आहे. हा अपघात गोंदिया-कोहमारा महामार्गावर सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा ते खजरीदरम्यान शुक्रवारी दुपारी १२.३० वाजता घडला.

भंडारा आगाराची शिवशाही बस ४० प्रवासी घेऊन गोंदियाला जात होती. घटनास्थळावरील नाल्याच्या वळणावर दुचाकीस्वाराला



वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याच्या कडेला असलेल्या कठड्याला धडकून उलटली. वेग अधिक असल्याने बस बरेच अंतर घासत गेली. मृतांमध्ये स्मिता विक्की सूर्यवंशी, मंगला राजेश लांजेवार, राजेश देवराम लांजेवार , कल्पना रविशंकर वानखेडे, रामचंद्र कनोजे, अंजिरा रामचंद्र कनोजे, आरिफा अजहर सय्यद, अजहर अली सय्यद, नयना विशाल मिटकर यांचा समावेश आहे. चालक प्रणय रायपूरकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नितीन मते असे वाहकाचे नाव आहे. पोलिस पथक, रुग्णवाहिका व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून नागरिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात हलविले. घटनास्थळी नागरिकांची प्रचंड गर्दी झाली होती.

**अपघातातील जखमींची नावे**

नैतिक प्रकाश चौधरी (८), श्रीकृष्ण रामदास उके, शारदा अशोक चव्हाण, स्वप्निल सुभाष हेमणे, विद्या प्रमोद मडेकरी, भार्गवी राजेश कडू, धृविका स्वप्निल हेमणे, पल्लवी प्रकाश चौधरी, लक्ष्मी धनराज भाजीपाले, टिना यशवंत दिघे यांचा जखमींमध्ये समावेश आहे.










सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## राज्यस्तरीय मोफत दिव्यांग शिबीर १६ डिसेंबरला

### खराडीतील ढोले पाटील महाविद्यालयात आयोजन

### सरसंघचालक डॉ. मोहन भागवत राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २९ नोव्हेंबर-**

भारत विकास परिषदेच्या विकलांग केंद्राच्या वतीने दिव्यांगांना अत्याधुनिक कृत्रिम मोड्युलर पाय आणि हात व कॅलिपर मोफत बसविण्यासाठी राज्यस्तरीय दिव्यांग शिबीर पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे.

सोमवार दिनांक १६ डिसेंबर रोजी खराडी येथील ढोले पाटील कॉलेज, इऑन आयटीपार्क जवळ हे शिबीर पार पडेल. संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष दत्ता चितळे यांनी दिली.

ते पुढे म्हणाले, भारत विकास परिषद ही सेवा व संस्कार क्षेत्रात निस्वार्थपणे काम करणारी राष्ट्रव्यापी संघटना आहे. दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविणे हा प्रमुख राष्ट्रव्यापी सेवा प्रकल्प आहे. भारतातील १३ विकलांग केंद्रांपैकी पुण्यात एक केंद्र कार्यरत असून, कायमस्वरूपी असलेले हे केंद्र गेल्या २५ वर्षापासून अखंड कार्यरत आहे. कोणत्याही सरकारी मदती शिवाय समाजाच्या आधारावर दरवर्षी सुमारे पाच हजार दिव्यांगांना याचा लाभ होत आहे. विश्वस्त व केंद्र प्रमुख विनय खटावकर यांनी यावेळी शिबिराच्या आयोजनाबाबत माहिती दिली. गेल्या ५ वर्षापासून परंपरागत जयपूर फूट ऐवजी पन्नास हजार रुपयांचा अत्याधुनिक कृत्रिम मोड्युलर पाय आणि हात व पोलिओ कॅलिपर मोफत बसविण्यात येतात. पुण्यातील या शिबिरात एक हजार दिव्यांगांचे उद्दिष्ट आहे. लाभार्थीना कोणतेही आर्थिक निकष नसून राज्यातील सर्व होतकरू दिव्यांग यात सहभागी होऊ शकतात. मोफत दिव्यांग शिबिराचा लाभ घेण्यासाठी दिव्यांगांनी स्वतः पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी संपर्क साठे ९१७५५५८३५६, अनिकेत ९४२२७९७१०६, राजेंद्र ८५५१०६४२०४. सोमवारी १६ डिसेंबरला दुपारी साडेतीन वाजता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची दिव्यांग शिबिरास भेट आणि रौप्य महोत्सवी वर्षाच्या समारोपाप्रसंगी मार्गदर्शन होईल. सर्व सेवा भावी नागरिकांनी या जाहीर कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले. या शिबिरासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.,ब्रिज नेक्स्ट, ऑटो हँगर, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, वात्सल्य ट्रस्ट, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज यांचा आर्थिक सहयोग लाभलेला आहे. अधिक माहितीसाठी विश्वस्त आणि विकलांग केंद्रप्रमुख विनय खटावकर ९३२६७३०६६६ यांच्याशी संपर्क साधावा.


# सकाळी वाजणाऱ्या भोंग्याचे सेल आता संपले

### ईव्हीएमवर आरोप म्हणजे रडीचा डाव

### श्रीकांत भारतीयांचा राऊतांना टोला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ नोव्हेंबर-**

निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर आता ईव्हीएम वर आरोप करणे हा रडीचा डाव असल्याचे मत भाजप नेते श्रीकांत भारतीय यांनी व्यक्त केले आहे. दुर्दैव म्हणजे राज्यातील शीर्षस्थ नेते शरद पवार यांनीही या सुरात सूर मिसळल्याचे भारतीय म्हणाले. राज्यात भाजप व महायुतीला मिळालेल्या विजयानंतर आज श्रीकांत भारतीयांनी विठ्ठल मंदिरात येऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले. यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. यावेळी त्यांनी संजय राऊतांवर जोरदार हल्लाबोल केला.



रोज सकाळी वाजणाऱ्या भोंग्याचे सेल आता संपले असल्याचा टोला देखील त्यांनी संजय राऊतांना लगावला. संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांनी ईव्हीएम वर आरोप केले असते तर समजू शकलो असतो मात्र राज्यातील ज्येष्ठ आणि शीर्षस्थ नेते म्हणून ज्यांच्याकडे पाहिलं जातं ते शरद पवार देखील यात सामील झाले हे दुर्दैव असल्याचे भारती यांनी सांगितले. राज्यातील जनतेने एवढा मोठा पराभव केल्याने हे रडीचे डाव खेळले जात आहेत असा टोला भारती यांनी लगावला.

राज्यात मिळालेलं यश हे एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादा पवार यांच्या सामूहिक नेतृत्वाचे यश असल्याचे ते म्हणाले. राज्यात आता भाजपचं सरकार येत असून मुख्यमंत्री ही भाजपचा होणार आहे. मनोज जरांगे यांचा राजकीय फायदा घेण्यासाठी जे जे लोक भेटले त्या सर्वांना भाजप कार्यकर्ते आणि महाराष्ट्रातल्या ९ कोटी जनतेने चांगला धडा शिकवल्याचा टोलाही भारती यांनी लगावला.

#### आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील विरोधात तक्रार

रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्याबाबत भाजप जिल्हाध्यक्षांनी पक्षाध्यक्षांकडे लेखी तक्रार केली आहे. उमेदवार राम सातपुते यांनीही याबाबत तक्रार केल्याने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावर गंभीरपणे कारवाई करतील असा इशारा भारती यांनी दिला आहे. जे जे चुकीचं वागलेत त्या सर्वांना त्यांची जागा दाखवली जाईल असेही त्यांनी सांगितले.

## जयहिंद फुडबँक सूरत शाखेच्यावतीने गुजरात येथे महारक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**



जय हिंद फूड बँक शाखा सुरत या ठिकाणी जय हिंद फूड बँक आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान, अवयव दान व मेडिकल चेक अप, नेत्र रोग तपासणी महासेवा या उपक्रमात एकूण ४७१ जणांनी रक्तदान केले.१६१ जणांनी नेत्र तपासणी, १४० जणांनी फुल बॉडी चेक अप, ५१ जणांनी अवयव दान नोंदणी केली आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज याच्या पुतळ्यास पुष्पहार घालून व दिपप्रज्वलन करण्यात आले. जयहिंद फुडबँक शाखा सुरत च्या माध्यमातून दर गुरुवारी एक अनोखी मोहीम राबवली जाते या मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळ्याच्या अवतीभवती परिसर पूर्ण स्वच्छ करून शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून छ. शिवाजी महाराजांची आरती केली जाते व तिथे त्यांना मानवंदना व मानाचा मुजरा सूरत शाखा च्या माध्यमातून दर गुरुवारी केला जातो.जय हिंद फूट बँक सुरत शाखा च्या माध्यमातून २४ नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आला होता या मार्गदर्शन शिबिरामध्ये जयहिंद फुडबँकेचे संस्थापक सतिश सुरेश तमशेट्टी यांच्या उपस्थितीत हा शिबिर ठेवण्यात आला.या उपक्रमात सुरत शहरातील व तसेच इतर शहरातील युवकां कडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जयहिंद फुडबँक शाखा सुरत कडून दर गुरूवारी चालणाऱ्या मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून मानवंदना करण्यात येत असते व तसेच या रक्तदान शिबिर निमित्त महाराजांच्या पुतळ्यास या पुष्पहार व पुजा संस्थेचे संस्थापक सतिश तमशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.

श्रीराम चौक, संजय नगर, लिंबायात,सुरत. या ठिकाणी हा उपक्रम घेण्यात आला. या वेळी गुजरात राज्य प्रमुख ॲड. जयेश चांदेकर यांच्या नेतृत्वाखाली, महिला सदस्य ॲड. वैभविबेन निमजे, अमिताबेन दलाल, श्वेताबेन झोडे, उपस्थित होते, उपक्रम घेण्यात आले तसेच जय हिंद फूड बँक शाखा सुरत सर्व पदाधिकारी भूमेशभाई दलाल, विनोदभाई बोकडे, शुभम भाई नीमजे, गंगाधर जुमडे, तरुण भाई निनावे, विनोद भाई धकाते, शालीक भाई झोडे, अरुण भाई मराठे, पंकज भाई झोडे, प्रकाश भाई दलाल, विपुल पुल्ली व कार्यकर्ते सह अनेक मित्र मंडळ उपस्थित.

## निवडणुका निर्विघ्नपणे पार पाडण्यात मनुष्यबळासह तंत्रज्ञानाचा वापर

### निवडणूक आयोगाकडून पोलिसांचे कौतुक

### पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि २९ नोव्हेंबर -**

लोकसभेनंतर पाटोपाट घेण्यात आलेल्या विधानसभा निवडणुका मनुष्यबळासह तंत्रज्ञानाचा वापर केल्याने शांततेत आणि कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण न होता पार पडल्याची माहिती पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली. दरम्यान निवडणूक निर्विघ्नपणे पार पाडल्याने निवडणुक आयोगाकडून ग्रामीण पोलिसांचे कौंतुक झाले. पोलीस मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली.याप्रसंगी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर हे उपस्थित होते.



पुढे बोलताना अधीक्षक कुलकर्णी म्हणाले, जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकांच्या संदर्भात येणा-या संभाव्य अडचणींचा विचार करून कार्यपध्दतीत बदल केला. ग्रामीण पोलीस दल आणि बाहेरून मागविण्यात आलेल्या जवानांच्या बळावर बंदोबस्ताचा शिवधनुष्य उचलला. दरम्यान, निवडणुकांपूर्वी रेकॉर्डवरील गुन्हेगारांची यादी तयार केली. टू प्लस गुन्हे असलेल्या गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यात आले. त्याचबरोबर प्रतिबंधक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या, त्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात कारवाई झाली. गुन्हेगारांच्या भागात लक्ष केंद्रीत करून केलेली कारवाई प्रभावी ठरली. संवेदनशील भागावर ड्रोनच्या माध्यमातून नजर ठेवण्यात आली. गुन्हेगारांच्या घराची तपासणी नित्यपणे सुरू ठेवली. शिवाय गुन्हेगारांची ठिकाणे तपासून त्यांना ताब्यात घेतले. या काळात स्वतंत्र तंत्रज्ञानाची माहिती असलेली टीम तयार केली. शिवाय सायबर पोलीस ठाणे यांच्या माध्यमातून आक्षेपार्ह पोस्ट करणा-यांवर वेळीच कारवाई केली. दरम्यान, ७० जणांवर हद्दपारीचे प्रस्ताव तयार केले, त्यातील २९ जणांवर कारवाई झाली. स्थानबध्दतेच्या एकून प्रस्तावांपैकी तिघांवर कारवाई झाली. एकूणच मनुष्यबळ अपुरे असले तरी त्यांचा योग्य पध्दतीने उपयोग करून घेण्याबरोबरच तंत्रज्ञानाचा वापर केल्याने गुन्हेगारांना नियोजनबध्द पध्दतीने बाहेर काढणे सोपे गेल्याचे अधीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले. पेट्रोलिंग, कोम्बिंग ऑपरेशन, ऑल आऊट व ड्रोन पेट्रोलिंगचा वापर केल्याने गुन्हेगारांवर वेळीच वचक ठेवण्यात व त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी निवडणुकादरम्यान अंमली पदार्थ तस्करीवर कारवाई करण्यात पोलिसांना यश आले. तसेच तलवारी आणि मोठ्या प्रमाणात रिव्हॉल्व्हर पकडण्यात पोलिसांना यश आल्याचेही अधीक्षक कुलकर्णी यांनी यावेळी स्पष्ट केले.

# क्रीडा

## संक्षिप्त वृत्त



### ग्लोबल व्हिलेजच्या विद्यार्थ्यांनी लुटला क्रिकेटचा आनंद

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर**

बोरामणी येथील ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलच्या विद्यार्थ्यांनी टर्फ क्रिकेट खेळून एका आकर्षक आणि उत्साही कार्यक्रमाचा आनंद घेतला. तसेच दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कष्टाचे उत्तम फळ मिळाले असून त्यांना ३ लाख रुपये पॅकेज मिळाल्याने आनंदाची लाट आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण दिले जाते, ज्यामुळे त्यांचे रोजगाराच्या दृष्टीने दरवाजे खुले होतात. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीला चालना दिली आणि त्यांच्यातील टीमवर्कची भावना अजून दृढ केली. क्रिकेट खेळत असतानाच ३ लाख रुपये पॅकेज मिळवलेल्या विद्यार्थ्यांनी खेळातून आपला आनंद व्यक्त केला. ज्यामुळे त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना केवळ कौशल्य आणि करियरच्या दृष्टीने फायदा होत नाही, तर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास, टीम स्पिरिट आणि एकजुटीचा अनुभवही वाढतो. या योजनेमुळे, ग्रामीण क्षेत्रातील युवकांना उच्च दर्जाच्या रोजगाराच्या संधी मिळत असून, त्यांच्या जीवनात एक नवीन दिशा मिळवण्यासाठी ते सज्ज आहेत, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्यक्त केला.



### महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचा अभिजित चव्हाण अजिंक्य

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

सोलापूर आंतर महाविद्यालय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या अभिजीत चव्हाण याने सुवर्ण पदक पटकाविले. श्रावणी सुपाते, अथर्व पोतदार यांनी रौप्य तर दीपक तोरणे, दीपक केंगार, रमेश दोडमणी, जगदीश साखरे व युवराज कांबळे यांनी कास्य पदक प्राप्त केले. या खेळाडूंना प्रा. संतोष गवळी, सोहेल शेख. प्रा. सचिन गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे, जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने, प्राचार्य डॉ. मधुकर पवार, श्री लोंढे यांनी या खेळाडूंचे कौतुक केले





# सलग दहाव्यांदा महाराष्ट्राला दुहेरी सुवर्ण मुकुट

## ४३ वी कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**अलिगड, दि. २९ नोव्हेंबर-**

कुमार व मुलींच्या ४३व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुले व मुलींच्या संघाने सलग दहाव्यांदा विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुटाचा मान मिळविला.

अलिगड (उत्तरप्रदेश) येथील महाराणी अहिल्याबाई होळकर स्पोर्टस् स्टेडियमवर दुहेरी विजेतेपद मिळवताच खेळाडू व प्रेक्षकांनी एकच जल्लोष केला. कुमार गटाचे हे १९ वे तर मुलींचे १० वे सलग विजेतेपद आहे. या विजयासह महाराष्ट्राच्या कुमारांचे हे एकूण ३५ वे तर मुलींचे २६ वे राष्ट्रीय अजिंक्यपद आहे.

शुक्रवारी झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात महाराष्ट्राने दोन्ही गटात ओडिसा संघाला नामवित ही कामगिरी केली. मुलींच्या गटात अश्विनी शिंदेच्या (३.३०, २.३० मि. संरक्षण व २ गुण) अष्टपैलू खेळीमुळे महाराष्ट्राने ओडिसावर २४-२० असा ४ गुण व ५.१० मिनिटे राखून ओडिसाचा धुव्वा उडवत विजय मिळवला. मध्यंतरालाच त्यांनी १४-१० अशी चार गुणांची आघाडी घेतली होती. यात अश्विनीला तन्वी भोसले (२.१० मि. संरक्षण), स्नेहा लामकाने (१.३० मि. संरक्षण), प्रणाली काळे (१.१० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी साथ दिली. त्यानंतरच्या डावात ओडिसाच्या संरक्षकांनी शानदार खेळी करीत लढत देण्याचा प्रयत्न केला. परंतु महाराष्ट्राच्या संरक्षक सुहानी ढोरे (१.२० मि. संरक्षण व ६ गुण) व प्राजक्ता बिराजदार यांनी (२ मि. संरक्षण) दुसऱ्या डावात बहारदार खेळी करीत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. सानिका चाफे हिने आपल्या धारदार आक्रमणात पहिल्या डावात व दुसऱ्या डावात प्रत्येकी चार खेळाडू टिपले. ओडिसाच्या अर्चना प्रधान (२.०० मि. ४ गुण ), लीसा राणी (१.०० मि. ६ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.

मुलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने ओडीसावर ३३-२९ अशी १.३० मिनिटे राखून मात केली व सलग विजेतेपदाचे दावेदार महाराष्ट्रच असल्याचे दाखवून दिले. मध्यंतराची १८-१४ ही चार गुणांची आघाडीच महाराष्ट्राला विजय मिळवून देऊन गेली. महाराष्ट्राच्या विजयात जितेंद्र वसावे (२.३०, १.२० मि. संरक्षण व ४ गुण), कृष्णा बनसोडे (१.४०, १.४० मि. संरक्षण व ४ गुण) यांच्या अष्टपैलू खेळाचा समावेश आहे. पार्थ देवकते व प्रेम दळवी यांनी प्रत्येकी सहा गडी बाद करीत विजयात जोरदार साथ दिली. ओडीसाकडून बापी मुरमु (२.००, १.२० मि. संरक्षण व २ गुण ), सुनील पात्रा (१.३०, १.०० मि. संरक्षण व ६ गुण ) यांची लढत अपुरी पडली. मुलांचे प्रशिक्षक युवराज जाधव व मुलींचे प्रशिक्षक श्रीकांत गायकवाड यांनी विजयानंतर खेळाडूंनी संघभावनेने खेळ केल्याचे सांगितले व यासाठी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे पदाधिकारी पूर्णपणे पाठीशी असल्याने सर्व सुविधा मिळाल्या व विजय सुकर झाल्याचे स्पष्ट केले.

#### सुहानी धोत्रे जानकी, जितेंद्र वसावे वीर अभिमन्यूचे मानकरी





सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा वीर अभिमन्यू पुरस्काराचा जितेंद्र वसावे हा तर सुहानी धोत्रे ही जानकी पुरस्काराची मानकरी ठरली. हे दोघेही धाराशिवचे आहेत. अन्य पुरस्काराचे मानकरी : आक्रमक : प्रेम दळवी (सांगली, महाराष्ट्र), लीसा राणी (ओडीसा), संरक्षक : बापी मुरमु (ओडीसा), तन्वी भोसले (धाराशिव, महाराष्ट्र).

#### सांघिक कामगिरीच्या जोरावर यश

ओडीसाच्या सरकारने खो-खो सह इतर खेळांना सुध्दा मोठ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्याकडे खेळाडुंमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी 'उच्च गुनावात्ता केंद्र' सुरु केली आहेत. ओडीसामध्ये खो-खो हा नियमितपणे मॅटवर खेळला जातो. आपल्याकडे अजून अश्या सुविधा नसताना सुध्दा दोन्ही संघाच्या प्रशिक्षकांनी आपल्या कल्पकतेने, योग्य नियोजन व तांत्रिक युक्त्या वापरून हे विजय खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांच्या सांघिक कामगिरीच्या जोरावर जिंकले आहेत.



**- प्रा.डॉ. चंद्रजीत जाधव, सरचिटणीस,**
**महाराष्ट्र खो-खो असोसिएशन**

#### दोन्ही विजयी संघास हृदयापासून शुभेच्छा

महाराष्ट्राने राष्ट्रीय कुमार व मुली अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत पुन्हा एकदा अभिमानास्पद कामगिरी केली आहे. हा विजया खेळाडू, प्रशिक्षक व त्यांच्या पाठीराख्यांचा उत्साह भरभरून वाढवताना दिसत होता. मुलांनी व मुलींनी अतिशय कल्पक खेळ करून विजयश्री खेचून आणली आहे. गेले काही दिवस यश माझ्या मागे उभे आहे तेच यश महाराष्ट्राच्या मुला-मुलींनी पुन्हा एकदा साजरे करण्याची संधी मिळवून दिली. सर्वांना हृदयापासून शुभेच्छा!



**-अजितदादा पवार, आश्रयदाते,**
**महाराष्ट्र खो-खो असोसिएशन**

#### महाराष्ट्राचे ड्रीम गुणही वसूल

यंदाच्या राष्ट्रीय स्पर्धेपासून ड्रीम गुण देण्यास सुरुवात झाली. एका तुकडीत तीन खेळाडू असतात. या तिघांनी मिळून चार मिनिटे संरक्षण केल्यास एक ड्रीम गुण मिळतो. त्यानंतर प्रत्येक मिनिटाला ती तुकडी बाद होईपर्यंत एक ड्रीम गुण मिळतो. महाराष्ट्राच्या मुलांनी १ व मुलींनी ४ गुण वसूल केले. ओडीसाच्या मुलांनीही एक गुण कमावला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# देशातील ४० पर्यटनस्थळे होणार विश्वस्तरीय

## केंद्राकडून ३,२९५ कोटींची मंजुरी ● महाराष्ट्रातील सिंधुदुर्गचा समावेश

◆ **नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

भारतात पर्यटन क्षेत्रात विस्तारासाठी बराच वाव आहे. जगभरातील लोक भारतातील बहु सांस्कृतिक ठेवा, समृद्ध वारसा आणि निसर्गरम्य ठिकाणांना पाहण्यासाठी येत असतात. या पृष्ठभूमीवर जगभरातील पर्यटकांना आकृष्ट करण्यासाठी केंद्र सरकारने देशभरातील पर्यटन स्थळांना विश्वस्तरीय बनविण्याचे आणि नवे पर्यटन स्थळ विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे.



या अंतर्गत देशातील ४० पर्यटन स्थळांना विश्वस्तरीय बनविले जाणार आहे. २३ राज्यांतील पर्यटन स्थळांचा यात समावेश आहे. त्यात उत्तरप्रदेशातील बटेश्वर, श्रावस्ती, मध्यप्रदेशातील ओरछा, महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग, बिहारमधील सहरसाच्या मत्स्यगंधा तलाव, सिक्कीममधील नाथुला आदींचा समावेश आहे.

या पर्यटन स्थळांना विश्वस्तरीय बनवण्यासाठी आणि पारंपरिक पर्यटन स्थळांशिवाय नवे पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठीही पर्यटन मंत्रालयाने सर्व राज्यांकडून प्रस्ताव आमंत्रित केले होते. राज्यांनी एकूण ८७ पर्यटन योजनांचा ८ हजार कोटींचा प्रस्ताव केंद्राला पाठवला होता. त्यात २३ राज्यातील ४० योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी महसूल विभागाने ३२९५.७६ कोटींची मंजुरी दिली आहे.

### पर्यटन स्थळ विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य

केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी सांगितले की, पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी देशभरातील राज्यांसोबत बैठक घेऊन आम्ही विचारमंथन केले. त्यानुसार काही मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या अंतर्गत पर्यटन विकासासाठी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना विशेष मदतीच्या रूपात ५० वर्षांसाठी मुक्त कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या योजनेसाठी राज्य सरकार जमीन उपलब्ध करून देईल आणि त्यांच्याच मार्फत योजना लागू केल्या जातील. एवढेच नाही तर, योजना पूर्णत्वास नेल्यानंतर त्याचे संचालन आणि व्यवस्थापी राज्याकडेच राहील. या योजनांसाठीचा पैसा मार्च २०२६ पूर्वीच दिला जाईल. या योजना पूर्ण करण्यासाठी राज्यांना दोन वर्षांचा कालावधी दिला जाणार आहे. या योजनांचा मुख्य उद्देश प्रचलित पर्यटन स्थळांवरील गर्दी करणे आणि नव्या तसेच कमी प्रचलित पर्यटन स्थळांचा विकास करणे हा आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सामाजिक शांतता अत्यावश्यक : सुप्रीम कोर्ट

## ▸▸संभल मशीद सर्वेक्षण अहवाल उघडणार नाही

**नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

संभलच्या जामा मशीद प्रकरणावर शुक्रवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. सामाजिक शांतता आवश्यक आहे. त्यामुळे मशिदीचा पाहणी अहवाल उघडला जाणार नाही, असा आदेश न्यायालयाने दिला. न्यायालयाने ट्रायल कोर्टाला ८ जानेवारीपर्यंत या प्रकरणी कोणतीही कारवाई करू नये, असे सांगितले.



मशिद समितीने कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला तत्काळ स्थगिती देण्याची तसेच सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याकडे लवकर सुनावणीची मागणी केली आहे. याचिकाकर्त्यांनी दावा केला आहे की, हे असाधारण प्रकरण आहे, त्यामुळे न्यायालयाने असाधारण पावले उचलली पाहिजे. न्यायालयीन आयुक्तांना सर्वोच्च न्यायालयाने सीलबंद लिफाफ्यात सर्वेक्षण अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. न्यायालयाने आदेशात म्हटले आहे की, हे प्रकरण उच्च न्यायालयात सूचिबद्ध होईपर्यंत आदेशानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे. ६ जानेवारीला या प्रकरणी पुन्हा सुनावणी होणार आहे. मात्र, आवश्यकता भासल्यास दोन्ही पक्ष अर्ज करू शकतात. संभलच्या शाही जामा मशिदीच्या वतीने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. शुक्रवारी सपा खासदार झियाऊर रहमान बारक यांचे वडील ममलुकुर रहमान बारक नमाज अदा करण्यासाठी जामा मशिदीत पोहोचले. पोलिसांनी बुर्क यांच्यावर हिंसाचार भडकावल्याचा आरोप केला. शुक्रवारी एक हजार लोक नमाजासाठी आले होते.

# ऑस्ट्रेलियात मुलांच्या सोशल मीडियावर बंदी

## विधेयक मंजूर; असे करणारा जगातील पहिला देश

◆ **क्वालालंपूर, २९ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलियात १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचे विधेयक संसदेने मंजूर केले. या विधेयकाला सत्तापक्ष आणि विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला. असे विधेयक मंजूर करणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश आहे.



या विधेयकानुसार, एक्स, टिक टॉक, फेसबुक आणि इन्स्टाग्राम यासारखे प्लॅटफॉर्म मुलांना खाती ठेवण्यापासून रोखण्यात अयशस्वी ठरले, तर त्यांना ३२.५ दशलक्षपर्यंत दंड होऊ शकतो. पालकांच्या संमतीसाठी किंवा आधीपासून अस्तित्वात असलेल्या खात्यांसाठी कोणतीही सूट दिली जाणार नाही. कायदा लागू झाल्यानंतर बंदी कशी अंमलात आणायची यावर काम करण्यासाठी व्यासपीठांना एक वर्षाचा कालावधी मिळेल.



पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी या विधेयकाचे समर्थन केले. २५ नोव्हेंबर रोजी संसदेत बोलताना अल्बानीज यांनी सोशल मीडियाला तणाव वाढवणारे साधन, ठग आणि ऑनलाईन गुन्हेगारांचे शस्त्र म्हणून वर्णन केले. ते म्हणाले, ऑस्ट्रेलियन तरुणांनी फोन सोडून फुटबॉल, क्रिकेट आणि टेनिस खेळावे, अशी त्यांची इच्छा आहे.

### किमान ११ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक भारतीय

रिसर्च फर्म 'रेडसीअर'च्या मते, भारतीय वापरकर्ते दररोज सरासरी ७.३ तास त्यांच्या स्मार्टफोनवर घालवतात. यातील बहुतांश वेळ ते सोशल मीडियावर असतात. तर, अमेरिकन वापरकर्त्यांचा सरासरी स्क्रीन टाईम ७.१ तास आणि चिनी वापरकर्त्यांचा ५.३ तास आहे. भारतीय वापरकर्ते सोशल मीडिया अ‍ॅप्सचा सर्वाधिक वापर करतात. अमेरिका आणि ब्रिटनमधील एका व्यक्तीची सरासरी ७ सोशल मीडिया खाती आहेत, तर एक भारतीय किमान ११ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आहे. ■

### ब्रिटिश सरकारही बंदी घालण्याच्या तयारीत

ऑस्ट्रेलियानंतर ब्रिटिश सरकार १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा विचार करीत आहे. ब्रिटनचे तंत्रज्ञान मंत्री पीटर काईल यांनी सांगितले की, ऑनलाईन सुरक्षितता निश्चित करण्यासाठी ते काहीही करतील, असे बीबीसीच्या वृत्तात म्हटले आहे. स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा तरुणांवर होणाऱ्या परिणामांवर अधिक संशोधन करण्याची गरज असल्याचेही पीटर यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# मुस्लिमबहुल पट्ट्यात महायुतीचे वारे

## राज्यात ३८ पैकी २१ मतदारसंघांत मिळाले यश ● एकट्या भाजपाने जिंकल्या १४ जागा

◆ **मुंबई, २९ नोव्हेंबर**

राज्यात २० टक्क्यांपेक्षा जास्त मुस्लिम मतदार असलेल्या ३८ मतदारसंघांत महायुतीने मुसंडी मारल्याचे समोर आले आहे. यातील २१ जागा महायुतीने पटकावल्या. त्यातही १४ जागा भाजपाने जिंकल्या. विशेष म्हणजे, २०१९ च्या निवडणुकीत मुस्लिमबहुल भागात भाजपाला ११ जागा मिळाल्या होत्या. त्यात आता तीन जागांची वाढ झाल्याचे दिसत आहे.



मुस्लिमबहुल मतदारसंघात महायुतीने २१ जागा जिंकल्या. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ५, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा जिंकता आल्या. मुस्लिमबहुल मतदारसंघात महाविकास आघाडीने १४ जागा जिंकल्या. त्यात उद्धव ठाकरे गटाने ६, काँग्रेसने ५, शरद पवार गटाने ३ जागा जिंकल्या. उर्वरित २ ठिकाणी समाजवादी पक्ष, तर एक जागा एमआयएमने जिंकली.

२०११ च्या जनगणनेनुसार...

राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार मुस्लिमांची लोकसंख्या १ कोटी ३० लाख आहे. एकूण लोकसंख्येच्या ही टक्केवारी ११.५६ आहे. मुंबईतील भिवंडी पश्चिममध्ये ४९ टक्के मुस्लिम मतदार आहेत. अंधेरी पश्चिममध्ये २७ टक्के, वांद्रे पश्चिममध्ये २६ टक्के, अकोटमध्ये २७ टक्के, सोलापूर मध्यमध्ये २५ टक्के, नागपूर मध्यमध्ये २३ टक्के मुस्लिम मतदार आहेत. तरीही या भागांमध्ये भाजपाचे हिंदू उमेदवार विजयी झाले. त्यांनी चक्क २० ते ५० हजार मतांच्या फरकाने विजयश्री खेचून आणली.

### मतविभाजनाचा फायदा

मुस्लिमबहुल मतदारसंघांमध्ये अनेक मुस्लिम मतदार रिंगणात होते. त्यामुळे मतविभाजन झाले. त्याचा फायदा महायुती आणि भाजपाला झाला. अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुलभा खोडके विजयी झाल्या. त्यांना ६०,०८७ मते मिळाली. त्यांच्या मतांची टक्केवारी २७.९ टक्के होती. त्यांनी काँग्रेसच्या सुनील देशमुख यांच्यावर ५,४१३ मतांनी विजय मिळवला. या ठिकाणी सुनील देशमुख यांना ५४,६७४ मते मिळाली. त्यांच्या मतांची टक्केवारी २५.४ टक्के भरली. विशेष म्हणजे,५४,५५१ मते अलीम पटेल मोहम्मद वाहिद यांनी घेतली. त्यामुळे देशमुख यांना पराभवाला सामोरे जावे लागले. ◂(वृत्तसंस्था)

# '...मग त्या खाली मंदिर कसे असेल?'

## अजमेर शरीफ दर्ग्यावरून आध्यात्मिक प्रमुखांचा सवाल

◆ **अजमेर, २९ नोव्हेंबर**

अजमेर दर्ग्यावरून राजकारण शिगेला पोहोचले आहे. दर्ग्याच्या खाली शिवमंदिर असल्याचा दावा केला जात आहे. दुसरीकडे, राजस्थानच्या अजमेर शरीफ दर्ग्यातील शिवमंदिरावर दावा करणाऱ्या एका खटल्यात दर्ग्याचे आध्यात्मिक प्रमुख सय्यद जैनुल अबेदिन अली खान यांनी आपली भूमिका मांडली. १५० वर्षांपासून कबर आहे, तर त्या खाली मंदिर कसे असेल, असा सवाल अली खान यांनी केला.

हिंदू सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विष्णू गुप्ता यांनी अजमेर शरीफ दर्गा या सुफी संत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्याच्या सर्वेक्षणाची मागणी केली होती. अजमेर दर्ग्याबाबत सुरू असलेला वाद आणि विविध नेत्यांकडून होत असलेली विविध विधाने पाहता, मला येथे येऊन वस्तुस्थिती मांडावी लागली. मी जनतेला आवाहन करतो की, शांतता राखावी आणि असे काहीही करू नका ज्यामुळे वाद निर्माण होऊ शकतो. आम्हाला कायदेशीर अधिकार आहेत, आम्ही न्यायालयात जाऊ शकतो. जेव्हा भारत सरकार गरीब नवाज रहमतुल्ला अलैया कायदा (दर्गा ख्वाजा साहेब कायदा, १९५५) पास करीत होते, त्याआधी १९५० मध्ये भारत सरकारने अलाहाबाद उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश गुलाम हसन यांच्या अध्यक्षतेखाली दर्ग्याच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. चौकशी समितीचा अहवाल सरकारकडे आहे. त्या वेळी हे सर्व 'कच्चे' होते, असे पान १८ वर स्पष्ट लिहिले आहे. गरीब नवाज रहमतुल्लाह जेव्हा येथे आले, तेव्हा ते 'कच्चा' मैदान होते आणि त्यावर त्यांची मजार बांधण्यात आली होती. जेव्हा कबर कच्च्या जमिनीवर बांधली जाते आणि १५० वर्षे कबर कच्चीच राहते, मग त्या खाली मंदिर कसे असेल, असा सवाल अली खान यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)

# आशा काळे यांना गदिमा पुरस्कार जाहीर

**पुणे, २९ नोव्हेंबर**

गदिमा प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना यंदाचा गदिमा पुरस्कार, तर दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या पत्नी प्रिया बेर्डे यांना गदिमांच्या पत्नी विद्या माडगूळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा गृहिणी सखी सचिव पुरस्कार देण्यात येणार आहे.



प्रसिद्ध कथा, पटकथा, संवादलेखक आणि गीतकार क्षितिज पटवर्धन यांना यंदाचा चैत्रबन पुरस्कार, तर प्रसिद्ध गायिका मनीषा निश्चल यांना विद्या प्रज्ञा पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती गदिमा प्रतिष्ठानचे विश्वस्त आनंद माडगूळकर यांनी पत्रपरिषदेत दिली. ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त १४ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता टिळक स्मारक मंदिर येथे होणाऱ्या गदिमा स्मृती समारोहात या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख म्हणून ज्येष्ठ नाटककार श्रीनिवास भणगे उपस्थित राहणार आहेत. २१ हजार रुपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे गदिमा पुरस्काराचे स्वरूप आहे. ११ हजार रुपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे गृहिणी सखी सचिव या पुरस्काराचे, तर पाच हजार रुपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे चैत्रबन आणि विद्या प्रज्ञा पुरस्कारांचे स्वरूप आहे.

# शिल्पा शेट्टी-राज कुंद्राच्या घरावर ईडीचा छापा

**मुंबई, २९ नोव्हेंबर**

पॉर्नोग्राफी प्रकरणी शुक्रवारी सकाळी राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टी यांच्या घरावर अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने छापा टाकला. घरापाठोपाठ राज कुंद्राच्या कार्यालयाचीही झाडाझडती घेण्यात आली. फेब्रुवारी २०२१ मध्ये पोलिसांनी मड बेटावर छापा टाकला आणि एका पॉर्न रॅकेटचा पर्दाफाश केला. या प्रकरणात टीव्ही अभिनेत्री गहना वशिष्ठचे नाव पुढे आले आहे. उमेश कामत हा राज कुंद्राच्या विहान एंटरप्रायझेस कंपनीत काम करीत असल्याची गहना यांच्याकडून पोलिसांना माहिती मिळाली.



उमेश सर्व व्हिडीओ राज कुंद्राचा लंडनस्थित मेहुणा प्रदीप बक्षीला शेअरिंग अ‍ॅप्लिकेशनद्वारे पाठवत असे. केनरिन कंपनीच्या अ‍ॅपवर प्रदीप सर्व व्हिडीओ अपलोड करायचा. उमेशच्या मोबाईलवरून 'हॉटशॉट' अ‍ॅपचे खाते आणि 'हॉटशॉट' टेकन डाऊन नावाचे दोन व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप आढळून आले. या दोन्ही गटांचा प्रशासक राज कुंद्रा हाच होता.

'हॉटशॉट' आणि 'बोली फेम' अ‍ॅपच्या कंटेंटवर काम करणाऱ्या लोकांना पेमेंट, गुगल आणि अ‍ॅपलकडून मिळालेल्या पेमेंटबाबत राज आणि त्याच्या कंपनीचे आयटी प्रमुख रायन उमेश, प्रदीप बक्षी आणि इतर कर्मचाऱ्यांमध्ये व्हॉट्सअ‍ॅपवर गप्पा झाल्या. त्यात उत्पन्नाचा तपशील साठवून ठेवला होता. हे सर्व मिळाल्यानंतर राज हा या संपूर्ण रॅकेटचा सूत्रधार असल्याचे उघड झाले असून, तो बक्षी याच्यामार्फत अश्लील व्हिडीओ अपलोड करायचा आणि त्या बदल्यात पैसे कमवत असे.

### ९७ कोटींची मालमत्ता जप्त

काही महिन्यांपूर्वीच अंमलबजावणी संचालनालयाने शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्राची ९७.७९ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली. यात शिल्पाचा जुहू येथील फ्लॅट आणि बंगला तसेच राज कुंद्राच्या नावावर नोंदणीकृत इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

# क्वालिटी लिमिटेडच्या माजी संचालकांवर कारवाई

## रोख रक्कम, आलिशान कार जप्त

◆ **नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने १४०० कोटी रुपयांच्या कथित बँकेचा भाग म्हणून बेकायदेशीर सावकारी प्रकरणात डेअरी प्रमुख क्वालिटी लिमिटेडच्या माजी संचालकांविरुद्ध कारवाई केली व त्यांच्याकडून १.३ कोटी रुपये रोख आणि कंपन्यांशी संबंधित पुरावे जप्त केले. बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार सुमारे ६.५ कोटी रुपयांच्या लक्झरी कार आणि डीमॅट खातीही गोठवण्यात आली आहेत, असे ईडीने एका निवेदनात म्हटले आहे.

ईडीने २७ नोव्हेंबर रोजी दिल्ली-एनसीआरमधील १५ ठिकाणांवर छापे टाकले होते, ज्यात संजय धिंग्रा व सिद्धांत गुप्ता या कंपनीच्या माजी संचालकांच्या प्रतिष्ठानांचा समावेश होता. त्यांच्याकडून कंपन्यांशी संबंधित काही दस्तावेज जप्त करण्यात आले. क्वालिटी लिमिटेड ही लिक्विडेट कंपनी झाली व आता ती नवीन मालकांकडे आहे. सप्टेंबर २०२० मध्ये ईडीने तथाकथित प्रवर्तक व क्वालिटी लिमिटेड यांच्या विरोधात सीबीआय एफआयआर दाखल केला. क्वालिटी लिमिटेड कंपनी दूध, आईस्क्रीम आणि इतर दुग्धजन्य पदार्थांच्या प्रक्रिया व व्यवसायात गुंतलेली होती.

पूर्वीच्या कंपनीने आपल्या संचालकांमार्फत, विक्री, खरेदी, कर्जदार आणि कर्जदारांचे खोटे वर्णन करून खात्यांच्या वहीत अफरातफर केली आणि त्यानंतर बँकांची १४००.६२ कोटी रुपयांनी फसवणूक केली, असा सीबीआय एफआयआरमध्ये आरोप करण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारताचा जीडीपी कोसळला

**नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

देशाचा जीडीपी सरत्या तिमाहीत ५.४ टक्के नोंदविण्यात आला असून, मागील दोन वर्षांतील ही नीचांकी पातळी आहे. देशातील महत्त्वाच्या भागातील कमकुवत मागणी आणि प्रतिकूल हवामानामुळे जीडीपीची वाढ मंदावल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे.




पहिल्या तिमाहीत हा दर ६.७ टक्के होता. २०२४-२५ च्या दुसऱ्या तिमाहीचा आर्थिक विकास दर दोन वर्षांच्या नीच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. एक वर्षापूर्वी याच काळात हा दर ८.१ टक्के होता, तो आता ५.४ टक्क्यांवर आला आहे. जुलै-सप्टेंबर या तिमाहीत चीनचा जीडीपी ४.६ टक्के होता. यापेक्षा आपला दर थोडा जास्त आहे. एवढाच दिलासा मानता येणार आहे. कृषी क्षेत्राचा एकूण मूल्यवर्धित दर २०२३-२४ च्या जुलै-सप्टेंबर तिमाहीत ३.५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. हाच दर गेल्या वर्षी १.७ टक्के होता. अर्थतज्ज्ञांच्या मते, अन्नधान्याची वाढती महागाई, उच्च कर्ज खर्च आणि कमी वेतनवाढ यांचा समावेश आहे. या घटकांमुळे शहरातील लोकांनी खर्च कमी केला. किरकोळ अन्न महागाई ऑक्टोबरमध्ये १०.८७ टक्क्यांपर्यंत वाढली होती. यामुळे लोकांनी खर्च कमी केले होते. जीडीपीसाठी ६० टक्के एवढे योगदान हा शहरी भाग देत असतो. त्यानेच पाठ फिरविल्याने जीडीपीवर मोठा परिणाम झाला आहे.

# ५०० किलो मादक पदार्थ जप्त

**नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

भारत आणि श्रीलंकेच्या नौदलाने केलेल्या संयुक्त कारवाईत अरबी समुद्रातील दोन मासेमारी नौकांमधून सुमारे ५०० किलो क्रिस्टल मेथॅम्फेटामाईन अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

भारतीय नौदलाच्या लांब पल्ल्याच्या सागरी गस्ती विमान आणि ड्रोनने श्रीलंकेच्या नौदलातर्फे मिळालेल्या माहितीच्या आधारे सागरी पट्ट्यामध्ये निगराणीनंतर ही संयुक्त कारवाई करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. २५ नोव्हेंबर रोजी अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. चालक दल आणि जप्त केलेल्या अमली पदार्थासह दोन नौका पुढील कायदेशीर कारवाईसाठी श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आल्याचे भारतीय नौदलाने शुक्रवारी सांगितले. श्रीलंकेच्या नौदलासोबतच्या संयुक्त कारवाईबद्दल भारतीय नौदलाने सांगितले की, ही कारवाई दोन्ही देश आणि नौदल यांच्यातील वाढत्या भागीदारी आणि संबंधांची पुष्टी करते. हे प्रादेशिक सागरी आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि हिंदी महासागर क्षेत्रातील सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी दोन्ही नौदलाच्या संयुक्त संकल्पाचे प्रतीक आहे.

अलिकडेच, भारतीय तटरक्षक दलाने ५,५०० किलो मादक पदार्थ जप्त केले होते. ही कारवाई अंदमान-निकोबार सागरी क्षेत्रात करण्यात आली होती. अंदमान आणि निकोबारमधील बॅरेन बेटावर तटरक्षक दलाच्या पायलटला नियमित निरीक्षणादरम्यान एक संशयास्पद नौका दिसली.

# निकालानंतर किती दिवसांत शपथविधी बंधनकारक

◆ **मुंबई, २९ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यापासून नव्या मुख्यमंत्र्यांबाबत सस्पेन्स कायम आहे. नवीन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणार, हे जवळपास निश्चित आहे, पण राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार, त्याचे नाव अद्याप समोर आले नाही. निवडणुकीतील विजयानंतर मुख्यमंत्री ठरवण्यासाठी महायुतीचे नेते सातत्याने बैठका घेत आहेत. २८ नोव्हेंबरच्या रात्रीदेखील गृहमंत्री अमित शाहांच्या दिल्लीतील निवासस्थानी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री कोण होणार, या प्रश्नाचे उत्तर सापडले नाही.



या सर्व स्थितीत सरकार किती दिवसांत स्थापन व्हायला हवे, याविषयी चर्चा सुरू झाली आहे. याविषयी कायद्यात काही नियम आहेत का, यावर सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता सांगतात, निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर किती दिवसांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणे बंधनकारक आहे, याबाबत भारतीय

### काय सांगतो नियम?



राज्यघटनेत कोणताही स्पष्ट नियम नाही. साधारणपणे कोणत्याही राज्यातील विधानसभा निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर १ ते ७ दिवसांत मुख्यमंत्र्याच्या नावाची घोषणा केली जाते किंवा प्रक्रिया पूर्ण होते.

कोणत्याही पक्षाने सरकार स्थापनेचा दावा केला नाही, तर अशा परिस्थितीत राज्यपाल सर्वाधिक उमेदवार जिंकणाऱ्या पक्षाला सरकार स्थापनेचा दावा करण्यास सांगतात. सर्वाधिक उमेदवार जिंकणारा राजकीय पक्ष राज्यात सरकार स्थापन करू शकत नसेल, तर राज्यपाल दुसऱ्या क्रमांकाच्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करू शकतात. राज्यात सरकार स्थापनेला बराच विलंब होत असेल, तर राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करण्याचा अधिकार राज्यपालांना नक्कीच आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५६ मध्ये असे म्हटले आहे की, जेव्हा राष्ट्रपती किंवा राज्यपालांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर किंवा राज्याचे सरकार घटनेच्या तरतुदींनुसार चालवता येत नसेल, तेव्हा राष्ट्रपती राजवट लागू केली जाते. सुरुवातीच्या टप्प्यात राष्ट्रपती राजवट सहा महिन्यांसाठी वैध असते, परंतु आवश्यक असल्यास ती जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंत वाढवता येते. महाराष्ट्राच्या बाबतीत अशी स्थिती दिसत नसून, येत्या दोन दिवसांत मुख्यमंत्र्यांचे नाव समोर येईल, असा दावा केला जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# पाकिस्तानची दुर्दशा

पाकिस्तान आणि बांगलादेश हे आपले शेजारी देश आहेत. मात्र, या दोन्ही देशांतील राजकीय तसेच कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती चिंताजनक म्हणावी अशी आहे. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादला तर गेल्या काही दिवसांत लष्करी छावणीचे स्वरूप आले असून, तेथे टाळेबंदी जाहीर करण्यात आली आहे. लष्कराला दिसताक्षणी गोळ्या घालण्याचा आदेश देण्यात आला आहे. पाकिस्तानात अराजक निर्माण झाले आहे, आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. कोरोना काळात संपूर्ण जगात टाळेबंदीसारखी स्थिती होती; कोरोना संपून जवळपास तीन वर्षे उलटली असताना पाकिस्तानमध्ये मात्र आजही कोरोना काळासारखी टाळेबंदी पुन्हा लागू करावी लागली. ही टाळेबंदी कोरोनामुळे नाही तर पाकिस्तानातील ढासळत्या कायदा आणि सुव्यवस्थेमुळे आहे. यावरून राजधानी इस्लामाबादमधील कायदा आणि सुव्यवस्था स्थिती किती खालावली आहे, याचा अंदाज आपण करू शकतो. पाकिस्तानी लष्कराला दिसताक्षणी गोळ्या घालण्याचा आदेश देण्यात आला. लष्कराने केलेल्या गोळीबारात मोठ्या संख्येत लोकांचा मृत्यू झाला आहे. मात्र, कातडीबचाऊ सरकार जमावाच्या हिंसाचारात सहा सुरक्षा जवानांचा बळी गेल्याचा दावा करीत आहे. या मोर्चाचे नेतृत्व इम्रान खान यांच्या पत्नी बुशराबीबी करीत आहेत. मागणी मान्य झाल्याशिवाय इस्लामाबादमधून आपण हलणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यामुळे हजारो आंदोलक इस्लामाबादमध्ये तळ ठोकून बसले आहेत. त्यामुळे आता पाकिस्तानमध्ये काय होईल, याची कल्पनाही करता येत नाही. पाकिस्तानातील या अराजकपूर्ण परिस्थितीसाठी तेथील सरकार आणि लष्कर जबाबदार आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांना भ्रष्टाचार आणि अन्य आरोपांखाली सरकारने तुरुंगात डांबले. इम्रान खान यांची तुरुंगातून सुटका करावी, या मागणीसाठी इम्रान खान यांच्या पाकिस्तान तहरिक-ए-इन्सान (पीटीआय) या पक्षाने 'चलो इस्लामाबाद'चा नारा दिला. या मोर्चाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. हजारो कार्यकर्ते इस्लामाबादच्या दिशेने निघाले. पाकिस्तानी सरकार आणि लष्कराने हा मोर्चा इस्लामाबादला पोहोचणार नाही यासाठी मोर्चेबांधणी केली. पण सुरक्षा व्यवस्था झुगारून देत इम्रान खान यांचे समर्थक इस्लामाबादमध्ये पोहोचले. आता परिस्थिती कशी हाताळावी, ते पाकिस्तान सरकारला समजत नाही.

लष्कर आणि पाकिस्तान सरकार इम्रान खान समर्थकांवर करीत असलेल्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध मानवाधिकार संघटनेसह अमेरिकेनेही आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे पाकिस्तान सरकारची स्थिती अडकित्त्यातील सुपारीसारखी झाली आहे. आंदोलकांवर दडपशाही केली तर जगात बदनामी होते आणि नाही केली तर आंदोलकांचा विजय होतो. पाकिस्तानात सरकार कोणाचेही असले, पंतप्रधान वा राष्ट्रपती कोणीही असला, तरी ते सरकार लष्करच चालवत असते. लष्कराला विचारल्याशिवाय वा त्यांच्या परवानगीशिवाय पाकिस्तानचे सरकार कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. लष्करासोबत आयएसआय ही पाकिस्तानी गुप्तचर संस्थाही सरकारवर नियंत्रण ठेवून असते. पाकिस्तानात लष्करप्रमुख आणि आयएसआय प्रमुख यांची नियुक्ती पंतप्रधान करीत नाहीत, तर पंतप्रधानांची नियुक्ती हे दोघे करीत असतात. अनेक वेळा गमतीने असे म्हटले जाते की, पाकिस्तान हा तीन 'ए' वर अवलंबून आहे, पहिला ए म्हणजे अल्ला, दुसरा म्हणजे आर्मी म्हणजे पाकिस्तानी लष्कर तर तिसरा ए म्हणजे अमेरिका. अल्लाने कधीच आपले हात वर केले, आता अमेरिकाही पहिलेसारखा पाकिस्तानची पाठराखण करीत नाही. त्यामुळे पाकिस्तानी लष्कर फक्त आर्मीवर अवलंबून उरले आहे. सुरुवातीला इम्रान खान आणि लष्कर यांच्यात सुसंवाद होता. लष्कराच्या छुप्या पाठिंब्यामुळेच पाकिस्तानात इम्रान खान यांच्या पक्षाला बहुमत मिळाले आणि ते सत्तेवर आले. पण इम्रान खान आणि लष्कर यांचा मधुचंद्र फार काळ चालला नाही. इम्रान खान यांनी लष्कराच्या इशाऱ्यावर चालण्यास नकार दिल्यानंतर लष्कराने त्यांना पदच्युत करण्याचे ठरवले आणि २०२२ मध्ये अविश्वास प्रस्तावाच्या माध्यमातून त्यांना सत्तेवरून पायउतार केले. एवढ्यावरही लष्कराचे समाधान झाले नाही. भ्रष्टाचाराचे अनेक आरोप लावत त्यांना तुरुंगात डांबले, इम्रान खान यांच्या पक्षाला निवडणूक लढण्यास मज्जाव करण्यात आला. त्यामुळे त्यांचे समर्थक भडकले. त्यांच्या असंतोषाचा स्फोट झाला. याचा अर्थ इम्रान खान धुतल्या तांदळासारखे आहेत असे नाही. त्यांनी पंतप्रधान म्हणून देश चालवताना चुका वा भ्रष्टाचार केला नाही असेही नाही. त्यांची बाजू घेण्याचा वा त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. इम्रान खान यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करणारे पाकिस्तानी लष्करही भ्रष्टाचारात आकंठ बुडाले आहे. त्यामुळे पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. महागाई आकाशाला भिडली आहे. पाकिस्तानातील लोकांना खायला अन्न मिळत नाही. तेथे सुरुवातीपासूनच उलटी गंगा वाहात असते. लष्करावर सरकारचे नियंत्रण नसते, तर लष्कराचे सरकारवर नियंत्रण असते. पाकिस्तानच्या आर्थिक दुर्दशेसाठी एक नाही तर अनेक कारणे जबाबदार आहेत. अंतर्गत आणि परकीय कर्जाच्या बोझ्याखाली पाकिस्तान पूर्णपणे दबले आहे.

पाकिस्तानवरील परकीय कर्जाची राशी काही वर्षांपूर्वी १३० अब्ज डॉलरची होती. आज हा आकडा २०० अब्ज डॉलर झाला असेल तर नवल नाही! परकीय चलनाची गंगाजळी पण मोठ्या प्रमाणात घसरली आहे. पाकिस्तान शब्दश: भिकारी झाला. त्याच्यावर हातात कटोरा घेऊन भीक मागण्याची वेळ आली, असे म्हणायलाही हरकत नाही. पाकिस्तानचे अर्थमंत्री मोहम्मद औरंगजेब यांच्या म्हणण्यानुसार, या आंदोलनामुळे पाकिस्तानचे दररोज ५१८ मिलियन डॉलरचे आर्थिक नुकसान होत आहे. कर्जात नखशिखांत बुडालेल्या पाकिस्तानला पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून सात बिलियन डॉलरचे कर्ज घ्यावे लागले आहे. हे कर्ज देताना नाणेनिधीने पाकिस्तानवर अनेक आर्थिक निर्बंधही लादले आहेत. भारतासारख्या देशात दहशतवादी कारवाया घडवणाऱ्या पाकिस्तानने आपल्या हातानेच आपल्या पायावर दगड पाडून घेतला आहे. पाकिस्तानने भारतासाठी आतापर्यंत अनेक खड्डे खोदले, पण यावेळी दुसऱ्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात पाकिस्तान स्वत:च पडला आहे. या अवस्थेसाठी दुसरा कोणताही देश नाही तर पाकिस्तान स्वत: जबाबदार आहे. भारताची फाळणी करीत बॅरिस्टर मोहम्मद अली जिना यांनी पाकिस्तान या नव्या राष्ट्राची निर्मिती केली. आज जिना हयात असते, तर त्यांना आपल्या कृत्याचा नक्कीच पश्चात्ताप झाला असता. पाकिस्तानचा सुरुवातीपासूनच प्रवास हा असाच राहिला आहे. 'यथा राजा तथा प्रजा'प्रमाणे पाकिस्तानला राज्यकर्तेही तसेच मिळाले. पाकिस्तानच्या कोणत्याच राज्यकर्त्याने कधी भारताशी जुळवून घेतले नाही. भारताचा कायम द्वेषच केला; भारताला पाण्यातच पाहिले. पाकिस्तानने भारताला जितका छळण्याचा प्रयत्न केला, त्याचा भारताला तात्कालिक त्रास झाला; पण भारताचे दीर्घकालीन नुकसान कधी झाले नाही. उलट पाकिस्तानचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. अल्लाही कधी पाकिस्तानच्या मदतीला धावला नाही. कारण पाकिस्तानच्या तुलनेत भारत सर्वार्थाने श्रेष्ठ आहे. जगात पाकिस्तानची प्रतिमा दहशतवादाची पाठराखण करणारा तसेच भारतात आणि अन्य जगातही दहशतवादी कारवाया घडून आणणारा देश अशी निर्माण झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानबद्दल जगात कोणाला फारशी सहानुभूती राहिली नाही. पण पाकिस्तानला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. झोपलेल्यांस उठवणे सोपे असते, पण झोपेचे सोंग केलेल्याला उठवता येत नाही. पाकिस्तानची स्थिती आज तशीच झाली आहे. पाकिस्तानने झोपेचे सोंग घेतले आहे. आपल्या दुर्दशेसाठी तो स्वत: म्हणजे पाकिस्तानातील राज्यकर्ते आणि लष्कर जबाबदार आहे. या दोघांची किंमत पाकिस्तानातील जनतेला चुकवावी लागत आहे.

## यंगिस्तान

# उद्धव ठाकरेंचा 'एम' फॅक्टर

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

महाराष्ट्र विधानसभेचा निकाल लागला आणि सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. सेफोलॉजिस्टनासुद्धा हे आकडे मांडता आले नव्हते. महायुतीला मिळालेली मते आणि जागा म्हणजे भविष्याची नांदी आहे. लोकसभा निवडणुकीत 'एम' फॅक्टर म्हणजेच मुस्लिम मतांमुळे भाजपाला चांगल्या जागा मिळविता आल्या नाहीत. उघडपणे 'व्होट जिहाद'चा नारा देण्यात आला आणि ठरवून एकगठ्ठा मते विशिष्ट उमेदवाराला देण्यात आली. त्यामुळे आघाडीला चांगलाच फायदा झाला. मात्र, लवकरच हा व्होट जिहाद आघाडीवर उलटला. जर मुसलमान समाज व्होटिंगलाही जिहादचं स्वरूप देणार असेल तर हिंदूदेखील भगवा व्होट करतील, हा संदेश या निवडणुकीतून मिळाला आहे. भाजपाला १३२, शिवसेनेला ५७ आणि राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या. २८८ पैकी २३० जागा महायुतीने जिंकल्या आहेत. २०१४ ला जो चमत्कार मोदींनी केंद्रात घडवून आणला तोच चमत्कार फडणवीसांनी महाराष्ट्रात घडवला आहे. मतांच्या वाढलेल्या टक्केवारीचा आणि हिंदू मतदारांमध्ये वाढलेल्या उत्साहाचा हा निकाल आहे. यामध्ये एक गोष्ट खटकणारी आहे ती म्हणजे 'एम' फॅक्टर. या 'एम' फॅक्टरचा विचार २०१४ नंतर होऊ लागला. यापूर्वी हे मतदार काँग्रेसच्या मागे ठामपणे उभे राहायचे. पण यावर तेव्हा चर्चा झाली नव्हती. काँग्रेसने या मतदारांना अतिशय घाणेरडी सवय लावली. नको त्या गरजा निर्माण करायच्या, लांगूलचालन करायचं, वक्फ बोर्ड इत्यादी गोष्टींना समर्थन द्यायचं. यामुळे या वर्गाचा बौद्धिक विकास झाला नाही, म्हणूनच सामाजिक विकासही होऊ शकला नाही. दुर्दैवाने अशा लांगूलचालनामुळे हा वर्ग सांस्कृतिकदृष्ट्या आणि बौद्धिकदृष्ट्या अजूनही २००० वर्षे मागे आहे.

आता या वर्गाला महाराष्ट्रात उद्धव ठाकरे जवळचे वाटू लागले आहेत. याची कारणे जाणून घ्यायला हवीत. या वर्गाने काँग्रेसला इतकी वर्षे साथ दिली. आता त्यांना जाणीव झाली आहे की, काँग्रेस यापुढे त्यांची कामे करू



शकत नाही. उद्धव ठाकरेंचं संघटन आक्रमक वृत्तीचं आहे. तेच या वर्गाला न्याय मिळवून देऊ शकतात. म्हणजेच त्यांच्या धर्मात ढवळाढवळ न करता त्यांना मनासारखं वागू देऊ शकतात. इथे आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, उद्धव ठाकरेंचे वडील कै. बाळासाहेब ठाकरे यांची प्रतिमा 'हिंदुहृदयसम्राट' अशी होती. देशभरात त्यांना हिंदू नेता म्हणून मान होता. ते अतिरेक्यांच्या हिटलिस्टवरही होते. असं असतानाही उद्धव ठाकरेंच्या मागे 'एम' फॅक्टर उभा कसा राहतो? हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. उद्धव ठाकरे जेव्हा युतीतून आघाडीत गेले तेव्हा त्यांनी आघाडीविषयी पूर्ण समर्पण भाव दाखवला. नव्याने आलेला माणूस आपण कट्टर आहोत, असं दाखवण्याचा प्रयत्न करतो; त्याचप्रमाणे उद्धव यांनी आपण हिंदुत्ववादी नाही, हे दाखवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. त्यासाठी आघाडी धर्म म्हणून बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुहृदयसम्राट ही पदवी काढून टाकली आणि याचंच आकर्षण मुस्लिम मतदारांना वाटलं. जो माणूस आपल्या वडिलांची पदवी काढू शकतो, तो आपल्याला न्याय द्यायला काहीही करू शकतो आणि इथूनच हिंदुहृदयसम्राटांच्या सुपुत्राने मुस्लिमांच्या मनात घर केलं.

आपल्याकडे प्रश्न विचारला जातो की, मुसलमानांना अधिकार नाही का कोणाला व्होट करण्याचा? तर आहेच. ही लोकशाही आहे. लोकशाहीत प्रत्येक व्यक्ती ठरवू शकते की, मत कोणाला द्यायचं आहे किंवा कोणाला नाही. पण जेव्हा फतवे काढले जातात, तेव्हा त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचं काय? मुल्ला-मौलवी कोणाला मतदान करायचं, याची योजना आखत असतील आणि इतरांना तसे करण्यास भाग पाडत असतील तर हा अधिकार नसून, हे स्वातंत्र्य नसून हे मानसिक पारतंत्र्य आहे. या वर्गातील व्यक्तीचं वैयक्तिक मतसुद्धा नसेल तर ही लोकशाहीसाठी, संविधानासाठी धोक्याची घंटा आहे. मतदानाला धार्मिक स्वरूप प्राप्त होत असेल तर आपण लोकशाही कशी टिकणार? आज 'बटेंगे तो कटेंगे'च्या घोषणा दिल्या जात आहेत, हे प्रत्युत्तर आहे. ही प्रतिक्रिया आहे. आधी क्रिया बंद झाली पाहिजे, मग प्रतिक्रिया बंद होईल. बंगालमध्ये हा समाज ममता बॅनर्जींच्या मागे उभा राहतो. उत्तरप्रदेशमध्ये सपाच्या मागे उभा राहतो. केरळमध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या मागे उभा राहतो आणि आता महाराष्ट्रात उद्धव ठाकरेंच्या मागे उभा राहतो. हे मतांचं ध्रुवीकरण आहे. उद्धव ठाकरे यांनी हे ध्रुवीकरण ओळखलं. आघाडीला या निवडणुकीत जरी यश मिळालं नसलं, तरी उद्धव ठाकरेंना २० जागा मिळविता आल्या. उद्धव ठाकरे हळूहळू शरद पवार आणि काँग्रेसची जागा घेत आहेत.

आतापर्यंत ते म्हणत होते की, 'आम्ही हिंदुत्व सोडलेलं नाही.' पण मुंबईत ठाकरेंना 'एम' फॅक्टरने वाचवलं, हे स्पष्ट झालं आहे. त्यामुळे यापुढे ठाकरे नव्याने मिळालेले हे मतदार सोडणार नाहीत. या मतदारांना खूश करण्यासाठी ते नक्कीच प्रयत्न करतील. वक्फ बोर्डाच्या बाजूने झुकतं माप घेऊन त्यांनी हे सिद्ध केलं आहे. हिंदुहृदयसम्राटाच्या सुपुत्राचा 'मुस्लिमहृदयसम्राट' होण्याचा प्रवास खरोखरच दुर्दैवी, धक्कादायक आणि चिंताजनक आहे.

writerjayeshmestry@gmail.com

## मुंबई वार्तापत्र

# मनसेने वाचवली उबाठाची अब्रू!

नागेश दाचेवार

'एक तर तू राहशील नाहीतर मी...', 'राजीनामा दे आणि निवडणुकीला समोर जा', 'मी ठाण्यात येऊन लढतो नाहीतर तू वरळीत येऊन लढ...', 'गद्दारांनो, खरे मर्द असाल तर निवडणुकीला सामोरे जा, पाठीत खंजीर काय खुपसता, आईचं दूध पिलं असेल तर मैदानात या, समोरासमोर लढा...' असले काही बाप-लेकांचे डॉयलॉग ३० जून २०२२ पासून २३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत महाराष्ट्राच्या कानावर सतत पडत राहिले. त्यानंतर दोन वेळा अर्थात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला दोघेही एकमेकांसमोर उभे ठाकले तेव्हा ठाकरेंच्या भाषेतील गद्दारांनीच बाजी मारली. पण, लोकसभेवेळी काँग्रेसने आणि विधानसभेवेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने थोडीथोडकी अब्रू उबाठा अर्थात उद्धव ठाकरेंची वाचविली. लोकांच्या जिवावर मिळालेली तेवढीच यांची उपलब्धी.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी मुस्लिम मतदारांनी केंद्रात भाजपा, मोदी नकोत म्हणून काँग्रेसला मतदान करण्याचा निर्णय घेतला आणि मोठ्या संख्येने मतदान केले. यात उबाठा काँग्रेससोबत असल्याने उबाठाला मत म्हणजे काँग्रेसला मत असे समजून मुस्लिमांनी उबाठाच्या उमेदवाराला भरभरून मते दिली. त्यामुळे स्ट्राईक रेट अत्यंत वाईट असला, तरी उबाठाचे ९ खासदार निवडून आले. त्यावेळी एकनाथ शिंदे यांचे ७ खासदार निवडून आले. मात्र, यांचा स्ट्राईक रेट चांगला होता. त्याहीपेक्षा गमतीची बाब म्हणजे, गद्दारांना आव्हान देणाऱ्या ठाकरेंशी १३ जागांवर गद्दारांचा थेट सामना झाला; तेथे ७ जागांवर गद्दारांनी बाजी मारली. अर्थात ठाकरेंपेक्षा शिंदे एक पाऊल पुढेच निघाले... पण आकड्यात ९ जागा दिसत असल्याने आणि महाविकास आघाडीचा २९ असा मोठा फुगलेला आकडा दिसल्याने, जणू काही ठाकरेंचाच विजय असल्यासारखे ठाकरे आणि त्यांची चेले कंपनी वावरू लागली होती. खरी शिवसेना आमचीच, जनतेने कौल दिल्याच्या आविर्भावात वावरताना उबाठाचे लोक दिसले. त्यांचा आत्मविश्वास एवढा वाढला की, पुढे सहा महिन्यांवर असलेली विधानसभा निवडणूक आजच जिंकल्याचा समज करून बसले होते. अधिकारी-कर्मचारी तसेच पोलिसांनादेखील उद्धव ठाकरे आणि चेले कंपनी, आमची सत्ता येत आहे. तुम्हाला बघून घेतो, अशा धमक्या देताना दिसत होते. निवडणुकीला बराच कालावधी असताना यांना मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली होती. विधानसभा निवडणुकीपूर्वीच निवडणूक जिंकल्याच्या आत्मविश्वासात मग निवडणूक आयोगासह सर्वोच्च न्यायालयालाही हे लोक क्षुल्लक समजायला लागले होते.



न्यायालयाने फक्त तारीख पे तारीख दिली, पण न्याय दिला नाही. 'आता आम्ही यांच्याकडे अपेक्षा न ठेवता थेट जनतेच्या न्यायालयात आलो आहे. खरी शिवसेना कोणाची, हे आता जनताच ठरवेल'ची भाषा हे बोलू लागले. मग जेव्हा विधानसभा निवडणूक झाली आणि निकाल लागले तर, जनतेने तब्बल ५७ जागा एकनाथ शिंदेंच्या पदरात टाकून, खरी शिवसेना शिंदेंचीच असल्याचा कौल दिला. मात्र, जनतेचा कौलसुद्धा मानायला ठाकरे ॲण्ड कंपनी तयार नाही. ते घटनात्मक संस्थांचा अवमान तर सातत्याने करतच आले; आता १५०० रुपयांसाठी विकले गेले असली भाषा करत जनमताचा अनादर करण्याइतकी मजल यांची गेली आहे. यावेळी उद्धव ठाकरेंना जनतेने त्यांची जागा दाखवली. त्यांना केवळ २० जागा दिल्या. पण त्यादेखील दिल्या असे म्हणता येणार नाही. कारण केवळ १० जागा जनतेने दिल्या तर अन्य १० जागांवर ठाकरेंना लॉटरी लागलेली आहे. उद्धव ठाकरेंना अतिरिक्त मिळालेल्या १० जागांची ही लॉटरी राज ठाकरेंमुळे लागलेली आहे. ज्यांना संपलेला पक्ष म्हणून हिणवलं, त्याच संपलेल्या पक्षाने यावेळी उद्धव ठाकरेंची अब्रू काहीअंशी वाचवली आहे.

'राजीनामा दे आणि निवडणुकीला सामोरे जा, मी ठाण्यात येऊन लढतो नाहीतर तू वरळीत येऊन लढ...' असे आव्हान देणारा आदित्य ठाकरे हा मनसेनेमुळे काठावर पास झालाय्. लोकसभेत एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात उभे करायला उबाठाला उमेदवार मिळत नसताना धरून बांधून कुठून तरी आणून उमेदवार उभा केला. पण उमेदवार नाही म्हणून आव्हान देणारे पिता-पुत्र यापैकी कोणीही शिंदेंच्या अर्थात गद्दाराला धडा शिकवायला मैदानात उतरले नाही किंवा उतरण्याची हिंमत केली नाही. त्यावेळी नाहीतर नाही, विधानसभेत तरी गद्दारांना धडा शिकवायला पाहिजे होतं. गद्दार तर वरळीत आले नाही अर्थात त्यांनी मी येतो असे आव्हानदेखील दिले नव्हते. पण ज्यांनी दिले होते, त्यांनी ठाण्यातून एकनाथ शिंदेविरुद्ध निवडणूक लढण्याची हिंमत दाखविली नाही. मुळात शिंदे बाप-लेक निवडणुकीच्या मैदानात मर्दासारखे उतरतात, तर ठाकरे बाप-लेक फुकटच्या बेंडकुळ्या दाखवत तोंडानेच फुशारक्या मारत फिरत असल्याचे, या दोन्ही निवडणुकीच्या निमित्ताने सिद्ध झाले. 'हात पैर में दम नहीं, पर मुजोरी में कम नहीं...' अशी एक गावाकडची प्रचलित म्हण आहे; जी या दोघा बाप-लेकांना तंतोतंत लागू होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांमुळे उद्धव ठाकरेंचे मुंबईमधील १० उमेदवार विजयी झाले. मुंबईतील माहिम, वरळी, विक्रोळी, जोगेश्वरी पूर्व, दिंडोशी, वर्सोवा, कालिना आणि वांद्रे पूर्व या महत्त्वाच्या जागा मनसेमुळे ठाकरेंच्या पारड्यात पडल्या. माहिममध्ये ठाकरे गटाचे उमेदवार महेश सावंत यांनी शिवसेनेच्या सदा सरवणकरांचा केवळ १३१६ मतांनी पराभव केला. सरवणकरांना ४८,८९७ मते मिळाली. तेथे मनसे उमेदवार तथा राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरेंना ३३,०६२ मते मिळाली तर महेश सावंत यांना ५०,२१३ मते मिळाली. येथे मनसे नसती तरी शिवसेना उमेदवाराचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला असता. वरळीत मनसेच्या संदीप देशपांडेंनी १९,३६७ मते घेतली. तेथे आदित्य ठाकरे केवळ ८ हजारांच्या फरकाने विजयी झाले. सकाळी उठून मोठमोठ्या गप्पा करणारे संजय राऊत यांचे भाऊ सुनील राऊत यांच्या विजयाच्या फरकाची मते नेमकी मनसेच्या उमेदवाराने घेतली आहे. वांद्रे पूर्व विधानसभा आणि दिंडोशीमध्येदेखील नेमकी फरकाची मतेच मनसेने घेतल्याने उबाठा उमेदवार विजयी झाला आहे. जोगेश्वरी पूर्वमध्ये उबाठाचे उमेदवार १५४१ मतांनी विजयी झाले आहेत. तेथे मनसे उमेदवार भालचंद्र अंबुरे यांनी १२,८०५ मते घेतली. त्यामुळे शिवसेनेच्या उमेदवार मनीषा वायकर यांचा ७५,५०३ मते घेऊनही पराभव झाला. वर्सोवामध्ये ठाकरेंचा उमेदवार केवळ १६०० मतांनी विजयी झाला असून येथे मनसे उमेदवाराला ६७५२ मते मिळाली आहे. कालिना विधानसभेत विजयातील अंतर ५००८ असून मनसेची मते ७७५२ एवढी आहे. वणी विधानसभेत विजयातील अंतर १५,५६० मते आणि मनसेची मते २१,९७७ आहेत. सातत्याने अतिशयोक्ती हावभाव, अंगविक्षेप करून बोलणारे भास्कर जाधव हे गुहागर विधानसभेत काठावर पास झाले आहेत. त्यांच्या विजयातील अंतर केवळ २८३० असून मनसे उमेदवाराने ६७१२ मते घेतली आहेत. याचा अर्थ नाकाने कांदे सोलणारे आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, संजय राऊत असो किंवा मग स्वतः उद्धव ठाकरे यांची अब्रू खऱ्या अर्थाने राज ठाकरेंनी वाचविली आहे, असे म्हणायला हरकत नाही. अन्यथा महाराष्ट्रातील जनतेने यांचे कपडेसुद्धा उतरवायची तयारी केली होती, असेच एकंदरीत चित्र या निकालाच्या निमित्ताने दिसते.

९२७०३३३८८६

## वेध

# आता चेष्टेचा विषय कोण झाले?

विजय कुळकर्णी

१ डिसेंबर २०१९ रोजी विरोधी पक्षनेते झाल्यावर देवेंद्र फडणवीसांनी विधिमंडळात 'मेरा पानी उतरता देख, मेरे किनारेपर घर मत बना लेना, मै समंदर हूँ, लौटके आऊंगा!' असे म्हटले होते. त्यावेळी विधानसभेत सर्वांत जास्त म्हणजे १०५ आमदार असलेल्या भाजपाला कसे विरोधी बाकांवर बसविले, अशी खिल्ली देवेंद्र फडणवीस आणि भाजपाची उडविली जात होती. त्यावेळी युतीमधीलच एका मित्राला हाताशी धरून शरद पवारांनी ही खेळी केली होती. मात्र, अडीच वर्षांतच शिवसेनेचे दोन गट पडले. कमी आमदार असूनही एकनाथ शिंदे यांना भाजपाने मुख्यमंत्री केले. अडीच वर्षे त्यांच्याच नेतृत्वात महाराष्ट्रात युतीच्या सरकारने मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. अनेक योजना आणल्या. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसही दुभंगली. अजित पवार महायुतीसोबत आले. युतीचे रूपांतर महायुतीत झाले. त्यानंतर झालेल्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने भाजपाला महाराष्ट्रात जोरदार धक्का देऊन ३०-३१ खासदार निवडून आणले. त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते, कार्यकर्ते जोशात होते. कशी जिरवली, अशाच आविर्भावात ते होते. आता २०२४ विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीच पुन्हा बहुमताने सत्तेत येणार, अशी खात्री त्यांना होती. त्यामुळे महाविकास आघाडी हवेत होती. मराठा आरक्षणावरून महायुतीला कोंडीत पकडण्याचा डाव महाविकास आघाडीने आखला होता. वक्फ बोर्ड, राम मंदिराच्या मुद्द्यावरून मुस्लिमांची मते आपल्यालाच मिळणार, याची खात्री त्यांना होती. कारण, लोकसभेत हा प्रयोग यशस्वी झाला होता. त्यामुळे ते



निश्चिंत होते. पण, महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी शेवटच्या काही दिवसांत अनेक योजना जाहीर केल्या. योजनांची केवळ घोषणाच केली नाही, तर त्याची अंमलबजावणीदेखील केली. त्यामुळे मतदारांमध्ये महायुती सरकारबाबत प्रचंड विश्वास निर्माण झाला. महायुतीच्या आमदारांच्या मतदारसंघातील विविध विकासकामांना मंजुरीच दिली. त्यासाठी प्रचंड निधी उपलब्ध करून दिला. आचारसंहिता लागण्यापूर्वीच ती कामे प्रत्यक्ष सुरू झाली; नव्हे त्यापैकी शहरातील अंतर्गत रस्त्याची कामे पूर्णदेखील झाली. तर, काही आजही प्रगतिपथावर आहेत. याच घोषणांमध्ये राज्यातील महिला-युवतींसाठी महायुती सरकारने लाडकी बहीण योजना घोषित केली. ही योजना घोषित केल्यावर त्याची तातडीने अंमलबजावणी करून दिवाळीपूर्वीच महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी ७ हजार ५०० रु. थेट जमा झाले. त्यामुळे अनेक गोरगरीब बहिणींना दिवाळी आनंदात साजरी करता आली. रक्षाबंधन ते भाऊबीज या कालावधीत जमा झालेली ही रक्कम म्हणजे आपल्या भावाने आपल्याला टाकलेली ओवाळणीच जणू, अशी प्रतिक्रिया अनेक महिला देत होत्या. ही योजना अतिशय लोकप्रिय झाली. तथापि, महाविकास आघाडीने या योजनेला सुरुवातीला प्रचंड विरोध केला. एवढा पैसा कुठून आणणार? सरकारवर आधीच प्रचंड कर्ज आहे. त्यात आणखी भर पडल्याने ही योजना पुढे कशी चालविणार? इत्यादी प्रश्न उपस्थित करून महाविकास आघाडी थांबली नाही, तर त्या विरोधात न्यायालयात याचिकाही दाखल केली. त्यानंतर आमचे सरकार आल्यास आम्हीदेखील महिलांसाठी महालक्ष्मी योजना सुरू करून महिलांना दरमहा ३ हजार रु. देऊ, असे गाजर महाविकास आघाडीने दाखविले. पण, लाडक्या बहिणींना ते पटले नाही. त्यांनी हाती मिळालेल्या पैशांवर विश्वास ठेवून महायुतीला प्रचंड मतदान करून मोठी भेट दिली. या योजनेला महाविकास आघाडीकडे कोणतीही तोड नव्हती. तसेच, हिंदुत्वाच्या मुद्द्यामुळे महाविकास आघाडीचे मराठा आणि मुस्लिम कार्ड पूर्णत: अयशस्वी ठरले. तसेच, मी पुन्हा येईन, हा आता चेष्टेचा विषय झाल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांनी 'सामना'स दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते. जनतेने ते पक्के लक्षात ठेवले होते. त्यावर प्रत्युत्तर देण्याची जनतेला प्रतीक्षा होती. विधानसभा निवडणुकीत ही प्रतीक्षा संपली आणि आता चेष्टेचा विषय कोण झाले, ते आपल्यासमोर आहे!

८८०६००६१४९

### मतदारांचा विश्वास सार्थ करावा

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी नेत्यांवर विश्वास ठेवून मतदान केले. समाजमाध्यमांद्वारे जनजागृती झाली. मागची चूक परत न होऊ देण्याची खबरदारी सामान्यजनांनी घेतली आणि मतदान केले. त्याचे लक्षणीय परिणाम आपल्यासमोर आहेत. अनेकांनी दिशाभूल करण्याचा प्रयत्नही केला, पण त्याला जनता फसली नाही. याचा अर्थ तळागाळातल्या नागरिकांपासून सगळ्यांना बदल आणि न्याय हवा आहे. लाडकी बहीण योजना, तसेच कटेंगे तो बटेंगे हे सगळ्यांना पटले. त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन जनतेने कौल दिला. राजकारणात यश, अपयश या गोष्टी घडतंच राहणार. परंतु जनता सावध असते. महायुती आघाडीला मिळालेल्या यशाने हुरळून न जाता सरकारने अधिक सजग राहावे. जनतेच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची खबरदारी भविष्यात घ्यावी आणि लोकहिताला प्राध्यान्य द्यावे ही सदिच्छा.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### एकीचे बळ

नुकतेच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आणि 'न भूतो न भविष्यति' असे घवघवीत यश महायुतीच्या पदरात पडले. हे यश पाहून विरोधकांची बोलतीच बंद झाली.

महायुतीच्या या यशामागील कारणांचा विचार केल्यास महाराष्ट्रातील समस्त हिंदू धर्मीयांनी एकजूट होऊन केलेले मतदान हे प्रमुख कारण ठरते. त्याचाच परिणाम म्हणून पुन्हा एकदा हिंदुत्ववादी सरकार सत्तेवर आले. काही जणांना असे वाटू शकते की, हे यश लाडकी बहीण योजनेमुळे मिळाले; पण ३००० रुपये महिन्याला महिलांना देण्याचे वचन विरोधी पक्षांनीही दिले होते. मग विजयाची माळ महायुतीच्याच गळ्यात कशी पडली? याचे उत्तर स्पष्ट आहे- महायुतीने घेतलेली हिंदूंची स्पष्ट बाजू! याउलट काँग्रेसने नेहमीच मुस्लिमांचे लांगूलचालन केले. प्रभू श्रीराम आणि हिंदू आस्थेचा वारंवार केलेला अपमान याची जबर किंमत विरोधकांना चुकवावी लागली. याचबरोबर हिंदूंची एकजूट काय असते, हे या निकालानंतर देशाला पाहायला मिळाले. उत्तरप्रदेशचे

## वाचक पत्रे

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक है तो सेफ है' या आवाहनाला प्रतिसाद देत हिंदू समाजाने एकजूटतेचे दर्शन घडवले. याचे कारणही तसेच आहे. फुकटची प्रलोभने कितीही मिळाली, तरी सुरक्षितता सगळ्यात महत्त्वाची आहे. हा मुद्दा गंभीर आहे, हे हिंदूंना उमगले आहे. कारण लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद, धर्मांतर, बांगलादेशी घुसखोर हे सगळे गंभीर मुद्दे यावेळी जनतेला इतर प्रलोभनांपेक्षा महत्त्वाचे वाटले. शेवटी 'जान है तो जहान है' हे सत्य अधोरेखित झाले. या सगळ्या मुद्द्यांना न्याय देण्याची ताकद हिंदुत्ववादी सरकारमध्येच आहे, हे जनतेने ओळखले. यावरून एक गोष्ट निश्चित आहे; एकत्र येऊन कुठलीही गोष्ट केली तर त्याचे फळ हमखास मिळते. हेच तर आहे एकीचे बळ! हिंदुहिताचे अनेक निर्णय सरकारने आता बेधडक घ्यावेत, अशी सकल हिंदू समाजाची अपेक्षा आहे.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

### स्थानकांचाही विचार होणे गरजेचे!

कोकण रेल्वे मार्गावरील रेल्वे स्थानकांची प्रवेशद्वारे सुंदर, नयनरम्य आणि उत्तम प्रकारे सुभोषित झालेली पाहून निश्चितच समाधान वाटते, प्रशासनास धन्यवाद. मात्र, याचबरोबर अग्रक्रमाने आतील स्थानकांचाही विचार होणे तितकेच गरजेचे आहे. संपूर्ण स्थानकावर छप्पर असणे आवश्यक तर आहेच; शिवाय स्वच्छता, स्वच्छ पाणपोई आदी अनेक अपुऱ्या असणाऱ्या प्राथमिक गरजांकडेही लक्ष देऊन त्यातही सुधारणा व्हाव्यात.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

### नागपूर शहर दिल्ली होऊ नये

दि.२७ नोव्हेंबरच्या महानगरमध्ये 'संत्रा नगरीची हवा प्रदूषित' हे वृत्त वाचण्यात आले आणि नजरेसमोर राजधानी दिल्लीची आठवण आली. प्रदूषित हवेमुळे दिल्ली परिसर धोक्याच्या पातळीपेक्षा पुढे गेल्यामुळे नागरिक विशेषत: लहान मुलांचे आरोग्य संकटात सापडले आहे. वायू निर्देशांक ५०० च्या जवळ येऊन ठेपला असून परिस्थिती चिंताजनक आहे. शाळांना सुट्या देऊन तात्पुरती मलमपट्टी केली आहे. अशी परिस्थिती नागपुरात होऊ नये म्हणून शासनाने आतापासूनच गांभीर्याने योजना करून युद्धपातळीवर अंमलबजावणी करावी.

नागपुरात सध्या वायू गुणवत्ता निर्देशांक वाईट श्रेणीत असून नियंत्रणाअभावी लवकरच आरोग्यास अपायकारक श्रेणीत यायला वेळ लागणार नाही अन्यथा अत्यंत धोकादायक स्थिती निर्माण होऊ शकते. महानगरपालिका आरोग्य विभाग अधिकारी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी यांनी एकत्र बसून युद्धपातळीवर काम सुरू करावे. नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचा कुशल व तत्पर अधिकारी असा लौकिक आहे. त्यांनी या गंभीर समस्येवर लवकरच तोडगा काढावा. स्थानिक स्वराज्य संस्थांना भरपूर प्रमाणात निधी उपलब्ध केला असून, त्याचा विनियोग नागरिकांच्या आरोग्यावर व्हावा, अशी माफक अपेक्षा ठेवण्यात काय हरकत आहे?

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

## कृषी योजनांच्या लाभासाठी अर्ज करण्याचे आवाहन


**सोलापूर :** आयुक्त (कृषी) यांचे आदेशानुसार महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पीक या योजनेंतर्गत अनुसुचित जाती अनुसुचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांकरीता निधी उपलब्ध असल्याने ठिबक सिंचन , तुषार सिंचन बाबींकरीता अर्ज मागविण्यासाठी दि. ३० नोव्हेंबर २०२४ ते १४ डिसेंबर २०२४ कालावधित विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तरी सदर अनु.जाती व जमाती शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत असे आवाहन मा. शुक्राचार्य भोसले जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सोलापूर यांनी केले आहे.

## निधन वृत्त...



### काशिनाथ पालापुरे

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**
घोळसगाव येथील काशिनाथ आप्पाराव पालापुरे (वय ७९) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, दोन मुली, सुना नातवंडे आहेत. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे.



### देवीदास शिंपी

**अक्कलकोट, दि. २९ नोव्हेंबर-**
येथील देविदास विष्णुपंत शिंपी (वय ७०) यांचे गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, मुलगी, सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी भावसार समाज अक्कलकोटचे माजी सचिव म्हणून काम केले.



### सरोजनी दोशी

**मंद्रुप, दि. २९ नोव्हेंबर-**
येथील सरोजनी प्रकाशचंद दोशी (वय ९८) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. मंद्रुपमधील पुस्तक विक्रेते प्रशांत दोशी यांच्या त्या मातोश्री होत.



### सादिक बागवान

**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**
येथील दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शीचे मुख्याध्यापक सादिक इस्माईल बागवान यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी रात्री निधन झाले. त्यांच्यावर बार्शीतील कब्रस्तानमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, सून असा परिवार आहे.

# ईव्हीएम विरोधात ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांचे आंदोलन

## सोलापुरात विविध संघटनेचा आत्मक्लेश आंदोलनास पाठिंबा ■ बाजार समितीमधील कामगार संघटनांचे समर्थन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २९ नोव्हेंबर -**
विधानसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महायुतीला ऐतिहासिक विजय मिळाला. तर महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. यानंतर सातत्याने महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून ईव्हीएमबाबत शंका उपस्थित करण्यात आली आहे. याविरोधात ९५ वर्षांचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी आंदोलन सुरू केले आहे.




दरम्यान, समाजसेवक बाबा आढाव यांनी ईव्हीएम मशीन विरोधात पुकारलेल्या आत्मक्लेष आंदोलनास पुण्यासह राज्यातील विविध जिल्ह्यातून सक्रिय पाठींबा मिळण्यास सुरुवात झाली आहे. याच स्पर्शभूमीवर सोलापुरात देखील विविध संघटनांनी बाबा आढाव यांच्या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. संविधानावर आधारित राष्ट्रवाद आणि लोकशाही वाचविण्यासाठी सुरू केलेल्या आत्मक्लेश आंदोलनास सक्रिय पाठींबा दर्शविण्यासाठी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर युथ असोसियशन बाबासाहेब आंबेडकर युथ असोसिशनचे संस्थापक उत्तम नवघरे, विद्या माने, शेखर बंगाळे, किरण पारवे, रामचंद्र जगताप यांनी पुढाकार घेऊन सोलापूरात ईव्हीएम विरोधी कृती समिती गठीत करण्यात आल्याची घोषणा केली.

दरम्यान आपल्या संबोधनात आकडेवारीसह उपलब्ध पुरावे, वर्तमानपत्रातील बातम्या व लोकांनी स्वयंस्फूर्तीने सोशल मिडियावर व्हायरल केलेली वास्तव परिस्थिती या सर्व गोष्टींची दखल घेऊन निवडणूक आयुक्तांनी निष्पक्ष चौकशी केली पाहिजे व पार पडलेली महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचा दोषपुर्ण निकाल रद्दबातल ठरवून फेरनिवडणूका घ्याव्यात अशी मागणी लावून धरली. ईव्हीएम हटाव, देश बचाओ !

बाबा आढाव, हम तुम्हारे साथ है! संविधानिक राष्ट्रवाद- लाँग लिव्ह! अशा घोषणांनी आंदोलकांनी सारा परिसर दणाणून सोडला. हे आंदोलन यशस्वी होई पर्यंत स्वस्थ राहायचे नाही असा निर्धार करून लोकशाहीवादी सर्व पक्ष, संघटना, संस्था यांनी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून येत्या १ डिसेंबर २४ रोजी सायंकाळी पाच वाजता शासकीय विश्रामगृहात व्यापक बैठक बोलावण्यात आली आहे.

### विधानसभा निवडणुकीत लोकशाहीचे वस्त्रहरण



निवडणुकीच्या तोंडावर पैसे वाटप करणारी सरकारी योजना जाहीर करणे म्हणजे भ्रष्टाचाराला अधिकृत करणे आहे. त्यावर निवडणूक आयोगाने कसलाही आक्षेप न घेणे अनाकलनीय आहे. ईव्हीएममध्ये घोटाळा झाला असण्याची दाट शक्यता आहे. या माध्यमातून विधानसभा निवडणुकीत लोकशाहीचे वस्त्रहरण करण्यात आले आहे.

**-बाबा आढाव, सामाजिक कार्यकर्ते**

### विविध कामगार संघटनांचे आंदोलनाला समर्थन

बाबा आढाव यांच्या या आंदोलनास राज्यभरातून पाठिंबा मिळत असल्याने, सोलापूर शहर जिल्ह्यात देखील याआंदोलनाला आता समर्थन मिळत आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील मातोश्री रमाबाई आंबेडकर माथाडी कामगार संघटना, श्री सिद्धेश्वर श्रमजीवी माथाडी कामगार संघटना, सोलापूर मार्केट यार्ड फ्रुट माथाडी कामगार संघटना आदींसह विविध कामगार संघटनांनी बाबा आढाव यांच्या आंदोलनास समर्थन दर्शवत आंदोलनामध्ये सहभाग नोंदवण्याचे जाहीर केले आहे.




## नूमवि शाळेत महात्मा फुले पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**
नूमवी मराठी शाळेत महात्मा ज्योतिराव फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा जेधे यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षकांच्यावतीने नर्मदा कनकी यांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्या विषयी माहिती सांगितली. कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रोहिणी चौधरी यांनी केले.


### सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

श्री. सिद्धेश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड, सोलापूर फोन नं.२३७४६७८,
जा.नं. भोजनालय/२०८७ दिनांक २९/११/२०२४

**जाहीर निविदा**

**शेतकऱ्यांसाठी भोजनालय चालविणेस देणे आहे**

सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या श्री. सिद्धेश्वर बाजार पेठेत शेतीमाल विक्रीसाठी आणणाऱ्या शेतकऱ्यांसाठी माफक दरात पूर्णब्रम्ह योजनेअंतर्गत भोजन पुरविणेसाठी काही अटीस अधीन राहून जुनी ऑफिस इमारतीमधील जागा भोजनालय चालविणेसाठी पाच वर्षांच्या मुदतीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्सने देणे आहे. तरी ज्यांना सदरचे भोजनालय चालविणेचे असेल त्यांनी दिनांक ०७/१२/२०२४ पर्यंत सोलापूर बाजार समितीच्या कार्यालयीन वेळेत दरपत्रके सादर करावी. सदर भोजनालय चालविणेसंबंधीचे उपनियम, अटी व शर्ती बाजार समितीच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. भोजनालय चालविणेस देणेबाबतचे दरपत्रक मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार बाजार समितीने राखून ठेवला आहे.

**सही/- प्रशासक**
**बाजार समिती, सोलापूर**



### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३२३/२०२४**

**१. महादेवी गणेश काळे** अर्जदार
रा. मनोहर नगर झोपडपट्टी सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न कुलकर्णी)
**विरुध्द**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी** गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराचे पती गणेश उत्रेश्वर काळे, रा. मनोहर नगर झोपडपटटी सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर या ठिकाणी दिनांक २० मे २००२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे पती गणेश उत्रेश्वर काळे यांचा दिनांक २० मे २००२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किवा वकीलामार्फत में. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन दयावी, मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणताही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४

शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दाधिकारी**
**बार्शी**



### दि. सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी लि.,

कार्यालय - पाटील नगर, होटगी रोड, सोलापूर-४१३००३
ऑफिस : ०२१७-२६०१८४१ मो. ९७३०५९५५०२
E-mail : solapurindl.estate@gmail.com

### जाहीर प्रगटन

सोलापूर जिल्हयातील तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, मा. संचालक मंडळ सभा दिनांक २५/११/२०२४ ठराव क्र. २ ने संस्थेच्या नोटीस बोर्डावर ढकविण्यात आलेले. त्याची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आय रजि. पान नंबर | मयत सभासदाची नावे | शेअर्स रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ०२ | रेवणसिध्द ना. काटकर | ५००.०० |
| २ | ०३ | एन. डी. कारभासे | १,०००.०० |
| ३ | ०७ | नारायणदास व्हि. भूतडा | १,०००.०० |
| ४ | ११ | गुरुसिध्दप्पा म. लोणी | १,०००.०० |
| ५ | १२ | एस. एस. दहिहंडे | ५००.०० |
| ६ | १३ | डी. एस. दहिहंडे | ५००.०० |
| ७ | १४ | श्रीनिवासाचार्य ह. उडपी | ५००.०० |
| ८ | १५ | रामकृष्ण ना. राळेरासकर | ५००.०० |
| ९ | २० | बाबुराव रा. मिरजगावकर | ५००.०० |
| १० | २१ | दिगंबर मु कांबळे | ५००.०० |
| ११ | ३१ | जी. आर. कारंडे | ५००.०० |
| १२ | ३४ | अनिलकुमार कु. गांधी | ५००.०० |
| १३ | ३५ | विमलचंद मा गांधी | ५००.०० |
| १४ | ३९ | विठ्ठल द. नागवंशी | ५००.०० |
| १५ | ४८ | एस.एस. साळुंके | ५००.०० |
| १६ | ४९ | गोविंद स. शेटे | १,०००.०० |
| १७ | ५२ | शंकर मो बाकळे | ५००.०० |
| १८ | ८३ | नारायण रा. जाधव | ५००.०० |
| १९ | ९१ | पारसमल न. जोशी | ५००.०० |
| २० | ९२ | गजानन खडकीकर | ५००.०० |
| २१ | १०२ | उमाकांत श. भागवत | ५००.०० |
| २२ | १०३ | शशिकांत श. भागवत | ५००.०० |
| २३ | १०९ | श्रीनिवास ब. सोनी | ५००.०० |
| २४ | ११० | नरसिंगदास ब. सोनी | ५००.०० |
| २५ | १२३ | शंकर सि. बुधडकर | ५००.०० |
| २६ | १२६ | रामचंद्र रा. कोठाडिया | ५००.०० |
| २७ | १२७ | जीवराज रा. कोठाडिया | ५००.०० |
| २८ | १११ | रघुवीर ब. सोनी | ५००.०० |
| २९ | १०४ | अनिलकुमार श. भागवत | ५००.०० |
| ३० | १२९ | इब्राहिम अ. हमदुले | ५००.०० |
| ३१ | १३० | मोगलप्पा ब.पोगूल | ५००.०० |
| ३२ | १३४ | सुधाकर म. चौधरी | ५००.०० |
| ३३ | १३८ | एस. एस. बदामीकर | ५००.०० |
| ३४ | १३९ | आर.एस. पंचे | ५००.०० |
| ३५ | १५२ | पार्वतीबाई श्री. किण्णगी | ५००.०० |
| ३६ | १६२ | बालराजू वि. कटकूर | ५००.०० |
| ३७ | १७२ | म. रशीदखान का. पठाण | ५००.०० |
| ३८ | १७९ | व्यंकटय्या व्य. कुडक्याल | ५००.०० |
| ३९ | १८१ | सिताबाई पा. धजाळ | ५००.०० |
| ४० | १८२ | महादेव सि. तमशेट्टी | ५००.०० |
| ४१ | २०४ | किसनलाल रा. दरगड | ५००.०० |
| ४२ | २०५ | राधाकिसन रा. दरगड | ५००.०० |
| ४३ | २११ | बशीर ए. मुगद | ५००.०० |
| ४४ | २१४ | नामदेवराव जगताप | ५००.०० |
| ४५ | २१८ | प्रभाकर गो. कुसुरकर | ५००.०० |
| ४६ | २२५ | मोहनलाल गो. दोशी | ५००.०० |
| ४७ | २५३ | माधव रा. शिंगण | ५००.०० |
| ४८ | २७७ | चंद्रशेखर ब. नडगिरी | ५००.०० |
| ४९ | २८९ | शंकरराव भि. हमदुले | ५००.०० |
| ५० | २९५ | प्रभात गो. दोशी | ५००.०० |
| ५१ | ३१५ | जगन्नाथ बा. सोनी | ५००.०० |
| ५२ | ३२८ | जमुनाबाई ज. सोनी | ५००.०० |
| ५३ | ३४० | शिवलिंगप्पा नडगिरे | ५००.०० |
| **एकूण:-** | | | **२८,५००.००** |

वरील तपशिलात नमूद केलेले सभासद यांचा त्यांनी दिलेल्या संस्थेच्या अभिलेखाप्रमाणे उपलब्ध पता अपुर्ण आहे. प्रदीर्घ कालावर्षीपासून त्यांचा संस्थेत संपर्क नाही. संस्थेच्या वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस वर्तमान पत्रात देऊन ही वरील सभासद सस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहात नाहीत. वरील सभासदापैकी काही सभासद मयत असल्याचे कळाले.

त्यामुळे मा. संचालक मंडळ सभा दिनांक २५/११/२०२४ ने संस्थेच्या नोटीस बोर्डावर व सदर जाहीर प्रगटन मध्ये प्रसिध्द केलेल्या मयत सभासदांचे शेअर्सची रक्कम शेअर्स अनामत खात्यातून राखीव निधिकडे वर्ग करण्यात यावे. असा ठराव संम्मत झाला आहे.

तथापी याबाबत वरील सभासदापैकी काही सभासदांचे वारस अथवा प्रत्यक्ष सभासदांनी त्यांच्याकडे उपलब्ध कागदपत्रान्वये सदर जाहीर प्रगटन झालेपासून १५ दिवसाचे आत संस्थेच्या व्यवस्थाकांशी संपर्क साधावे.

त्यानंतर आलेल्या तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही व सदरचे शेअर्स राखीव निधीकडे वर्ग करण्यात येईल याची नोदं घ्यावी.

**सही/-**
**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २८/११/२०२४**
**बाळकृष्ण गा. राजागिरी**
**व्यवस्थापक**
**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**



### Classifieds

**पाहिजेत**
डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटण्याची वेळः- ९-५/६ फोन नं : ७०२०१४८४२६ ८६५२७५१९०२

**पाहिजेत**
अकलूज येथे आयुर्वेदिक कारखाना व नर्सरीत (शेती) काम करणारे जोडपे पाहिजेत. पगार २० हजार ते २६ हजार महिना. जोडीला संपर्क : ९८९०१४३४३२

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, स.नं. ७/२/अ/१/२ मौजे सलगरवाडी, सोलापूर येथील रस्ते, दिवाबत्ती, ड्रेनेज व ओपन स्पेस इ. ताब्यात घेणे कामी संबंधित लेआऊटधारक श्री. सुरेश थावरु पवार यांनी विनंती अर्ज केल्यावरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील १९४९ चे कलम २२३ व २२४ चे तरतुदीनुसार वरील लेआऊटमधील रस्ते, दिवाबत्ती, ड्रेनेज व ओपन स्पेस इ. सोलापूर महानगरपालिकेचे ताब्यात घेऊन ती सार्वजनिक म्हणून जाहिर करणेत येत आहे. तमाम नागरिकांचे तीस (३०) दिवसाचे आत सुचना व हरकती न आल्यास हे जाहिर प्रसिध्दीकरण अंतिम समजले जाईल. ताब्यात घेणेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | कामाचा तपशील | आकार |
|---|---|---|
| १ | रस्ते | १,०००.०० चौ.मी. |
| २ | दिवाबत्ती | ०७ नग |
| ३ | ड्रेनेज | १३५.०० रनिंग मीटर |
| ४ | ओपन स्पेस | ३९१.१८ चौ.मी. |

**सही/- आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**



### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३३९/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. सरिता सुरेश फुले** - अर्जदार
रा. भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि, सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. भवानी पेठ, बार्शी, ता, बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी, स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी दिनांक २५ डिसेंबर १९८८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २५ डिंसेबर १९८८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**बार्शी**



### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३४०/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. भरत सुरेश फुले** - अर्जदार
रा. कासार गल्ली बार्शी, ता. बार्शी, जि, सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. कासार गल्ली बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी दिनांक १३ सप्टेंबर १९९० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १३ सप्टेबर १९९० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि, सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**बार्शी**



### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३५९/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. उपेंद्र रामचंद्र जोशी** - अर्जदार
रा. चाफेकर चौक चिंचवड पुणे
(असल्यास, तर्फे वकील विजय न कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची आई उषा रामचंद्र जोशी, रा. चाफेकर चौक, चिंचवड, पुणे यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि, सोलापूर या ठिकाणी दिनांक ३० मे २०१२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई उषा रामचंद्र जोशी यांचा दिनांक ३० मे २०१२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि. सोलापूर या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**बार्शी**



### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३१४/२०२४**

**१. दत्तात्रय लक्ष्मण गोडसे** अर्जदार
रा. पांगरी ता. बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न कुलकर्णी)
**विरुध्द**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी** गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराचा मुलगा अभिषेक दत्तात्रय गोडसे, रा. पांगरी ता. जि सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर या ठिकाणी दिनांक २० डिंसेबर २००३ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा अभिषेक दत्तात्रय गोडसे यांचा दिनांक २० डिसेबर २००३ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दाधिकारी**
**बार्शी**



### Public Notice

Notice is hereby given that the Property bearing Plot No. 59, out of Gat No. 4, admeasuring 2.22.90 R. Sq. Mtrs. Ass. Rs. 22.30 Ps. (as per 7/12 extract i.e. 21/10/2024) which is situated at and within the limits of Akkalkot (Gramin), Tal. Akkalkot, Dist. Solapur and bounded by to the East Plot No. 60, to the West: Plot No. 58, to the South Road, to the North Plot No. 68 which is owned and possess by Shabbir Ghudubhai Mujawar and that he declared that, the original sale deed Reg. No. 883/1989 & 1695/1990 along with its Registration Receipt and Index II, have been lost by Shabbir Ghudubhai Mujawar and accordingly, the necessary FIR has been lodged by him for the said missing lost deeds dated 28/11/2024 vide its missing Regd. No. 0549/2024 with the Akkalkot North Police Station Akkalkot. That no person shall enter into any kind of transfer on the basis of above mentioned lost documents which will be illegal transaction. Objection / claim is required to comunicate in the writing with the documentary evidence at my office, within 7 days from the date of hereof. This public notice dated 29/11/2024.

**Sign/-**
**Adv. Sapatanekar Shrirang B.**
**Advocate, Bharat Galli,**
**Akkalkot Mobile No. 9850849896**



### जाहीर प्रसिद्धीकरण

**पंढरपूर येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

**श्री. ज्योती शिवाजी कांबळे** अर्जदार
वय ३८ वर्षे, धंदा : घरकाम
रा. गादेगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर
**विरुद्ध**
**मा. ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकळी** सामनेवाला
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार यांनी पंढरपूर येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात अर्जदार यांचे वडील कै. विठ्ठल गणपत सुतार यांचा मृत्यु दिनांक ०९-०८- २०२४ रोजी मौजे टाकळी, ता. पंढरपूर येथील ग्रामपंचायत कार्यालयात मृत्युची नोंद मृत्यु नोंदणी रजिस्टरमध्ये होवून मिळणेसाठी सदरचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे.

तेव्हा सदर मृत्यु नोंदीचा आदेश होणेसंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार असल्यास या न्यायालयात हे जाहीर प्रसिद्धीकरण केलेपासून ३० दिवसाचे आत आपले म्हणणे अथवा हरकत/तक्रार सक्षम हजर राहून अथवा वकिलामार्फत हजर राहून द्यावे.

वरील मुदतीत कोणाचेही म्हणणे अथवा हरकत न आल्यास सदरचे न्यायालय अर्जदार यांचे वडील कै. विठ्ठल गणपत सुतार यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत टाकळी ता. पंढरपूर येथील कार्यालयात होणेसंबंधी ग्रामसेवक, ग्रामपंचायत टाकळी ता. पंढरपूर यांना योग्य ते आदेश करतील, याची नोंद घ्यावी,

ही जाहीर नोटीस दिली तारीख २४/११/२०२४

शिक्का

**सही/-**
**हुकूमावरून**
**तहसिलदार पंढरपूर**

## महत्त्वाचे


### भारतीय महिला क्रिकेट संघाची नवीन जर्सी लाँच

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) शुक्रवारी भारतीय महिला क्रिकेट संघासाठी नवीन एकदिवसीय जर्सी लाँच केली. यावेळी बीसीसीआयचे सचिव जय शाह व भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरही उपस्थित होते. ही जर्सी प्रसिद्ध स्पोर्ट्सवेअर कंपनी एडीडासने तयार केली आहे. टीम इंडियाची पूर्वीची जर्सी पूर्णपणे निळ्या रंगाची होती आणि तिच्या खांद्यावर एडीडासचे तीन पट्टे होते. यावेळी खांद्यावर असलेल्या तीन एडीडास पट्ट्यांना तिरंग्याची छटा देण्यात आली आहे. या जर्सीचा निळा रंग आधीच्या जर्सीपेक्षा किंचित हलका आहे, पण त्याच्या बाजूने गडद रंग देण्यात आला आहे. माझ्या उपस्थितीत नवीन जर्सी लाँच करण्यात आली ही माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. मी त्याच्या लूकवर खूप आनंदी आहे. विशेष म्हणजे खांद्यावर तिरंगा आहे, असे हरमनप्रीत कौर म्हणाली. महिला संघ वेस्ट इंडिजविरुद्ध पहिल्यांदाच नवीन जर्सी घालणार आहे. वेस्ट इंडिजचा संघ २२ डिसेंबरपासून वन-डे मालिका खेळण्यासाठी भारत दौऱ्यावर येणार आहे.




### डोपिंग : दुहेरी मानकावर सिमोना हॅलेपची टीका

**रोम** : रोमानियाची स्टार टेनिसपटू सिमोना हॅलेपने डोपिंग प्रकरणाचा निवाडा करताना कसा भेदभाव केला जातो. दुहेरी मानकांचा अवलंब केल्या जात असल्याचा आरोप तिने केला आहे. नुकताच डोपिंग प्रकरणात दोषी आढळलेल्या द्वितीय विश्वमानांकित पोलंडच्या इगा स्वियातेकवर एका महिन्याची बंदी घालण्यात आली. डोपिंगच्या शिक्षेतील हा



मोठा फरक प्रकर्षाने दिसतो. दोन वेगवेगळ्या अँण्टी-डोपिंग नियमाचे उल्लंघन केल्यानंतर सिमोनाला १८ महिन्यांहून अधिक काळ कारवाईपासून दूर ठेवले होते. इंटरनॅशनल टेनिस इंटिग्रिटी एजन्सीने सांगितले की, इगा स्वियातेकने पदार्थ ट्रायमेटाझिडाइनसाठी सकारात्मक चाचणी घेतल्यानंतर तिला एक महिन्यासाठी निलंबित करण्यात आले आहे. इगाची ऑगस्टमध्ये चाचणी सकारात्मक आली होती, परंतु टेनिसचा डोपिंग विरोधी कार्यक्रम चालवणाऱ्या इंटरनॅशनल टेनिस इंटिग्रिटी एजन्सीन हे मान्य केले की, हे तिच्या औषध मेलाटोनिनच्या दूषिततेमुळे झाले आहे. हॅलेपला ऑक्टोबर २०२२ मध्ये तात्पुरते निलंबित करण्यात आले आणि नंतर चार वर्षांसाठी बंदी घालण्यात आली, हा कालावधी क्रीडा लवादाच्या न्यायालयात अपील केल्यानंतर मार्चमध्ये नऊ महिन्यांपर्यंत कमी करण्यात आला.

### हॉकी : मध्य प्रदेश, चंदीगड, मिझोराम, हरयाणा विजयी

**सिकंदराबाद** : येथील दक्षिण मध्य रेल्वे क्रीडा संकुलात शुक्रवारी खेळल्या जाणाऱ्या १४ व्या हॉकी इंडिया सब-ज्युनियर महिला राष्ट्रीय अजिंक्यपद २०२४ च्या चौथ्या दिवशी चंदीगड, मिझोराम, मध्य प्रदेश आणि हरयाणा संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाविरुद्धच्या लढती जिंकल्या. दिवसाची सुरुवात हॉकी चंदीगड आणि केरळ हॉकी यांच्यातील पूल ई मधील सामन्याने झाली, यात चंदीगडने ३-२ ने विजय नोंदवला. केरळकडून दिपांजली तिर्की व परमेश्वरी पिनापोथुलाने गोल केले, तर चंदीगडकडून सिमरन, अन्नू व तमन्नाने विजयी गोल केला. अन्य सामन्यात मिझोरामने हॉकी अरुणाचलवर ११-० असे वर्चस्व राखले. कर्णधार लालतलांचुंगी जबरदस्त फॉर्ममध्ये होती आणि तिने संघासाठी चार गोल केले. वानलारलिन्हलुईने तीन गोल केला.

# सुवर्णमध्य शोधण्यासाठी पुन्हा आज बैठक

### निर्णयाविना बैठक संपली
### पाकिस्तानची तडजोड करण्यास नकार
### भारतीय संघ पाकिस्तानला जाण्याची शक्यता नाही

◆ **दुबई, २९ नोव्हेंबर**

आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेच्या आयोजनासंदर्भात निर्माण झालेल्या पेचप्रसंगावर तोडगा काढण्यासाठी शुक्रवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बैठक बोलावली होती, परंतु चर्चेतून कोणत्याही निर्णयावर न पोहचता बैठक संपली. चर्चा होऊनही तोडगा निघाला नाही. पाकिस्तानने तडजोड करण्यास नकार दिल्यामुळे तणाव वाढला, तर तिकडे सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय संघ पाकिस्तानला जाण्याची शक्यता नाही. त्यामुळे या पेचप्रसंगावर सुवर्णमध्य शोधण्याच्या आशेने ही बैठक शनिवार, ३० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

पाकिस्तान संपूर्ण आयसीसी चॅम्पियन्स चषक-२०२५ स्पर्धा मायदेशात आयोजित करण्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम आहे.

पर्याय म्हणून आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट मंडळाला (पीसीबी) हायब्रिड होस्टिंग मॉडेलचा विचार करण्याची विनंती करणे अपेक्षित आहे.

अद्याप कोणताही करार दिसत नसल्यामुळे, येणारे दिवस महत्त्वाचे असतील कारण सर्व पक्ष




अशा निर्णयाच्या दिशेने काम करतील जे इतर सदस्यांनी उपस्थित केलेल्या लॉजिस्टिक आणि सुरक्षेच्या चिंतेसह पाकिस्तानच्या होस्टिंग आकांक्षांना संतुलित करेल.

पाकिस्तानमधील 'सुरक्षेच्या कारणास्तव' भारतीय क्रिकेट संघ पुढील वर्षी आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी पाकिस्तानला जाण्याची शक्यता कमी आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने (एमईए) शुक्रवारी सांगितले.

पाकिस्तानमधील सुरक्षेच्या चिंतेमुळे भारतीय संघ पाकिस्तानमध्ये चॅम्पियन्स चषक स्पर्धा खेळण्यासाठी सीमा ओलांडण्याची शक्यता नाही, असे एमईएचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) विधानाचा हवाला देत म्हटले आहे.

पाकिस्तानमध्ये सुरक्षेची चिंता आहे आणि त्यामुळे भारतीय संघ तिथे जाण्याची शक्यता नाही, असे रणधीर जयस्वाल साप्ताहिक पत्रकार परिषदेत सांगितले.

दोन देशांमधील तणावपूर्ण राजकीय संबंधांमुळे, २००८ पासून भारताने आशिया चषक स्पर्धेत भाग घेतल्यापासून पाकिस्तानचा दौरा केलेला नाही. दोन पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांनी शेवटची द्विपक्षीय मालिका २०१२-१३ मध्ये भारतात खेळली होती, ज्यामध्ये पांढऱ्या चेंडूच्या सामन्यांचा समावेश होता. त्यानंतर, भारत आणि पाकिस्तान प्रामुख्याने आयसीसी स्पर्धा आणि आशिया चषक स्पर्धेत एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत.

भारताने पाकिस्तानचा दौरा न करण्याची आपली भूमिका ठाम ठेवली आहे. बीसीसीआय भारत सरकारने जारी केलेल्या निर्देशांचे कठोरपणे पालन करेल, असे बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)

# गुलाबी चेंडूचा सराव सामना आजपासून

◆ **कॅनबेरा, २९ नोव्हेंबर**

पुढील आठवड्यात ॲडलेड येथे होणाऱ्या दिवस-रात्र काळात होणाऱ्या गुलाबी चेंडूच्या कसोटी सामन्याची पूर्वतयारी म्हणून शनिवारपासून मनुका ओव्हल येथे भारतीय संघ आणि ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधान एकादशदरम्यान दोन दिवसीय सराव सामना खेळला जाणार आहे.

भारताने आतापर्यंत चार दिवस-रात्र कसोटी सामने खेळले असून चार वर्षांपूर्वी ॲडलेड येथे त्यांचा एकमेव झाला होता. तेव्हा चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत जोरदार विजयी मुसंडी मारण्यापूर्वी भारताचा संपूर्ण संघ अवघ्या ३६ धावांत गारद झाला होता.

सराव सामना भारतीय वेळेनुसार सकाळी ९.१० वाजतापासून सुरू होणार आहे. गुलाबी चेंडू हा लाल चेंडूच्या तुलनेत विशेषतः संधिप्रकाश काळात खूप जास्त प्रभाव टाकतो. हा प्रथम श्रेणी सामना नाही, हे लक्षात घेता, भारतीय फलंदाजांना चेंडूचा अचूक वेध घ्यायचा असतो.

पर्थमधील पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सर्वात वर्चस्वपूर्ण कामगिरीमुळे भारतीय तंबूत उत्साह आहे.

नियमित कर्णधार या पहिल्या कसोटीला मुकला होता. तो आपल्या दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे भारतातच होता. शुभमन गिल पुन्हा तंदुरुस्त होण्याची अपेक्षा आहे, त्यामुळे संघ



रोहित शर्मा



जॅक एडवर्ड्स

व्यवस्थापनाला ६ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी फलंदाजी क्रम बदलण्यास भाग पाडले जाणार आहे.

रोहित व यशस्वी जयस्वाल हे नियुक्त सलामीवीर आहेत परंतु यशस्वी व के. एल. राहुलने पर्थमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे भारतीय कर्णधार रोहित शर्माला स्वतःचा फलंदाजीचा क्रम खाली उतरवण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. तसे झाले तर गिलचे स्थानही समायोजित करावे लागेल. ॲडलेडला पोहोचण्यापूर्वी भारताला सराव सामन्यात आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल.

हा केवळ दोन दिवसांचा खेळ असल्यामुळे भारताला गोलंदाजीपेक्षा फलंदाजीमध्ये जास्त वेळ मिळेल अशी आशा आहे.

भारतीय संघ विश्रांतीच्या मूडमध्ये आहे. शुक्रवारी त्यांचे पहिले सत्र झाले. या सत्रात गिलने सावधगिरी बाळगली, त्यामुळे तो तंदुरूस्त असल्याचे दर्शविते.

मॅट रेनशॉ व स्कॉट बोलॅण्डसारख्या कसोटीपटूंसह भारतीय संघाला काही चांगल्या सामन्यांच्या सरावाची आशा आहे.

पंतप्रधान एकादशचे नेतृत्व अष्टपैलू जॅक एडवर्ड्स करेल व संघात चार्ली ॲण्डरसन, माहली बियर्डमन, एडन ओ'कॉनर आणि सॅम कोन्स्टास यांच्यासह ऑस्ट्रेलियाचे १९ वर्षांखालील संघातील काही स्टार खेळाडू सुद्धा असतील.

वेगवान गोलंदाजी करणारा अष्टपैलू हॅनो जेकब्स हा आणखी एक खेळाडू असेल.

**प्रतिस्पर्धी संघ असे-**

**भारत** : रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, अभिमन्यू ईश्वरन्, शुभमन गिल, विराट कोहली, के. एल. राहुल, ऋषभ पंत (यष्टिरक्षक), सर्फराज खान, ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), आर. अश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद. सिराज, आकाश दीप, प्रसिध कृष्णा, हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी व वॉशिंग्टन सुंदर.

**पंतप्रधान एकादश** : जॅक एडवर्ड्स (कर्णधार), चार्ली ॲण्डरसन, महली बियर्डमन, स्कॉट बोलॅण्ड, जॅक क्लेटन, एडन ओ'कॉनर, ऑली डेव्हिस, जेडेन गुडविन, सॅम हार्पर, हॅनो जेकब्स, सॅम कोन्स्टास, लॉयड पोप, मॅथ्यू रेनशॉ, जेम रायन.

(वृत्तसंस्था)




### दुखापतीतून सावरल्यानंतर गिल नेट्समध्ये परतला

**कॅनबेरा** : अंगठ्याच्या दुखापतीतून पूर्ण बरे होण्याची चिन्हे दाखवून शुभमन गिलने शुक्रवारी भारताच्या सराव सत्रात पुनरागमन केले. त्याला पर्थ येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या सामन्यातून बाहेर झाला.

पर्थमध्ये गिलची अनुपस्थिती जाणवली नाही, कारण भारताने हा सामना २९५ धावांनी जिंकला होता, परंतु गत दौऱ्यातील त्याच्या प्रभावी धावा लक्षात घेता भारताला पाच सामन्यांच्या मालिकेत अधिक सर्वोत्तम कामगिरीची गरज आहे. शनिवारपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियन पंतप्रधान एकादश विरुद्ध गुलाबी-चेंडू सराव सामन्यापूर्वी अव्वल फळीतील फलंदाज शुभमन गिल हा यश दयाल व आकाश दीप यांच्यासमोर नेटमध्ये दिसले.

# भारत-पाकिस्तान सामना आज

### १९ वर्षांखालील आशिया क्रिकेट

◆ **दुबई, २९ नोव्हेंबर**

दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर शनिवारी १९ वर्षांखालील क्रिकेटपटूंच्या आशिया चषक क्रिकेट २०२४ स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान एकमेकांसमोर उभे ठाकणार आहे. भारतीय वेळेनुसार शनिवारी सकाळी१०.३० वाजता या सामन्याला सुरुवात होणार असून या सामन्याचे थेट प्रसारण सोनी स्पोर्ट्स वाहिनीवर करण्यात येणार आहे.

मोहम्मद अमनच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाचे नवव्यांदा विजेतेपद पटकावण्याचे लक्ष्य असेल आणि ते पाकिस्तान, जपान आणि यूएईसह ब गटात आहेत. बांगलादेश हा ५० षटकांच्या स्पर्धेचा गतविजेता आहे व त्याला अ गटात श्रीलंका, अफगाणिस्तान नेपाळसोबत ठेवण्यात आले आहे. दोन्ही गटातील अव्वल दोन संघ ६ डिसेंबर रोजी उपांत्य फेरीत प्रवेश करतील.अंतिम सामना ८ डिसेंबर रोजी दुबई येथे होणार आहे.

**प्रतिस्पर्धी संघ असे**

**भारत** : आयुष म्हात्रे, वैभव सूर्यवंशी, सी. आंद्रे सिद्धार्थ, मोहम्मद अमन (कर्णधार), किरण चोरमले (उपकर्णधार), प्रणव पंत, हरवंशसिंग पंगालिया (यष्टिरक्षक), अनुराग कवडे (यष्टिरक्षक), हार्दिक राज, ईनान, केपी कार्तिकेय, समर्थ नागराज, युधाजित गुहा, चेतन शर्मा, निखिल कुमार.

**पाकिस्तान** : साद बेग (कर्णधार/यष्टिरक्षक), मोहम्मद अहमद, हारून अर्शद, तय्यब आरिफ, मोहम्मद हुजेफा, नवीद अहमद खान, हसन खान, शाहजेब खान, उस्मान खान, फहम-उल-हक, अली रझा, मोहम्मद रियाजुल्ला, अब्दुल सुभान, फरहान युसूफ, उमर झैब.

(वृत्तसंस्था)

# सिंधू, लक्ष्य उपांत्य फेरीत

### सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन

◆ **लखनौ, २९ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या सय्यद मोदी आंतराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत शुक्रवारी भारताची स्टार खेळाडू पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेनने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करून अनुक्रमे महिला आणि पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला व विजेतेपद पटकावण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले.

या स्पर्धेत (२०१७, २०२२) दोन वेळा विजेती राहिलेली अव्वल मानांकित सिंधू हिने महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत ४८ मिनिटांत चीनच्या दाई वांगचा २१-१५, २१-१७ असा पराभव केला. २०२१ च्या विश्व स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या लक्ष्याने सुद्धा पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व सामन्यात देशबांधव मीराबा लुवांग मैस्नामचा २१-८, २१-१९ असा पराभव करत आपल्या सामन्यात वर्चस्व राखले.

आजचा सामना महत्त्वाचा होता. ती कमी दर्जाची खेळाडू असली तरी काही फरक पडत नाही. कालपासून मी माझ्या चुका सुधारल्या आहेत. ज्या चुका मी केल्या होत्या, त्याची आज पुनरावृत्ती केली नाही. मी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळत होती. एकूणच, कालच्या तुलनेत मी माझ्या खेळावर आनंदी आहे, असे सिंधू म्हणाली. सिंधू जागतिक



पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेन

क्रमवारीत १८ व्या, तर वांग ११८व्या क्रमांकावर आहे. आता उपांत्य फेरीत सिंधूचा सामना भारतीय संघ मैत्रीण उन्नती हुड्डाशी होईल, तर लक्ष्य सेनचा सामना जपानच्या शोगो ओगावाशी होणार आहे.

तो एक चांगला सामना होता. एकंदरीत, मी ज्या पद्धतीने सुरुवात केली त्याबद्दल आनंदी आहे, परंतु दुसरा गेम काही क्षणी कठीण होता, पण सामन्यात बाजी मारल्याचा आनंद वाटतो, असे लक्ष्य म्हणाला.

२०२२ मध्ये ओडिशा ओपनचे विजेतेपद जिंकणाऱ्या उन्नती हुड्डाने आपल्या उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या इशिका जयस्वालवर २१-१६, २१-९ असा विजय मिळवला.

मला कोर्टच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास वेळ लागला, पण कालांतराने चांगली खेळली, असे उन्नती म्हणाली.

उन्नती दुखापतीमुळे या वर्षाच्या सुरुवातीला सहा महिने खेळू शकली नाही. कनिष्ठ गट ते आंतरराष्ट्रीय सर्किटमध्ये संक्रमण करणे खूप वेगळे आहे. मला आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी बऱ्याच पैलूंमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असेही ती म्हणाली.

त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद या मानांकित महिला दुहेरीच्या जोडीने चीनमध्ये हंगाम संपलेल्या वर्ल्ड टूर फायनलसाठी पात्रता मिळविली आहे. त्रिशा व गायत्रीने सहाव्या मानांकित गो पे की व तेओह मेई यांच्यावर २१-८, २१-१५ असा विजय मिळवून पुढील फेरीत प्रवेश केला.

मिश्रा दुहेरीत पाचव्या मानांकित जोडीने ध्रुव कपिला व तनिषा क्रास्टोने मलेशियाच्या लू बिंग कुन व हो लो ई या जोडीचा २१-१६, २१-१३ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

(वृत्तसंस्था)

# हॅरी ब्रुकची नाबाद शतकी खेळी

### इंग्लंडचे न्यूझीलंडला चोख प्रत्युत्तर

◆ **ख्राईस्टचर्च, २९ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दुसऱ्या दिवशी पाचव्या क्रमांकावर फलंदाजीस आलेल्या हॅरी ब्रुकने झळकावलेल्या नाबाद शतकाच्या बळावर इंग्लंडने जोरदार मुसंडी मारत न्यूझीलंडच्या ३४८ धावांच्या प्रत्युत्तरात दिवस अखेर ७४ षटकांत ५ बाद ३१९ धावांपर्यंत मजल मारली.

खेळ थांबला तेव्हा हॅरी ब्रुक नाबाद १३२ धावांवर, तर कर्णधार बेन स्टोक्स नाबाद ३७ धावांवर खेळत होते. इंग्लंड अजून २९ धावांनी पिछाडीवर आहे.

न्यूझीलंडने ८ बाद ३१९ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांचा पहिला डाव ९१ षटकांत ३४८ धावांवर आटोपला. सकाळच्या सत्रात न्यूझीलंडने केवळ २९ धावांची भर घातली.

न्यूझीलंडच्या ३४८ धावांना प्रत्युत्तर देताना इंग्लंडची सुरुवात निराशाजनक झाली. सलामीवीर झॅक क्रावलीसह जो रूट भोपळा न फोडताच तंबूत परतले. जेकब बेथेल १० धावा काढून बाद झाला. बेन डकेटने तेवढी एकाकी झुंज देत डकेटने ६२ चेंडूंत ६ चौकारांसह ४६



धावांची खेळी केली. इंग्लंडची २१.२ षटकांत ४ बाद ७१ धावा अशी अवस्था झाली होती, परंतु त्यानंतर हॅरी ब्रुक व ऑली पोपने जबरदस्त फलंदाजी करत इंग्लंडला सामन्यात परत आणले. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी १५१ धावांची भागीदारी केली व संघाला २२२ धावांचा टप्पा गाठून दिला. पोपने ८ चौकारांसह ७७ धावांचे योगदान दिले. पुढे ब्रुकने बेन स्टोक्ससोबत दिवस अखेरपर्यंत नाबाद खेळी करत इंग्लंडला ७४ षटकांत ५ बाद ३१९ धावा रचून दिल्या. हॅरी ब्रुकने १६३ चेंडूंत १० चौकार व २ षट्कारांसह नाबाद १३२ धावांची, तर स्टोक्सने ७६ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद ३७ धावांची खेळी केली.

(वृत्तसंस्था)

# बुमराह म्हणजे भन्नाट कृती व कौशल्याचा संच : स्टीव्ह स्मिथ

◆ **मेलबर्न, २९ नोव्हेंबर**

भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह म्हणजे अपरंपरागत गोलंदाजी शैली व अफलातून कौशल्याचा परिपूर्ण संच आहे, असे मत ऑस्ट्रेलियाचा प्रमुख फलंदाज स्टीव्ह स्मिथने व्यक्त केले.

नियमित कर्णधार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत भारताचे नेतृत्व करणाऱ्या बुमराहला पहिल्या कसोटी सामन्यात आपल्या संघाला २९५ दणदणीत विजय मिळवून देण्यासाठी पहिल्या डावातील ५ बळींसह एकूण ८ बळी टिपल्यामुळे त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

सामन्याच्या सुरुवातीपासून बुमराहची देहबोली काही वेगळीच होती. त्याची धावण्याची पद्धत इतरांपेक्षा वेगळी आहे, नंतर त्याची शेवटची क्रिया अनाकलनीय आहे. मी आता त्याला वाजवी प्रमाणात तोंड दिले आहे. प्रत्येक वेळी त्याचा सामना करण्यासाठी एक प्रकारे लय मिळवण्यासाठी काही चेंडू व वेळ द्यावा लागतो.

पहिल्या डावात बुमराहच्या बळींमध्ये स्मिथचा समावेश होता. यात वेगवान गोलंदाजाने ऑस्ट्रेलियाची सलामी जोडी फोडली.

बुमराहची चेंडू टाकण्याची शैली अफलातून असून कोणत्याही गोलंदाजाच्या तुलनेत लांबी निवडणे किंवा चेंडूचा अजूक वेध घेणे अवघड आहे, असे पाकिस्तानचा माजी कर्णधार वसीम अक्रमने म्हटले आहे. केवळ ही एक त्याची विचित्र कृती आहे, असे ३५ वर्षीय स्मिथ म्हणाला. बुमराहने स्मिथला शून्यावर पायचित केले होते.

(वृत्तसंस्था)


# डिंग-गुकेशदरम्यानचा चौथा डाव अनिर्णीत

### जागतिक बुद्धिबळ स्पर्धा

◆ **सिंगापूर, २९ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत शुक्रवारी भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश व विद्यमान विश्वविजेता चीनचा डिंग लिरेन यांच्यादरम्यानचा चौथ्या फेरीचा सामना ४२ चालीत अनिर्णीत राहिला. याबरोबरच दोघेही आतापर्यंत प्रत्येकी २ गुणांसह बरोबरीत आहे.

बहुतांश सोंगड्या पटातून निघून गेल्यानंतर गुकेशचा हत्ती व डिंग लिरेनचा राजा यांच्यात थोडीशी झुंज झाल्यानंतर स्पर्धेतील तिसऱ्या




डावाप्रमाणे हा डाव अनिर्णीत राहिला.

२०२४ च्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत पांढऱ्या सोंगट्यानिशी आपला दुसरा डाव खेळताना डिंग लिरेनने डाव बरोबरीत राखण्याचा प्रस्ताव स्वीकारला.

पहिला व तिसरा डाव गुकेश पांढऱ्या सोंगट्यांसह खेळला. यात एकात डिंगने विजय मिळवला आणि दुसरा गुकेशने जिंकला.दुसरा डाव बरोबरीत राहिला.

(वृत्तसंस्था)

### २०२५ मध्ये भारतात फिडेची प्रमुख स्पर्धा होण्याची शक्यता

फिडे ही जागतिक बुद्धिबळ प्रशासकीय संस्था २०२५ मध्ये भारतात 'अत्यंत मोठी बुद्धिबळ स्पर्धा' आयोजित करू शकते, असे संकेत फिडेचे महासंचालक एमिल सुतोव्स्की यांनी दिले. आम्ही अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ (एआयसीएफ) सोबत सतत चर्चा करत आहो व तामिळनाडूशीही संबंध आहे. २०२२ मध्ये महाबलीपुरम येथे ऑलिम्पियाडपूर्वी अर्कांडी ड्वोरकोविच हे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांना भेटले होते. मला विश्वास आहे की कदाचित २०२५ मध्ये भारतात प्रमुख बुद्धिबळ स्पर्धा होईल, मी तमिळनाडूमध्ये म्हणत नाही, परंतु भारतामध्ये स्पर्धा निश्चित होईल, असे ते म्हणाले.

# बावुमा, स्टब्सच्या शतकांमुळे दक्षिण आफ्रिका मजबूत स्थितीत

◆ **डर्बन, २९ नोव्हेंबर**

येथे श्रीलंकेविरुद्ध सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवशी ट्रिस्टन स्टब्स आणि कर्णधार टेम्बा बावुमाने झळकावलेल्या शतकांच्या बळावर यजमान दक्षिण आफ्रिकेने १००.४ षटकांत ५ बाद ३६६ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला आणि पाहुण्या श्रीलंकेसमोर विजयासाठी ५१६ धावांचे लक्ष्य ठेवले. धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेने शेवटचे वृत्त आले तोपर्यंत २५ षटकांत ३ बाद ९६ धावा काढल्या होत्या व त्यांना आणखी ४२० धावा काढण्याची गरज आहे. त्यावेळी दिनेश चंडीमल २६ धावांवर, तर कामिंदू मेंडिस ९ धावांवर खेळत होते.




दक्षिण आफ्रिकेने ३ बाद १३२ धावांवरून पुढे आपल्या दुसऱ्या डावास सुरुवात केली. कालचे नाबादवीर ट्रिस्टन स्टब्स व टेम्बा बावुमाने खंबीरपणे फलंदाजी करत स्वतःचे शतक साजरे केले व संघाला ३६६ धावांचा टप्पा गाठून दिला. याचवेळी दक्षिण आफ्रिकेने आपला दुसरा डाव घोषित केला. स्टब्सने २२१ चेंडूंत ९ चौकार व २ षट्कारांसह १२२ धावांचे, तर बावुमाने २२८ चेंडूंत ९ चौकारांसह ११३ धावांचे योगदान दिले. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी २४९ धावांची भागीदारी केली.

स्टब्सचे हे दुसरे कसोटी शतक ठरले, ३४ वर्षीय बावुमाचे हे केवळ तिसरे शतक ठरले.

दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका हे दोघेही लॉर्ड्सवर पुढील जूनच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत विजयाचा पाठलाग करत आहेत. दुसरी कसोटी पुढील गुरुवारपासून गकेबरहा येथे सुरू होणार आहे.

(वृत्तसंस्था)

# हार्दिक पांड्याची तुफान फटकेबाजी

### सय्यद मुश्ताक अली चषक क्रिकेट

### एका षटकात ६, ०, ६, ६, ४, ६

◆ **इंदूर, २९ नोव्हेंबर**

भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या सध्या सुरू असलेल्या सय्यद मुश्ताक अली चषक क्रिकेट स्पर्धेत इंदूरच्या होळकर स्टेडियमवर त्रिपुरा विरुद्ध बडोद्याकडून खेळताना जोरदार फटकेबाजी केली. त्याने एका षटकांत ६, ०, ६, ६, ४, ६ ठोकलेत.

या वर्षी जूनमध्ये भारताच्या टी-२० विश्वचषक २०२४ चे विजेतेपद जिंकण्यात मोठी भूमिका बजावणाऱ्या



या ३१ वर्षीय उजव्या हाताचा फलंदाज हार्दिक पांड्याने शुक्रवारी कृणाल पांड्याच्या नेतृत्वाखालील संघासाठी केवळ २३ चेंडूत ४७ धावा केल्या. तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आला आणि क्रीजवर थांबताना त्याने तीन चौकार व पाच षट्कार मारले. त्या पाच षट्कारांपैकी त्याने एकाच षटकात चार षट्कार मारले. बडोद्याच्या डावाच्या १०व्या षटकात त्रिपुराचा फिरकी गोलंदाज परवेझ सुलतानला पहिल्या, तिसऱ्या, चौथ्या आणि सहाव्या चेंडूवर षट्कार मारला आणि पाचव्या चेंडूवर चौकार मारला.

(वृत्तसंस्था)

# कोहलीला शतक पूर्ण करू दिल्यामुळे ऑस्ट्रेलिया संघावर ॲलन बॉर्डर नाराज

◆ **मेलबर्न, २९ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलिया संघाने ज्या प्रकारे कोहलीचा जास्त प्रतिकार न करता त्याला शतकी खेळी करू दिली, त्यामुळे मी खरोखर निराश झालो, असे ऑस्ट्रेलिया संघाचे माजी कर्णधार ॲलन बॉर्डर म्हणाले.

याचवेळी त्यांनी ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सच्या डावपेचांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कोहलीला नुकत्याच झालेल्या घरच्या मालिकेत न्यूझीलंडविरुद्ध खेळताना संघर्ष करावा लागला होता, परंतु येथे ऑस्ट्रेलियाने त्याला पुन्हा लय मिळवण्याची संधी दिली. ऑस्ट्रेलियन भूमीवर कोहलीचे शतक सातवे शतक ठरले.

माजी सलामीवीर मॅथ्यू हेडननेही पॅट कमिन्सवर निशाणा साधला व कोहली मध्यभागी आल्यानंतर मैदानावरील क्षेत्ररक्षणाच्या नियोजनावर टीका केली.

विराट कोहलीसोबतच्या डावाच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्या युक्त्या चुकल्या, असे हेडन म्हणाला.

(वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त

### विठ्ठल मंदिरात ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी साजरी



**अक्कलकोट, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित देवस्थानच्या ए-वन चौक येथील श्री उपलप विठ्ठल मंदिरात गुरुवार २८ नोव्हेंबर रोजी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यतिथी मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाली. देवस्थानच्या विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली सत्संग महिला भजनी मंडळाच्या वतीने दुपारी ४ ते ६ या वेळेत भजन संपन्न होऊन नामस्मरण सोहळा संपन्न झाला. त्यानंतर मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या उपस्थितीत प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते संत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती संपन्न झाली. त्यानंतर सर्व भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला. याप्रसंगी सत्संग महिला भजनी मंडळाचे उज्वलाताई सरदेशमुख, कौशल्या जाजू, सुरेखा तेली, निंगूताई हिंडोळे, शकुंतला कटारे, सुरेखा जाधव, प्रदीप हिंडोळे, संजय मोरे, स्वाती जाधव, वंदना शिर्के, शशिकला मडीखांबे, सुवर्णा जाधव, संजय मोरे, काशिनाथ इंडे, रवीराव महिंद्रकर, दीपक बागेवाडीकर, सोनी चव्हाण, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, संजय पवार, विपुल जाधव, सागर गोंडाळ आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.



### विधानसभेत व्यवस्थेचा झाला विजय, महाराष्ट्राचा झाला पराजय : चाकोते

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादलचे प्रभारी प्रदेशाध्यक्ष सुदीप चाकोते यांनी आपल्या कार्यालयात काँग्रेसच्या निवडक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे बैठक घेतली. अशाच पद्धतीने वेगवेगळ्या प्रभागातून व मतदार संघातून दररोज वीस ते पंचवीस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची वेगवेगळी बैठक घेऊन त्यांचे समस्या व अडचणी जाणून घेऊन दूर करण्यात येणार आहे व पुढील महिन्यात एक मोठा मेळावा काँग्रेस सेवादल च्या वतीने घेणार आहे. यावेळेस त्यांनी बोलताना सांगितले की.नुकतेच झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या अनाकालनीय निकालानंतर ईव्हीएम मशीन सहित व्यवस्थेचा निषेध करतो. ज्या पद्धतीने महाराष्ट्राच्या जनतेची विश्वासघात करत सत्तेच्या लाचारीसाठी सर्व सरकारी यंत्रणा व्यवस्थेचा गैरवापर करून सत्तेत आलेल्या या हुकूमशाही महायुती सरकारचे तीव्र निषेध.काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी खचून जायचं कारण नाही आम्ही सर्व संघटित होऊन येणाऱ्या महापालिका निवडणूक असो जिल्हा परिषद,पंचायत समिती, सर्व निवडणुकीसाठी आम्ही तयार आहोत.आणि ईव्हीएम विरोधात संपूर्ण देशात आमचे पक्षश्रेष्ठी चे आदेश देतील त्या अनुषंगाने तीव्र आंदोलन करण्यात येईल.पुन्हा एकदा सोलापूर काँग्रेसमय झाल्याशिवाय कार्यकर्त्यांनी स्वस्त बसू नये. असे आव्हान केले. यावेळेस माजी नगरसेविका वीणाताई देवकते, नूरअहमद नलवार, मल्लिनाथ सोलापूरे, संजय कुऱ्हाडे, श्रीकांत दासरी, कयूम बलौलखान, शंकर भोसले, मंजुळे, रेखाताई बेनेकर, श्रीकांत दासरी रविकांत पाटील, बोरुडे, आकाश टिपराधी, चंद्रकांत टिक्के, जब्बार शेख आदी उपस्थित होते.



### चिंचोलीत महात्मा फुलेंना 'जोशाबा'च्या वतीने अभिवादन

**पांगरी, दि. २९ नोव्हेंबर-**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त चिंचोली जोशाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी धनाजी पाटील हे अध्यक्ष म्हणून लाभले होते. कार्यक्रम ाच्या प्रारंभी सरपंच अमर कसबे, दिलीप यांना, सुरेश यांना पोलीस पाटील यांच्या हस्ते शाहू, फुले, आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. अध्यक्ष पदावरून बोलताना धनंजय पाटील यांनी महात्मा फुले यांची स्त्री शिक्षणासाठी स्त्रियांची पहिली शाळा चालू केली व अस्पृश्य समाजासाठी पहिला पाण्याचा हौद खुला केला म्हणून स्मृतिदिन हाच खरा शिक्षक दिन साजरा करावा असे मत मांडले. दिलीप यांना, सुरेश शिंदे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. दत्तात्रय यांना, जाधव बेडे, अजित कसबे, रमेश शिंदे, खुणे उपस्थित होते. प्रास्ताविक पत्रकार व संस्थेचे अध्यक्ष अनिल खुणे यांनी केले.



### श्रीकांत भारतीय यांनी घेतले विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, दि. २९ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य श्रीकांत भारतीय यांनी श्री शुक्रवारी (दि.२९) विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी मंदिर समिती सदस्या शकुंतला नडगिरे उपस्थित होत्या.

# ५१ हजार स्वाभिमानी मतदारांनी माझ्यावर विश्वास ठेवला

**माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२९ नोव्हेंबर-**

प्रचंड आर्थिक ताकद आणि घाणेरडे राजकारण याला नाकारून ५१ हजार स्वाभिमानी मतदारांनी स्वतःच्या मताची पैशांत किंमत न करता माझ्यावर विश्वास ठेवला याच स्वाभिमानी मतदारांच्या जोरावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपूर्ण ताकदीने लढवणार आणि जिंकणार असा विश्वास माजी आ.दिपकआबा साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केला.

ते शुक्रवार दि.२९ नोव्हेंबर रोजी सांगोला येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ते विचार विनिमय बैठकीत बोलत होते. यावेळी हजारो दिपकआबा प्रेमी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना दिपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, मी सत्तेचा सारीपाट घेऊन जन्माला आलो नाही.



कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव निवडणूक लढवली आणि पराभवाला सुद्धा ताठ मानेने सामोरा गेलो मी माझ्या पूर्वजांची पुण्याई सांगून आणि जाती पातीचे राजकारण करून मते मागितली नाहीत. झालेला पराभव मान्य करून दुसऱ्या दिवसापासून आपण पुन्हा जनतेच्या सेवेत सक्रिय झालो आहे.

शेवटच्या श्वासापर्यंत माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे जात पात पक्ष पार्टी न पाहता प्रामाणिकपणे काम करत राहीन. तसेच या निवडणुकीत मदत करणाऱ्या सर्व स्वाभिमानी मतदार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि काँग्रेसचे प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, अभिषेक कांबळे व सहकाऱ्यांचे त्यांनी आभार मानले. यावेळी तानाजी पाटील, आर.डी.पवार, पियुष साळुंखे, शिवाजी बनकर, शिवाजी कोळेकर, राज मिसाळ, संभाजी हरिहर, अजित देवकते, नितीन रणदिवे, विजय इंगवले, भारत नागणे, रफिक काझी, प्रा. अनिल नवत्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आबांनी सत्तेत रहावे असा सूर व्यक्त केला.

#### बापूंनी जबाबदारी घ्यायला हवी होती

सांगोला तालुक्याचे कुटुंबप्रमुख आणि माझा मोठा भाऊ म्हणून शहाजीबपू पाटील यांनी एकत्र राहण्याची जबाबदारी घ्यायला हवी होती. मी २ वर्षापासून शहाजीबापूंना आपण एकत्र राहूया असा आग्रह करत होतो. त्यासाठी आपल्याला एकत्रितपने प्रयत्न केले पाहिजेत. वरिष्ठांना भेटून आपल्या दोघांची भूमिका मांडली पाहिजे म्हणून वारंवार पाठपुरावा करत होतो. परंतु मोठा भाऊ म्हणून जबाबदारी पार पडायला हवी होती असे दीपकआबांनी स्पष्ट केले.

## तालुक्यातील प्रत्येक निवडणूक ताकदीने लढवू

**राष्ट्रवादीच्या आत्मचिंतन बैठकीत अनिल सावंत यांचे प्रतिपादन; उमेदवार म्हणून मी पराभवाची जबाबदारी स्वीकारतो**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची जबाबदारी उमेदवार म्हणून मी घेतो. कुठलाही कार्यकर्ता, कुठलाही पदाधिकारी, पक्ष कमी पडला असे मी म्हणणार नाही. कुठलाही सहकारी कमी पडला नाही, पक्षाने मला उमेदवारी दिली, त्यामुळे मी जबाबदारी घेतो. येणारा काळ हा राष्ट्रवादीचा आणि पवार साहेबांच्या पक्षाचा असेल, अशी खात्री राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांनी कार्यकर्त्यांना दिली.

यावेळी माजी पालकमंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, रतनचंद शहा सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल शहा, मंगळवेढा शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी आदी प्रमुख उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाची विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मंगळवेढा येथे विचारमंथन बैठक संपन्न झाली. यावेळी प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, राहुल शहा यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी हि मनोगत व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना सावंत म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत ज्या प्रमाणे जनता सोबत होती, तशीच जनतेची साथ यावेळी सुद्धा होती, लोकांनी आपल्याला मतदान केलेले आहे, दहा पैकी सात आठ लोकांनी तुतारीला मतदान करणार असल्याचे लोक बोलत होते. विधानसभा निवडणुकीतील हा पराभव कसा झाला, याबाबत संपूर्ण महाराष्ट्र हळहळतोय, पवार साहेबांचा पक्ष, उद्धव साहेबांचा पक्ष संपवण्याचे हे कारस्थान आहे, असे दिसते.




#### जोमाने लढण्याचे पक्षाचे आदेश

दोन दिवसांपूर्वी पक्षाची बैठक झाली, त्यावेळी पक्षाने नव्या जोमाने पुढे जाण्याचे सांगितले आहे. जे वातावरण आज दिसते आहे, ते पुढील काळात नसेल, आपल्याकडून हा निकाल हिसकावून घेतला आहे, त्यांनी जिंकूनही आनंद साजरा केलेला नाही. आगामी निवडणूक आपण लढवणार आहोत, असे सावंत यांनी सांगितले.

#### गावागावात शाखा काढणार

गावागावात आपण शाखांचे नियोजन करू, आपल्या सुख दुःखात अनिल सावंत, भैरवनाथ शुगर्स परिवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या सोबत असेल अशीही खात्री यावेळी सावंत यांनी दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सीना-माढा योजनेचे वीज पंप शासनाच्या मालकीचे

**अभियंता आर. पी. मोरे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २९ नोव्हेंबर-**

सीना-माढा उपसा जलसिंचन योजनेचे वीज पंप हे शासनाच्या मालकीचे असल्याने ते काढून नेण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे कार्यकारी अभियंता आर. पी. मोरे यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीत शिंदेचा पराभव झाल्यानंतर त्यांनी सीना माढा उपसा जलसिंचन योजनेच्या पंप हाऊसमधील वीज पंप काढून नेल्याची चर्चा गेल्या दोन दिवसांपासून सुरू झाली होती यामुळे नेमकी वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी कार्यकारी अभियंता आर पी मोरे यांच्याशी भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी ही योजना शासनाची आहे आणि येथील पंप हे शासनाच्या मालकीचे आहेत ते काढून नेण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे सांगितले.

सीना-माढा उपसा जलसिंचन योजना मुळात अर्धवट अवस्थेत आहे आणि ही योजना चालविण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ देखील शासनाच्या पाटबंधारे विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही या परिस्थितीत ही योजना चालू रहावी यासाठी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जात होते या योजनेचे वीज बिल भरता यावे यासाठी कारखाना लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून पाणीपट्टीची रक्कम कापून घेऊन पाटबंधारे विभागाकडे पाठवत होती आजवर हे सुरळीतपणे सुरू होते मात्र विधानसभा निवडणुकीत शिंदेचा पराभव झाल्याने या योजनेबाबत अफवांचे पेव फुटले आहे या पार्श्वभूमीवर उजनी धरण व्यवस्थापनचे कार्यकारी अभियंता आर पी मोरे यांच्याशी पत्रकारांनी संपर्क साधला असता त्यांनी उपरोक्त माहिती दिली.

### शिक्षण विभागाचा आता गुरुवारी संवाद दिन

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

शालेय शिक्षण विभागांतर्गत शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद सोलापूर विभागाकडील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित सलंग्र सर्व शाळेवर कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी तिरस्या गुरुवारी संवाद दिन घेणार असल्याचे शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालयाने सांगितले.

महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी दुपारी ३ वाजता हरिबाई देवकर प्रशाला येथे संवाद दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. प्राप्त निवेदनावर कार्यवाही करण्यातय येणार आहे.

## विविध उपक्रमांनी शहीद मेजर कुणाल मुन्नागीर गोसावी यांना अभिवादन

**विविध शाळांमध्ये चित्रकला स्पर्धा; ७१ जणांनी केले रक्तदान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ नोव्हेंबर-**

शौर्यचक्र प्राप्त शहीद मेजर कुणाल गोसावी यांचा आठवा पुण्यस्मरण कार्यक्रम शुक्रवारी विविध कार्यक्रमाने संपन्न झाला.

वाखरी येथील शहीद मेजर कुणाल गोसावी यांच्या स्मारकास विविध मान्यवरांच्या हस्ते आदरांजली वाहण्यात आली. त्यामध्ये प्रमुख अतिथी कर्नल दीपक एम. ठोंगे संचालक- सैनिक कल्याण विभाग, पुणे, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, सैनिक कल्याण विभाग जिल्हा सोलापूरचे अधिकारी मिलिंद तुंगारे, आमदार अभिजीत आबा पाटील, प्रणव परिचारक, कर्नल एच. एल. बोंगे, वाखरीचे उपसरपंच दत्तात्रय चव्हाण उपस्थित होते. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे एनसीसी प्रमुख एस. एस. माने व एनसीसीचे सर्व कॅडेट्सनी मानवंदना दिली. माजी सैनिक व माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष बळीराम चौगुले व लक्ष्मण वाघमारे तसेच रिटायर सुभेदार गोफणे उपस्थित होते. यानंतर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून देशाची सेवा करताना प्राणाची आहुती दिलेल्या वीर जवानांच्या कुटुंबीयांचा सन्मान प्रति व्यक्ती अकरा हजार रुपयांचा धनादेश देऊन करण्यात आला. दोन ॲथलेटिक्समधील कॉलेज शिक्षणातील मुलींना शूज घेण्याकरिता वीर पिता मुन्नागिर गोसावी व वीर माता वृंदादेवी गोसावी यांच्या हस्ते एकोणीस हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. या दोन्ही गायत्री मासाळ व सानिका ऐवळे मुली पंढरपूरच्या रहिवासी आहेत. शाळांमध्ये चित्रकला घेण्यात आली. सूत्रसंचालन सतीश बुवा यांनी केले, प्रास्ताविक वीरपिता मुन्नागिरी गोसावी यांनी केले. आभार महेश म्हेत्रे यांनी मानले. यावेळी ७१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमास पंढरपूर शहरातील सर्व मान्यवर गोसावी कुटुंबातील सदस्य, दशनाम गोसावी समाजातील मान्यवर, वाखरी येथील ग्रामस्थ व सर्व सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर देखील कार्यक्रमास उपस्थित होते कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने करण्यात आली.



#### यांचा करण्यात आला सन्मान

वीर पत्नी लक्ष्मी महादेव पवार सांगली, वीर पत्नी सोनाली रामचंद्र घाडगे पंढरपूर, वीर पत्नी पूजा शंकर उखळीकर कराड, वीर पत्नी सुनीता अनिल कळसे, कराड वीरमाता मंगल नंदकुमार फराटे पुणे, वीर पत्नी गोदावरी पांडुरंग तावरे बीड, वीर पत्नी यशोदा केशव गोसावी सिन्नर, वीर पत्नी वैशाली अमोल गोरे वाशिम, वीरमाता बेबी संपतराव भोईटे सातारा ,वीर पत्नी अर्चना बालाजी डुबुकवाड पुणे, वीर पत्नी शिवानी तेजसिंग साळुंखे सोनंद इत्यादींचा सन्मान प्रमुख अतिथींच्या व गोसावी कुटुंबीयांच्या हस्ते करण्यात आला.

## एक्सपायरी डेट; मरणाचा इव्हेंट

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

**संकल्प यूथ फाऊंडेशने गुरुवारी 'एक्सपायी डेट' हे नाटक सादर केले. याचे लेखक चैतन्य सरदेशपांडे तर सागर देवकुळे यांनी दिग्दर्शन केले.**

एका सोसायटीत एका वृद्धाचा मृत्यू झाला आहे आणि त्याच्या अंत्ययात्रेची तयारी सुरू आहे. या प्रसंगावर नाटकाची सुरुवात होते. यात तरूण मुलांचा 'उत्साह' विशेष करून तरुणांचा म्होरक्या राजा . यांना डीजे लावून नाचायचं आहे. पुष्कळ जमातीमधे मरण म्हणजे दु:ख नसून आत्म्याच्या मुक्तीचा सोहळा साजरा केला जातो.संत वाड्.मयात उल्लेख आढळतात. इथेही तेच घडते आहे पण वेगळ्या पद्धतीने. विनोदी अंगाने मांडलेला गंभीर विषय

ब्लॅक कॉमेडी, बदलती सध्याची पिढी, परदेशी राहून पैसे पाठवून आई-वडिलांवर उपकार करत असल्याचे दाखवणारा मुलगा अजय. तरूण मुलांत तरूण होऊन नाचणारा नाना, मेलेल्या म्हाताऱ्याची म्हातारी बायको. नाचताना नानाला त्रास होतो. डॉक्टर (?)येतात. काय झाले याचे निदान न सांगता विचार करत राहतात कारण त्यांचा मूळ धंदा एक्सपायरी डेट काढण्याचा. हल्ली कोणत्याही गोष्टीचा 'धंदा' होतोय ही सत्य परिस्थिती.पण ग्रहमान निश्चित सेकंदासहित मरणाची वेळ कुणालाही सांगता येत नाही.त्या गोष्टीतील फोलपणा वडिलांची डेट कळल्यावर आईलाही तुझी तीच डेट काढून घे म्हणजे येण्या-जाण्याचा डबल खर्च होणार नाही असा अत्यंत व्यवहारी सल्ला देणारा पोटचा मुलगा.



डेट निघते ठामपणे म्हणून रिटर्न गिफ्ट सह मुलगा येतो पण नानांचा मृत्यू होत नाही.आपली ट्रिप फुकट गेली म्हणून अजय परत जातो आणि आपण वाचलो या आनंदात नाना आणि पत्नी प्रभा डीजेच्या हृदयी वसंत फुलतानाच्या तालावर आनंदात नाचतात इथे नाटक संपते. या एकांकिकेचे नाटक करताना आणि पैसे वसूल केल्या प्रमाणे दुपारी २.00ते रात्री १०.00 सेट लावणे ते नाटक संपेपर्यंत वेळ वसूल करणारी नाटके. हे बघितलं की थक्क होतो असो.

कथानक आजच्या काळातील घटना धरून. कुणी मेलं का काय झालं कशाचंच सोयरसुतक नाही. मरणाच्या आणि १४ व्याच्या आमंत्रण पत्रिका छापणे १४ व्याला यायचं असा आग्रह. मरण विधीची कॉमेंट्री, पत्रिका वाटप, कोणत्या पद्धतीनं मरणार याची रंगीत तालीम आणि बाप मेलाच नाही म्हणून मुलांचं चिडणं, पांढरी साडी फुकट गेली म्हणून बायको नाराज. या अवस्था दाखविल्या. आमंत्रण पत्रिकेवर मायकेल जॅक्सन प्रसन्न लिहिणे, राम नेम इज ट्री हा उपहास, मरणाचा एजंट, मरणाचा क्लास कोणता? किंगपालासिनो का बेगर थर्ड क्लास? मरणाचा इव्हेंट हे सगळं गंभीर प्रकरण विनोदी अंगाने टीका करत स्पष्ट केलं. रडण्यासाठी पैसे देऊन आणलेल्या बायकांची प्रतवारी केली जाते या सर्व गोष्टी प्रेक्षकांना पटल्या, टाळ्याही मिळाल्या.

नेपथ्यात सोसायटीची मोकळी जागा,त्यात एक बाकी, मागील बाजूने वर जाण्यासाठी जिना, नानांचे मध्यम वर्गीय घर, बाल्कनी असा छान सेट उभा केला. होता. संगीत बीजे संमिश्र म्युझिक, नानांच्या मुलांचा सीन दाखवताना पाश्चात्य संगीत वापरले आणि प्रसंगाना उठाव मिळाला. प्रकाश योजनेत फारसा वाव नव्हता. रंगभूषा पात्र आनारूप होती. म्हातारी, नाना आणि राजा यांची वेशभूषा छान होती. नानाचं काम करणारे अभिजीत दुपारगुडे तरुणात तरूण होऊन नाचताना छान शोभले. मुलाशी बोलताना गांभिर्य आणि राग अजून स्पष्ट होणे गरजेचे होते. त्यांना पत्नी प्रभावी आणखी साथ मिळाली असती तर मजा आली असती. अश्विनी मिटकरी यांची म्हातारीची सहजता, कधी चइडणं, नानांनी घसटीनं वागणं, देहबोली नाटकाला उठाव देणारी होती. प्रभावी भूमिका करणाऱ्या वैशाली बनसोडे यांचे बोलणे, हालचालीतील सावकाश पणा याकडे दिग्दर्शकाने लक्ष देणे आवश्यक होते. स्काइपवर बोलताना दोघं ही जण समोरासमोर असल्यासारखे बोलत होते याकडेही लक्ष देणे गरजेचे होते. नाटकाचा नायक राजू सिद्धेश्वरैय्या स्वामी यांचा राजू बेधडक, बिनधास्त लवचिक होता. एनर्जी लेव्हल कमाल होती. स्वामींच्या कामावर दाक्षिणात्य कलाकारांच्या अभिनयाचा पगडा जाणवत होता. शेवट गोड हृदयी वसंत फुलताना पण ऊाच हाही उपहास एक तोलून धरलेला छान प्रयोग.

- **आजचे नाटक :** भयरात्र
- **वेळ व ठिकाण :** सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक :** रविशंकर झिंगरे
- **दिग्दर्शक :** संदीप जाधव

६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२४-२५



## तिवाडी यांचे अन्नपूर्णा मिठाई दिवाळी दुबई टूरचा लकी ड्रॉ १ डिसेंबरला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

५० हजार रू. मिठाई खरेदीवर देण्यात येणाऱ्या कूपनमधून लकी ड्रॉ काढली जाईल व विजेत्याला दुबई टूरचे बक्षीस मिळेल. केवळ एक नाही तर दोन बक्षिसांची अभिनव योजना सोलापूरचे अग्रणी मिठाई, नमकिन आणि बेकरी उत्पादक नंदकिशोर तिवाडी यांच्या अन्नपूर्णा नमकीन मिठाई आणि बेकरीद्वारे घोषित केली.

दिवाळीच्या खरेदीवर दुबई टूरची (२ बक्षिसे), सोन्याचे नाणे (२ बक्षिसे), आणि चांदीच्या नाण्याची (१०० बक्षिस) अशा भरघोस बक्षिसांची मालिका लकी ड्रॉ पद्धतीने संपन्न होत आहे. रविवार दिनांक १ डिसेंबर रोजी ही सोडत मान्यवरांच्या उपस्थितीत विजापूर रोडच्या, मंत्री चंडक पार्क मधील मयूर क्लासिक हॉल येथे सकाळी ११ वाजता काढली जाणार आहे. सर्व कूपन धारकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जे सोडतीच्या वेळेस उपस्थित असतील त्यातूनच विजेते घोषित केले जातील. नंदकिशोर तिवाडी म्हणाले, १९८१ पासून ग्राहकांच्या विश्वसनीयतेसाठी आम्ही गुणवत्ता, शुद्धता, स्वच्छता अबाधित राखण्यासाठी अविरत परिश्रम घेतले. आज सुमारे ७१%पेक्षा अधिक ग्राहक आमचे खरेदीदार आहेत, याचा आम्हाला अभिमान वाटतो. तसेच दर्जा कायम राखण्यास आमच्या उत्पादन विभागाने बजावलेली कामगिरी. त्यानंतर ग्राहकांशी थेट संवाद साधून ऑर्डर्स आणण्यासाठी साठी परिश्रम केलेल्या मार्केटिंग मॅनेजर शैलेश बजाज व टीम मुळे आम्ही हा पल्ला गाठू शकलो. ९५ एफएम रेडिओ चे सचिन खानापुरे हे असल्यानेच ही योजना आखली गेल्याचे श्रेय त्यांना जाते.



## सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे राज्यपालांच्या हस्ते सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

पुणे येथील सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे (आयएएस) यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते सेवा रत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

प्रशासकीय सेवेत विविध पदांवर आजपर्यंत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल आयएएस अशोक काकडे यांना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्यावर मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होता आहे.

## लग्नात बॅन्ड वाजवण्याच्या कारणावरुन जातीवाचक शिवीगाळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

लग्नात बॅन्ड वाजविल्याच्या रागातून जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. हा सोलापुरातील रविवार पेठेत बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडला.

यायाबत तक्रारदाराने (रा. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रुपेश साळुंखे (रा. सोलापूर) विरूध्द जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी यांचा मुलगा बॅन्डबाजा वाजविण्याचे काम करतो. विविध कार्यक्रमासह लग्नसमारंभात तो बॅन्ड वाजवितो. यातील आरोपीच्या ओळखीच्या व्यक्तीच्या लग्नसमारंभात फिर्यादीच्या मुलाने बॅन्डबाजा



वाजविला होता. त्याचे दहा हजार मागितल्याच्या कारणातून आरोपी चिडला होता.

त्याने फिर्यादीच्या मुलास फोनवरून शिवीगाळ केली होती. त्यानंतर तो फिर्यादीच्या घरासमोर आला, त्याने आम्हीच तुमची लग्ने केली आहेत, तुम्हाला एवढा माज आला का? असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ करून फिर्यादीच्या मुलास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने करत आहेत.

## श्रीदेवी मिठ्ठा यांचे निधन



**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील श्रीदेवी संजू मिठ्ठा (वय ५४) यांचे हृदयविकाराने शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्याच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्याची अंतयात्रा शनिवार, ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जवाहर नगर, जुना विडी घरकुल, राज मिमोरीयल शाळेजवळ या त्यांच्या राहत्या घरापासून निघणार असून अक्कलकोट रोड येथील स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. दैनिक तरुण भारतचे सीईओ श्रीनिवास बिनगुंडी यांच्या त्या बहीण होत.

### विजापूर रोडवरील बहुचर्चित पनाश टॉवर बांधकाम प्रकरण

# तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा : जामगुंडे

### बिल्डर- डेव्हलपर, आर्किटेक्ट यांना नोटीस मात्र महापालिका अधिकारी मोकाटच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

विजापूर रोडवरील बहुचर्चित तब्बल १७ मजली पनाश टॉवर इमारती संदर्भात बांधकाम परवानगीतील अनियमितता प्रकरणी महापालिका प्रशासनाने त्या बिल्डर- डेव्हलपर, आर्किटेक्ट यांना नोटीस बजावली आहे तर मग याप्रकरणी कागदपत्र तपासणी, पडताळणी आणि परवाना प्रक्रिया नियमानुसार पार न पाडणाऱ्या तत्कालीन संबंधित महापालिका अधिकाऱ्यांचं काय असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. याप्रकरणी महापालिकेचे तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून गुन्हा दाखल करावा, अशी मागणी माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी केली आहे.



बहुचर्चित पनाश टॉवर प्रकरणीतपासणीत व अहवालाद्वारे विविध अनियमितता संबंधीच्या बाबी आढळून आल्याने अखेर महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाच्या वतीने उपसंचालक नगर रचना यांच्या सहीने या इमारतीचे बिल्डर डेव्हलपर आणि आर्किटेक्ट इंजिनियर यांना नोटीस पाठवली आहे. कागदपत्रानीशी विविध बाबींचा खुलासा महिनाभरात करावा अन्यथा परवानगी रद्द करण्यात येईल, असे या नोटीसद्वारे स्पष्ट केले आहे. सोलापूर महापालिकेची दिशाभूल करणारी कागदपत्रे, मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नावे बांधकाम परवाना, विविध करारांचा भंग, महापालिका आणि टॉवरमध्ये मालकी हक्क प्राप्त होणाऱ्या प्लॉट धारकांची खुली जागा आणि झालेला कायद्याचा भंग, महापालिकेची व्यावसायिक जागा देण्याच्या करारावरील झालेली फसवणूक, टॉवरच्या मजबुतीचे प्रमाणपत्र नियमबाह्य या व विविध अनेक प्रकार यापूर्वी चव्हाट्यावर आले आहेत. या प्रकाराबाबत महापालिकेकडे विविध तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. बांधकाम परवानगीतील अनियमितते बाबत आलेल्या तक्रारीवरून महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार केलेल्या तपासणीत या प्रकरणी बेकायदेशीर व अनियमित बाबी आढळल्या आहेत, असे महापालिका बांधकाम परवानगी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणात बिल्डर डेव्हलपर यांना देण्यात आलेल्या नोटीसीमध्ये विविध ६ मुद्दे नमूद करण्यात आले आहेत. यामध्ये दि. २ मार्च २०२१ रोजी सादर केलेल्या फेर प्रस्तावामध्ये प्रस्तावित नकाशावर सर्व मिळकतदारांची स्वाक्षरी व संमती पत्र घेणे 'युडीसीपीआर' मध्ये नियमानुसार बंधनकारक असताना याची पूर्तता केलेली नाही. ही मुळ मंजूर झालेल्या ९ मजल्याच्या बांधकाम परवानगी प्रस्तावामध्ये स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट सादर केल्याचे संचिकेमध्ये आढळत होत नाही. युडीसीपीआर नुसार बांधकामास केंद्र शासनाचे इन्व्हायरोमेंटल क्लिअरन्स सर्टिफिकेट सादर करणे बंधनकारक असताना ते केलेले नाही.या इमारतीचे परवानाधारक आर्किटेक्ट- इंजिनियर यांनाही यांनाही कारवाईच्या फेऱ्यात घेतले आहे.

बेजबाबदारपणे चुकीचा प्रस्ताव सादर करून महापालिकेची दिशाभूल करून सुधारित बांधकाम परवानगी मिळवल्याचे दिसून येत आहे, असे महापालिकेने म्हटले आहे. दरम्यान, नियमानुसार आवश्यक प्रमाणपत्रे कागदपत्रे संबंधितांनी सादर केले नाही. तरीही तत्कालीन महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी बांधकामास वेळोवेळी परवानगी कशी काय दिली ? यामागे त्या अधिकाऱ्यांचा हेतू काय होता ? मुळ मंजूर झालेल्या ९ मजल्याच्या बांधकाम परवानगी प्रस्तावामध्ये स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट सादर केल्याचे संचिकेमध्ये आढळत नाही. असे असतानाही बेजबाबदारपणे तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांनी परवानगी दिली कशी ? परवाना प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावरील कनिष्ठ पासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत हा प्रस्ताव, हे प्रकरण नियमानुसार तपासले का नाही असे अनेक प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. तेव्हा याप्रकरणी त्या बिल्डर- डेव्हलपर, आर्किटेक्ट यांना नोटीस बजावली आहे तर मग तत्कालीन संबंधित महापालिका अधिकाऱ्यांचं काय? त्यामुळे आता तत्कालीन संबंधित महापालिका अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची गरज वर्तवली जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांची या प्रकरणी जबाबदारी निश्चित करणे महत्त्वाचे आहे तरच या प्रकरणाचा छडा पूर्णपणे लागू शकेल, अशी मागणी होत आहे.

#### तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

दरम्यान, पनाश टॉवर प्रकरणी महापालिकेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी महापालिका आयुक्त आणि महापालिका सहसंचालक नगर रचना यांना दिले आहे. प्रकरणाकडे तत्कालीन अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. भ्रष्टाचार झाला असल्याची शक्यता आहे, असा आरोप जामगुंडे यांनी केला आहे.

#### बोगस परवाना प्रकरणाप्रमाणेच अधिकाऱ्यांवर कारवाईची अपेक्षा

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रलंबित हे प्रकरण पुन्हा कार्यवाहीसाठी सज्ज झाले आहे. तेव्हा महापालिकेच्या अधिकाऱ्यांची गय केली जाऊ नये. यापूर्वी महापालिका आयुक्तांनी बांधकाम परवाना विभागातील बोगस बांधकाम परवाना वाटप प्रकरणी संबंधित चार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. अगदी त्याचप्रमाणे पनाश टॉवर प्रकरणीही महापालिकेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची गरज आहे.

## आमदार देवेंद्र कोठे यांनी घेतली पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांची भेट

● कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखल्याबद्दल मानले आभार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

शहर मध्य विधानसभेचे आमदार देवेंद्र कोठे यांनी शुक्रवारी पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांची पोलीस आयुक्तालयात भेट घेतली. विधानसभा निवडणुकीदरम्यान पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पोलीस प्रशासनाने उत्तम कामगिरी करत कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखल्याबद्दल आमदार श्री. कोठे यांनी पोलीस आयुक्तांचे आभार मानले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनीही आमदार देवेंद्र कोठे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी माजी नगरसेवक विनायक कोंड्याल, मेघनाथ येमूल, माजी नगरसेवक गुरूशांत धुत्तरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, निवडणुककाळात शहर मध्य विधानसभा मतदारसंघात सर्वच विशेषत: संवेदनशील मतदान केंद्रांवर पोलीस प्रशासनाने अत्यंत चोख बंदोबस्त ठेवल्याने कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. निवडणुकीच्या निकालानंतरही शहरात शांतता कायम ठेवण्यासाठी पोलिसांनी चांगले नियोजन केल्याचेही आमदार देवेंद्र कोठे याप्रसंगी म्हणाले.

पोलीस आयुक्त म्हणाले, आ. कोठे यांची कार्यपद्धती सर्वसमावेशक आहे. शहराच्या विकासासाठी त्यांचे मोठे योगदान असेल असा विश्वास आहे. नगरसेवक पदापासून आजवरची कामगिरी पाहता आमदार देवेंद्र कोठे यांचे भविष्य उज्वल आहे, असे कौतुकास्पद उदगारही पोलीस आयुक्त राज कुमार यांनी काढले.



## वही पुस्तकांचा संच देवून महिला आघाडीने केला आ.सुभाष देशमुखांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

उत्तर सोलापूर भाजपा महिला आघाडीच्या आघाडीच्यावतीने वही पुस्तकांचा संच देऊन तालुकाध्यक्षा वृषालीताई पवार यांनी आ. सुभाष देशमुख यांचा सत्कार केला.

याप्रसंगी उपस्थित महिला कार्यकर्त्यांनी यावेळी बापू साहेबांचे औक्षणही केले. विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतांनी निवडून आलेल्या आ. सुभाष देशमुख यांचा सर्व स्तरातील नागरिकांकडून सत्कार होत आहे. सत्कारासाठी बुके ऐवजी बुक द्या असे आवाहन सुभाष देशमुख यांनी केले होते. उत्तर सोलापूर महिला आघाडीच्यावतीने मोठा प्रतिसाद देण्यात आला. या सत्कार सोहळ्यासाठी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या ज्योतीताई अवताडे, तृप्ती सुपाते, मीना भाकरे, राधिका भोईटे, साधना मदने, पल्लवी पाटील, पल्लवी मुळे, महानंदा शिंदे, मनीषा डोके, संगीता भोसले यांच्यासह उत्तर सोलापूर तालुका भाजपा अध्यक्ष रामकाका जाधव, ओबीसी आघाडीचे अध्यक्ष धनाजी घोडके, सर्जेराव पाटील, सतीश लामकाने, सचिन लामकाने, संग्राम पाटील, संजय मुळे, नवनाथ जाधव, विनायक जागीरदार, अंबादास जगताप, बिरोबा सलगर, सुखदेव राठोड, लक्ष्मण लवटे यांच्यासह तालुक्यातील अनेक मान्यवर नेते उपस्थित होते.

**मान्यवरांकडून सत्कार**

सी ए राज मिणियार डॉक्टर बलदवा संतोष डांगे सूर्योदय फायनान्ससे प्रसन्न वाघमारे, दैदिप्य वडापूरकर, नितीन खडाखडे, शिक्षक परिषदेचे पदाधिकारी सुरेश राठोड, बाबू माने, मारुती तोडकर, यत्नाळचे सुनील हिरापुरे, राधाकृष्ण बंडगर, दक्षिण सोलापूर अनुसूचित जाती जमाती मोर्चा अध्यक्ष नितीन रणखांबे, उपाध्यक्ष लांडगे आदींनी आ. सुभाष देशमुख यांचे अभिनंदन केले.

## पालिकेतील मेळाव्यात बचत गटाच्या महिलांचा शहर स्वच्छतेचा निर्धार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी महिलांनी पुढाकार घेऊन आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घ्यावी. स्वयं सहाय्यता गटातील सर्व महिलांना विशेष स्वच्छता मोहिमेत सामावून घ्यावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

सोलापूर महापालिका , घनकचरा व्यवस्थापन विभाग व डीएवाय एनयुएलएम विभागाच्या वतीने विशेष स्वच्छता म ोहीम यशस्वी करण्यासाठी महापालिकेतील यशवंतराव सभागृह येथे शहरातील महिला बचत गटाच्या अध्यक्ष व सचिव यांची प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.


हा मेळावा महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, शहर प्रकल्प अधिकारी तैमुर मुलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक अनिल चराटे, शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.


या बैठकीमध्ये महापलिकेच्या वतीने दि.२ डिसेंबर २०२४ ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये विशेष स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये महिला बचत गटांचा सहभाग महत्वाचा आहे. त्यामुळे महिला बचत गटांना मोहिमेम ध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

या बैठकीमध्ये बचत गट महिलांकडून शहरातील स्वच्छतेबाबत अभिप्राय घेण्यात आला. त्यामध्ये सुधारणा होईल असा आराखडा तयार करण्याबाबत चर्चा करण्यात आली. ज्या बचत गट महिला कापडी पिशव्यांचा उत्पादन करतात. अशा बचत गटांना व्यापारी संघटनेसोबत म.न.पा.मार्फत जोडून देण्यात येईल. त्यामुळे शहरातून प्लास्टिकचा उपयोग कमी करण्यास मदत होईल.

अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी बचत गटाच्या महिलांसमोर आरआरआर या संकल्पनेची माहिती दिली. या आरआरआर सेंटर मध्ये ज्या नागरिकांकडे वापरात नसलेले कपडे, खेळणी, भांडे, उपकरणे इत्यादी असतील त्या नागरिकांनी या आरआरआर सेंटरमध्ये सुपुर्द करू शकतील. हे जमा केलेले साहित्य या बचत गट महिलांकडून नूतनीकरण करून वापरणे योग्य करून गरजू लोकांना ते वापरण्यास देता येईल. यामध्ये खाजगी संस्थेकडून सी एस आर फंड जमा करून त्या बचत गट म हिलांना प्रत्येक वस्तूप्रमाणे उत्पन्न होईल. अशा प्रकारची नियोजन आखण्यात येत आहे. या बैठकीम ध्ये साधारण २०० ते २५० बचत गटांच्या अध्यक्ष व सचिव व प्रतिनिधीची उपस्थिती होती. तसेच सर्व समुदाय संघटक, तसेच शहरातील सर्व मुख्य आरोग्य निरीक्षक उपस्थित होते.

भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
हाऊसफुल्ल गर्दीत सुरु
दुसरा आठवडा







12.30 PM | 03.30 PM 09.30 PM | 06.30 PM
Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार पिसे यांना जीवनगौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक तरुण भारतचे माजी संपादक विजयकुमार पिसे यांना पुण्यातील जिव्हेश्वर प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. खान्देशातील ज्येष्ठ पत्रकार, सहकार व राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ नेते स्व.माधवराव साळी यांच्या स्मृत्यर्थ प्रतिष्ठानकडून हा पुरस्कार देण्यात येईल. पिसे यांनी गेली चार दशके पत्रकारिता क्षेत्रात बातमीदार, उपसंपादक आणि संपादक पदापर्यंत प्रदीर्घ प्रवास केला व आजही माध्यमात कार्यरत आहेत.



या योगदानाबद्दल त्यांना पुरस्कार जाहीर केला आहे. पत्रकार पिसे दै. तरुण भारतमध्ये प्रारंभीपासून कार्यरत होते. तसेच रा.स्व. संघाच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक व ग्रामीण क्षेत्रात कार्यरत आहेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत प्रबोधन मंचच्या माध्यमातून महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. विश्व हिंदू परिषद पशचिम महाराष्ट्र प्रांत विभाग सहमंत्री म्हणून दायित्व आहे. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे संस्थापक पद्मश्री गिरीष प्रभुणे आणि डिक्कीचे संस्थापक पद्मक्षी डॉ. मिलींद कांबळे यांच्या हस्ते पिसे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### बलदवा नगरात घरफोडी; एक लाख दहा हजारांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

शेळगी परिसरातील बलदवा नगरात बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात आणि एक लाख दहा हजारांचा ऐवज चोरून नेला. हा प्रकार २६ ते २८ नोव्हेंबर दरम्यान घडला. याबाबत प्रशांत शिवानंद माडयाळ (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जोडभावी पोलीस ठाण्यात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील



फिर्यादी प्रशांत हे कामानिमित्त घर बंद करून २६ नोव्हेंबर रोजी बाहेर गेले होते. २८ नोव्हेंबर ते घरी परतले. त्यावेळी त्यांना त्यांच्या घराचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. त्यांनी घरात जाऊन दागिने ठेवलेल्या ठिकाणाची पाहणी केली. अज्ञात व्यक्तीने घराचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे विविध प्रकारचे दागिने चोरून नेले याची खात्री झाली. त्याची किंमत साधारण एक लाख दहा हजार इतकी असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या गुन्ह्याचा तपास सपोनि गायकवाड करत आहे.



### इन्स्टाग्रामच्या कारणावरून तरुणास बेदम मारहाण

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

इन्स्टाग्रामच्या कारणातून बाळे परिसरातील चंडक प्रशालेसमोर बुधवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास तरुणास जमावाकडून बेदम मारहाण करण्यात आला. याबाबत सहा जणांविरूध्द पोलिसात तक्रार नोंदविण्यात आली आहे. याप्रकरणी प्रथमेश अविनाश अंबुरे (वय १७, रा. निराळे वस्ती, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. अर्शद खालीद सय्यद (रा. संतोष नगर, बाळे), रहिम शेख, अरबाज शेख, सलीम शेख, रफिक शेख व अमन शेख (पत्ता नमूद नाही) विरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. २६ नोव्हेंबर रोजी यातील फिर्यादी आणि आरोपींमध्ये इन्स्टाग्रामवरून तक्रार झाली होती. त्याकारणातून चिडलेल्या आरोपींनी गुरूवारी सकाळी ११.३० वाजता बाळे परिसरातील चंडक शाळेसमोर फिर्यादीस बोलावून मारहाण केली. यादरम्यान आरोपीपैकी एकाने टणक वस्तुने डोक्यात आणि छातीवर मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या गुन्ह्याचा तपास हवालदार पवार करत आहेत.



### शहर गुन्हे शाखेच्या पथकाने केले दुचाकी चोरीचे पाच गुन्हे उघड

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

शहर गुन्हे शाखेच्या पथकाने दुचाकी चोरीचे पाच गुन्हे उघड करीत पाच जणांना अटक केली आहे. एकुण १ लाख ६५ मुद्देमाल हस्त करीत एमआयडीसी, जेलरोड, जोडभावी येथील दुचाकी चोरीचे गुन्हे उघड केलेले आहेत. मार्केट यार्डात हमालीचे काम करणाऱ्या एका युवकास कोयत्याने मारहाण करून गुन्हेगार पसार झाले होते.याबाबत जखमी युवकाच्या आईनं जेलरोड पोलिसांत फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल होता. आरोपी फरार होते. त्या त्या अनुषंगाने पोलिस निरीक्षक संजय क्षीरसागर व त्यांचे तपास पथकाने माहीती घेऊन दर्शन मनोज सराफ (वय१९ , रा.इंदिरा नगर, राठी कारखान्या जवळ), सुरज ऊर्फ भैय्या गुंडप्पा सुरवसे (वय२६, रा.भारत नगर, जुने विडी घरकुल, शिंदे शाळेचे पाठीमागे) बसण्णा सत्तु शिंदे (वय३०, रा.न्यु शिवाजी नगर, गोंधळे वस्ती) अक्षय सिताराम कांबळे (वय२४, रा. भारतरत्न इंदिरा नगर, गेंटयाल टॉकीज पाठीमागे) यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता,त्यांचेकडून ०३ दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. सहा पोलिस निरीक्षक दादासाहेब मोरे व त्यांचे तपास पथकास मिळालेल्या माहितीच्या रेकॉर्डवरील दुचाकी चोरणाऱ्या सुर्यकांत आप्पाराव हेलगर( वय-३९ वर्षे, रा.भवानी पेठ) यास ताब्यात घेवुन दुचाकी चोरीचे ०२ गुन्हे केल्याची कबुली दिली. दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

# आजपासून धावणार आणखी ६ इलेक्ट्रिक एसटी बसेस

● आता एकूण १६ इलेक्टिक बसेस प्रवाशाच्या सेवेत : विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

प्रवाशांच्या सेवेसाठी ब्रीदवाक्य घेऊन कार्यरत असणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी महामंडळाने प्रवाशांचा प्रवास अधिक लाभदायक व गतीने व्हावा, यासाठी अत्याधुनिक बसेसची निर्मिती करत आहेत. त्या अनुषंगाने एसटी महामंडळाच्या वतीने इलेक्ट्रिक बसेस निर्माण करून प्रवाशांच्या सेवेसाठी त्या राज्यातील विविध मार्गावर सोडण्यात येत आहेत.

दरम्यान, याच पार्श्वभूमीवर सोलापूर एसटी विभागाच्या ताफ्यात आता आणखीन नव्या ६ इलेक्ट्रिक बसेस दाखल झाले आहेत. आज शनिवार (दि.३०) नोव्हेंबर पासून सोलापूरकरांच्या सेवेत इलेक्ट्रिक बस सेवेत रुजू होत आहेत. यापूर्वीच्या १० आणि आता आलेल्या ६ अशा एकूण १६ इलेक्ट्रिक बसेस सोलापूर एसटी विभागाला प्राप्त झाल्या आहेत.

सद्या प्राप्त झालेल्या नव्या ६ बसेस सोलापूर ते लातूर या मार्गावर धावतील. सदर बसेस घ्या सोलापूर- तुळजापूर -उजनी औसा- लातूर व परत याच मार्गावरून परत सोलापूरकडे नियमितपणे धावतील. सदरील बसेसची वेळ ही सकाळी ६.०० वाजल्यापासून सुरू होऊन सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सुरू राहते. प्रत्येक अर्ध्या तासाला सोलापूर होऊन लातूरपर्यंत बस सेवा उपलब्ध राहील, सदची इलेक्ट्रिक बस ही संपूर्ण एसी असून, प्रवाशांना जलद, सुरक्षित व आरामदायी असा प्रवास करता येणार आहे.







### “ध्वनीप्रदूषण व हवाप्रदूषण विरहित प्रवासाचा लाभ घ्या

सोलापूर ते लातूर सकाळी ६.०० पासून सायंकाळी ५.३० पर्यंत एकूण १२ फेऱ्या लातूर ते सोलापूर सकाळी ९.०० पासून सायंकाळी ९.०० पर्यंत एकूण १२ फेऱ्या सदरील बसेस ह्या संपुर्ण इलेक्ट्रिक असतील, सदरील बसेस ह्या वातानुकूलित असतील, आरामदायी सीट्स असतील, सदरील बसेस मध्ये महिलांना ५० टक्के सवलत असेल, अमृतजेष्ठ नागरिकांना १०० टक्के सवलत असेल, जेष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत असेल तसेच ईतर सर्व सवलती असतील. सदरील बसेस ह्या ध्वनीप्रदूषण व हवाप्रदूषण विरहित असतील. तरी सर्व प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा, अशी विनंती सोलापूर विभागामार्फत करण्यात येत आहे

**-अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग**



## वेध सिध्दरामेश्वर यात्रेचे...

**सोलापूर : सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त नंदीध्वज काढण्यात येतात. १ डिसेंबरपासून नंदीध्वज पुजन करुन सरावास सुरुवात होते. याचे मानकरी चंद्रशेखर हिरेहब्बु पाहणी करताना.**







# आदिनाथ भगवान यांच्या मोक्षकल्याणक निर्वाण महोत्सवाने पंचकल्याणकाची सांगता

### दिगंबर मुनींचे कुंभारीकडे विहार प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

पंचकल्याणक महामहोत्सवाच्या पाचव्या दिवशी सकाळी सहा वाजता जाप अनुष्ठान, श्री जिनांचा अभिषेक, शांती धारा आणि ज्ञान कल्याण पूजन झाले. सकाळच्या सत्रात आदिनाथ भगवान यांचा मोक्षकल्याणकाने, निर्वाण महोत्सवाने पंचकल्याणकाची सांगता झाली.

शुक्रवारी सकाळी कैलाश पर्वतावरती आदिनाथ भगवान यांचा मोक्ष आणि अग्निकुमार इंद्र द्वारा अग्निसंस्कार विधी झाला. त्यानंतर निर्वाण महोत्सव, सिंह गुणा नुरोपण, मोक्ष कल्याण पूजन आणि विश्वशांतीसाठी महायज्ञ केला गेला. त्य मुनीश्रींचे मंगल प्रवचन झाले. पंचकल्याणांमध्ये तन-मन-धनाने योगदान दिलेल्या मान्यवरांचा यावेळी सन्मान झाला. सुनील गांधी, संजय गांधी, शशांक शहा ,संतोष शहा, राहुल शहा ,पुष्कर शहा, चंकेश्वरा, श्याम पाटील जाधव, हर्षवर्धन बुबने ,शिरसोडे, मोहन डांगरे ,कटके ,पराग शहा, डॉ. रणजीत गांधी प्रा. धनंजय शहा, संजय कंदले, प्रा. संजय शहा, मनीष शहा, पुष्कर शहा, अतुल शहा, मेहता, हर्षवर्धन शहा, बाहुबली शहा, यतीन शहा, विक्रांत शहा, महेश नळे, सीए शशांक शहा, परिमल शहा, आदर्श मेहता पद्म कुमार मेहता, प्रफुल्ल मेहता ,कामिनी गांधी निशा गांधी ,धनश्री मेहता, स्नेहा वनकुद्रे या मान्यवरांचा विशुद्ध सागर महाराजांचा फोटो असलेली फ्रेम, मोत्याची मनीमाळ, पंचरंगी दुपट्टा, तिलक लावून शास्त्र भेट देऊन सन्मान करण्यात आला.

### शोभायात्रेने लक्ष वेधले

सकाळी दहा वाजता भव्य शोभायात्रा निघाली. यामध्ये १२० वर्षांपूर्वीचा आदिनाथ मंदिरातील कोरीव काम असलेला चार घोडे असलेला लाकडी चांदीच्या रथामध्ये भगवंतांच्या मूर्ती ठेवून मिरवणूक काढण्याली. या मिरवणुकीत हत्ती, घोडे, बगीत इंद्र इंद्राणी, श्रावक श्राविका उपस्थित होते. सर्व मंत्रोच्चाराने संस्कारीत पंचकल्याणकातील मूर्तीचे श्रीजी वेदी, आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट शुक्रवार पेठ येथील मंदिरातील शिखरा मधील वेधिवरती प्रतिष्ठाचार्य बालब्रम्हचारी पियुष भैया यांच्या हस्ते मंत्रोच्चारात मूर्तीची विधी वरती स्थापना झाली.

### श्रावकांचे डोळे पाणावले...

दुपारी दिगंबर मुनी यांचे विहार प्रस्थान सोलापुरातून कुंभारीकडे शुक्रवारी दुपारी झाले. सोलापुरातील जैन समाज पाणवलेल्या डोळ्याने महाराजांना विनंती केली. अखेर त्यांचा विहार कुंभारीच्या दिशेने झाला.

### विद्यार्थ्यांचे लेझीम अन मनीपूर नृत्य

*गांधी नाथा येथील पंचकल्याणक महामहोत्सवात रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात महाआरती झाली. यावेळी गांधीनाथा प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे लेझीम, मनीपूर नृत्य सादर झाले.

* महावीर महिला मंडळ, जय जिनेन्द्र ग्रुप महिला मंडळ, रत्नत्रय महिला मंडळ, कुमारी सौंदर्य शहा, प्रतीक्षा विभुते विद्यार्थिनींनी नृत्य सादर करुन टाळ्यांची दाद मिळवली.



(छायाचित्र : केवल तिवारी)

## कचराकुंडीस आग...

**सोलापूर : कचरा जाळल्याने प्रदूषण होते. शहरात कचरा सर्रास कचरा जाळला जातो. त्यामध्ये भंगार वायरी जाळून आल्युमिनियम काढण्यात येते. शेजारी विध्दुत मंडळाच्या वायरी गेलेल्या असतात. यावर महापालिका प्रशासन कारवाई करणार का?पंचकट्टा परिसरात कचराकुंडी शुक्रवारी टिपलेले छायाचित्र.**

# भारत-नेपाळ महिला टी-२० क्रिकेट मालिकेसाठी सोलापूरचे चौघे

### भोसले कर्णधार, मल्लिनाथ याळगी संघव्यवस्थापक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

भारत-नेपाळ महिला टी-२० निमंत्रित क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली असून या संघाच्या कर्णधारपदी येथील रागिनी क्लबच्या ऋतू भोसले हिची निवड करण्यात आली आहे.

या संघात ऋतूसह अनिशा बिक्कड, मयूरी कदम व सृष्टी चन्ना यांचा समावेश आहे. तसेच या संघाच्या संघव्यवस्थापकपदी मल्लिनाथ याळगी यांची निवड झाली आहे. या स्पर्धा मिलान क्रिकेट क्लब झापा यांनी ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर दरम्यान आयोजित केली आहे. या दौऱ्यात पाच टी-२० सामने होणार आहेत. पांढऱ्या चेंडूवर आणि रंगीत कपड्यांवर ही मालिका खेळली जाणार आहे.

संघ : रुतु भोसले, अनिशा बिक्कड, मयुरी कदम, सृष्टी चन्ना निधी (रागिनी क्लब सोलापूर), फॅन्सी जान (जम्मू कश्मीर), निधी वागसिया, आकांशा (गुजरात), संस्कृती नॅन्सी, रोली, जिया, सुचिना (उत्तरप्रदेश), ममता यादव (मध्य प्रदेश), मनीषा उके, वीरपाल कौर (पंजाब), हरमनदीप कौर (पंजाब), संघ व्यवस्थापक : मल्लिनाथ संगप्पा याळगी.



ऋतू भोसले | अनिशा बिक्कड | मयूरी कदम | सृष्टी चन्ना | मल्लिनाथ याळगी

## गतवर्षातील दुष्काळाचा फटका... | तीन ते सव्वातीन महिनेच चालणार हंगाम

# जिल्ह्यात अवघे १३० लाख मे. टनापर्यंतच होणार ऊस गाळप

### आजतागायत ७ लाख ५६ हजार मे. टन ऊस गाळप

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

गतवर्षीच्या साखर आयुक्तालयाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात २०२३-२४ च्या गाळप हंगामात १६ नोव्हेंबर २०२३ पर्यंत एकूण १७४ साखर कारखान्यांनी गाळप सुरू केले होते. यामध्ये सोलापूरचे खाजगी आणि सहकारी असे ३५ साखर कारखाने सुरू होते. तर २०२४-२५ चा गळीत हंगामही १५ नोव्हेंबरपासून सुरू झाला असून, या हंगामात गतवर्षी दुकाळाचा फटका उसाला बसल्याने सोलापूर जिल्ह्यातील ३५ साखर कारखान्यात किमान १२५ ते १३० लाख मे. टन उसाचे यंदा गाळप होण्याची शक्यता प्रादेशिक सहसंचालक पांडुरंग साठे यांनी आज (दि. २९) दिली. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात आजतागायत ५६ हजार मे. टन उसाचे गाळप झाले आणि याचा साखर उतारा ५ लाख २९ हजार २२० क्विंटल इतका पडल्याचीही माहिती त्यांनी दिली.

१५ नोव्हेंबरपासून जिल्ह्यातील जवळपास सर्वच साखर कारखान्यांची धुराडी पेटली आहेत. गतवर्षी जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी ऊस मुबलक असल्याने १७० लाख मे. टन ऊस गाळप केला होता. गतवर्षी जिल्ह्यात साखरेचा सरासरी उतारा ७.१२ टक्केच्याही वर होता. मात्र २०२३-२४ साली दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने अनेकांनी ऊस मोडून इतर पिकांना मान्यता दिली. तर काही ठिकाणी ऊस पिके पाण्याअभावी जळून गेली.



यामुळे आगामी गाळपास जवळपास २५ टक्के ऊस कमी येणार आहे. त्यातच आता सीमावर्ती भागात साखर कारखाने लवकर सुरू होत असल्याने त्या साखर कारखान्यातही आपला ऊस मोठ्या प्रमाणात गेला आहे. यामुळे शिवारात उभा आहे तितकाच ऊस यंदा साखर कारखान्यांना मिळणार असल्याने यंदा कारखान्यांचे पट्टे लवकरच पडणार असल्याचे संकेत आहेत.

दरवर्षी राज्यात सर्वाधिक ऊस सोलापूर जिल्ह्यात गाळप होवून साखर उत्पन्नही मोठ्या प्रमाणात होते. यंदा जरी ऊस कमी असला तरीही पावसाच्या सरासरीच्या तुलनेत दीडपट पाऊस पडल्याने ऊस लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. यामुळे २०२५-२६ च्या सिजनला महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उसाचे उत्पन्न होणार आहे. कारण यावर्षी जूनच्या पहिल्या नक्षत्रापासूनच ते परतीच्या पावसापर्यंत सोलापूर जिल्ह्यात पाऊसधारा कोसळल्या आहेत. उजनी धरणही ओव्हरफ्लो झाले आहे. यामुळे जिल्ह्यात पाण्याचा मुबलक पाणीसाठा आहे. या कारणामुळे आगामी वर्षाच्या गळीत हंगामासाठी जिल्ह्यात मुबलक ऊस सापडणार आहे.

### विभागात ६ लाख ३४ हजार ९९५ क्विंटल साखर उत्पन्न

यावर्षी सोलापूर जिल्ह्यात १५ नोव्हेंबर ते आजतागायत ७ लाख ५५ हजार २५६ मे. टन इतका ऊस गाळप झाला आहे. तर याचे साखर उत्पन्न ५ लाख २९ हजार २२० क्विंटल इतके झाले आहे. तर धाराशिव जिल्ह्यातील २ लाख ११ हजार ३०८ मे. टन गाळप आणि १ लाख ५ हजार ७७५ क्विंटल इतके साखर उत्पन्न झाले आहे. तर विभागात ९ लाख ६६ हजार ५६४ मे. टन उसाचे गाळप होवून ६ लाख ३४ हजार ९९५ क्विंटल इतके साखरेचे उत्पन्न निघाले आहे.

**- पांडुरंग साठे, प्रादेशिक सहसंचालक, साखर आयुक्तालय पुणे**

### ऊस पिकांना ठिबकद्वारेच पाणी द्यावे

यंदा चांगला पावसाळा झाला आणि मुलबक पाणी असल्याने बहुतांश शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात दंडाद्वारे (वाप्यातून) मोकळे पाणी ऊस पिकास देतात. यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. यासाठी सर्वच शेतकऱ्यांनी ऊस पिकांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्याची गरज आहे. मुबलक पाणी असताना त्याचा वापर काटकसरीने शेतकऱ्यांनी केला तर शिल्लक पाणी उन्हाळी हंगामात वापरता येते. यासाठी आता जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कमी पाण्यात मुबलक उत्पन्न देणाऱ्या डाळिंब आणि रेशीम उत्पादनाकडेही वळावे. या उत्पादित मालालाही जगभरात चांगली बाजारपेठ मिळू लागली आहे.

### जिल्ह्यातील उजनीसह इतर मध्यम प्रकल्प सध्याही ओव्हरफ्लो

जिल्ह्यात यंदा मृगापासून परतीच्या पावसाने प्रत्येक नक्षत्रात जोरदार हजेरी लावल्याने जिल्ह्यातील सर्व तलाव, उजनी धरण भरले आणि आजही ते ओव्हरफ्लोच असल्याचे दिसत आहे. सध्या जिल्ह्यातील विविध धरणातील उपयुक्त पाणीसाठा असा. उजनी १०६.९४ टक्के, तर गतवर्षी याच दिवसात ३१ टक्के इतकाच पाणीसाठा होता. यानंतर जिल्ह्यातील मध्यम प्रकल्पामध्ये एखरूख ८९.२४ टक्के, हिंगणी पा. १०० टक्के, जवळगाव ९३.८७ टक्के, मांगी १०० टक्के, आष्टी, ७७.०१, बोरी ९८.८२, पिंपळगाव १०० टक्के इतके आहे. यामुळे यंदा उसाचा लागवड मोठ्या प्रमाणात होवून आगामी वर्षातील गळीत हंगामात मुबलक ऊस मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५९

**म्हणौनियां देवा । तूं वेगळा नव्हसी सर्वां ।**
**हें आलें मज सद्भावा । आतां तूंचि सर्व ।।**

एखादी चांगली गोष्ट, व्यक्ती आपल्या जवळ असेल तर बऱ्याचवेळा आपण तिची पाहिजे तेवढी किंमत करीत नाही. जेव्हा गोष्टीचे, व्यक्तीचे महत्व कोणीतरी पटवून देते किंवा ती गोष्ट आपल्यापासून दुरावते तेव्हा आपल्याला त्याची महती लक्षात येते. अर्जुनही आपल्याप्रमाणेच असल्याने श्रीकृष्ण परमात्मा सोबत असूनही त्याला त्यांची महती आजपर्यंत पटली नव्हती. त्यांच्याशी अरे-तूरे बोलणे, त्यांच्यावर आरोप करणे, त्यांना वाट्टेल ती कामे लावणे, त्यांना नांव ठेवणे, असे अनेक प्रकार अर्जुनाकडून घडले होते. पण विश्वरुप पाहिल्यानंतर श्रीकृष्णांची महती त्याला पटली. ही महती पटल्याने आता तो पुन्हा-पुन्हा मागील घटना आठवून क्षमा, याचना करीत आहे. भगवंतही तेवढया उदार अंतःकरणाचे आहेत. त्यामुळे ते त्याला क्षमायाचना न करु देता, उलट अर्जुनाच्या पुर्वीच्या वागण्याचा आपणाला आनंदच वाटला असे ते म्हणतात. निस्वार्थ प्रेम असेल तर, अशा लहान-सहान गोष्टी त्यात आपोआप विरघळल्या जातात. त्या एकमेकांना बोचण्याऐवजी उलट आवडणा-याच असतात. आपण लहाणपणी आई-वडीलांबरोबर खोडया केल्या, त्यांना वाट्टेल ती आपली कामे सांगितली, त्याला उलट-सुलट बोललो, तेव्हा त्यांनी त्याचा आनंद मानला हे आपणला निश्चित आठवत असेल. कारण आपल्या मुलां-बाळांवर निःस्वार्थ प्रेम करणे हा त्यांचा मुळ स्वभाव असतो. अगदी भगवंतांनीही



अर्जुनावर असेच प्रेम केले असल्याने, त्यांना अर्जुनाच्या पूर्वीच्या वागण्याचे काहीच अयोग्य वाटले नाही. नको त्या ठिकाणी ईश्वराला पाहून त्याची पूजापाठ, भक्ती, करणा-या अर्जुनाने आज विश्वरुप पाहिल्यानंतर भगवंताचे खरे स्थान जाणून घेतले आहे. भगवंत कोठे व कसा आहे हे सांगतांना अर्जुन म्हणाला,

**म्हणौनियां देवां । तूं वेगळा नव्हसी सर्वां ।**
**हें आलें मज सद्भावा । आतां तूंचि सर्व।।**

अर्थात, देवा तू सर्वाहून वेगळा नाहीस तू नाही असा एकही प्राणी या भूतलावर नाही. तू म्हणजे सर्व व सर्व म्हणजे तू अर्थात जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी भगवंत असल्याने समत्व जपण्याची त्याची मानसिकता तो बोलून दाखवित आहे. ईश्वराची खरी प्रचिती आल्याने आपल्याकडून अनावधानाने झालेल्या चुकीबद्‌ल तो क्षमायाचना करतो आहे. आपल्याहातून बऱ्याचवेळा कळत,नकळत अनेक चुका घडत असतात. पण जेव्हा आपणाला आपली चुक लक्षात येते, तेव्हाही आपण त्या चुकीबद्‌ल क्षमा, याचना किंवा दुरुस्तीसाठी प्रयत्न करीत नाही. आई वडीलांना, गुरुजनांना, समाजातील वयोवृध्दांना अकारण किंवा सकारण आपण नको ते बोलून गेल्यानंतरही आपण नंतर का होईना पण त्यांची क्षमा याचना मागायला हवी. पण आपल्यातला मी पणा आपणाला नम्र होऊ देत नाही. मी च्या ताठरपणामुळे दुस-यांना आपण त्रास देऊन जातो. खरे म्हणजे हा मी पणा आपल्यासाठीच त्रासदायक असतो. वडीलधाऱ्यांचा मान सन्मान करणे हे आपले कर्तव्य असतांना, स्वार्थापोटी, मीपणापोटी आपण चुकीचे वर्तन करतो. विश्वरुप दर्शन पाहून अर्जुनाचा मीपणा गळून गेला, तसे हे सर्व जीव विश्वरुपच आहेत, असे समजून आपण आपला मीपणा टाकून द्यावा ही अपेक्षा.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. ३० नोव्हेंबर २०२४ | दर्श अमावास्या |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. चतुर्दशी (१०.२९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (विशाखा) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (१६.४३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - चतुष्पाद (२३.१४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ** : मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन** : स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क** : घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह** : हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या** : मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ** : व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु** : विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन** : मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# आसरा ते डी-मार्ट, रेल्वे स्टेशन परिसरातील अतिक्रमण हटविले

### महापालिका अतिक्रमण विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने डॉ. आंबेडकर चौक ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते रेल्वे स्टेशन आणि आसरा ते डी मार्ट तसेच या परिसरातील रस्त्यावरील व फूटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. मोठ्या प्रमाणात ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत खोके , भाजीपालासह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि



सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

आज सकाळच्या सत्रात डॉ. आंबेडकर चौक ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैय्या चौक) ते रेल्वे स्टेशन रस्त्यावरील व फूटपाथ वरील असलेले अतिक्रमण काढण्यात आले. येथील कारवाईत दोन लोखंडी खोके आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात

आसरा ते डी मार्ट तसेच डी मार्ट परिसरातील रस्त्यावरील, फुटपाथ वरील अतिक्रमण हटविण्यात आले. या मोहिमेत तीन लोखंडी खोके, भाजीपाला व इतर साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे या रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला. वाहतुकीसाठी विना अडथळा हा रस्ता यादरम्यान प्रशस्त झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



## श्राविका विद्यालयात संविधान व शहीद दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

उमाबाई श्राविका विद्यालयात संविधान दिन व शहीद दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान पुस्तकाचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, प्रशालेचे वरिष्ठ दिप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ आदी उपस्थित होते. प्रतिमा पूजन झाल्यानंतर ११०० विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका यांच्या समवेत सामूहिक संविधान वाचन करण्यात आले. तदनंतर प्रशालेचे सहशिक्षक सुकुमार वारे यांनी संविधानाचे महत्त्व व शहिदांचे देशप्रेम यावर आपल्या मार्गदर्शन विद्यार्थ्यांना संबोधित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुप कस्तुरे यांनी केले. क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांनी आभार मानले. कलाशिक्षक प्रविण कंदले यांनी फलक लेखन केले.

## मसाप सोलापूर शाखेच्या कार्यकारणीवर डॉ. शिंदे, प्रा. भीमगोंडा पाटील

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे-मुख्य शाखा, सोलापूरच्या कार्यकारणीवर कार्यकारणी सदस्य म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे आणि हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथे कार्यरत प्रा. भीमगोंडा पाटील यांची निवड करण्यात आली.

शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा पद्माकर देव सभागृह, नाट्यपरिषद शाखा, मोदीखाना प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबळकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कार्यकारणी सदस्य म्हणून निवडीबद्दल मसापच्या अध्यक्षा प्रा. डॉ. वडगबाळकर, कार्याध्यक्ष किशोर चंडक, उपाध्यक्ष





दत्ता सुरवसे, प्रमुख कार्यवाहक डॉ. नरेंद्र काटीकर, कार्यवाहक वंदना कुलकर्णी, कोषाध्यक्ष बद्दीउज्मा बिराजदार, जेष्ठ मार्गदर्शक व विधिज्ञ जे. जे. कुलकर्णी, जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, सदस्य गोविंद काळे, शोभा बोल्ली, डॉ. अर्जुन व्हटकर, प्रा. डॉ. सुवर्णा गुंड, डॉ. देविदास गुरव, फैय्याज शेख, डॉ. मीरा शेंडगे, डॉ. सुहास पुजारी, डॉ. शंकर नवले, रामप्रभू माने, नरेंद्र गुंडेली आदींनी डॉ. शिंदे आणि प्रा. पाटील यांचे अभिनंदन केले.

## कॉम्प्युटर कोर्स उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

अद्ययावत ज्ञानप्राप्तीची आस अभिनवता, कल्पकता, काळानुरूप कौशल्यवर्धन, प्रामाणिकपणे, नियोजनबद्ध परिश्रम करण्याची तयारी, देश हिताला प्राधान्य या गुणांच्या बळावर कोणत्याही निवडलेल्या क्षेत्रात उल्लेखनीय यश प्राप्त होऊ शकते. गरीबी, ग्रामीण पार्श्वभूमी हे अडसर ठरू शकत नाहीत. हे संगणक तज्ञ डॉ. विजय भटकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम, क्रिकेटर ऋषभ पंत यांनी स्वतःच्या उदाहरणावरून सिद्ध करून दाखविले आहे. अशा व्यक्तींचा आदर्श विद्यार्थ्यांनी समोर ठेवून जीवनात वाटचाल करावी असे विचार डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी व्यक्त केले.

ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने बेसिक कॉम्प्युटर कोर्स मध्ये प्राविण्य



मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ल.गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या खजिनदार प्रा. डॉ. नभा काकडे या होत्या. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, अकाउंट ऑफिसर व्यंकटेश मच्छा, श्री. चौडेश्वरी प्रशालेचे शिक्षक रणजीत सावंत आदी उपस्थित होते. यावेळी पहिल्या बॅचमध्ये उत्तीर्ण झालेल्या २५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बुके देऊन गौरविण्यात आले. मुलांना, मुलींना, महिलांना संगणक प्रशिक्षण मोफत मिळावे यासाठी ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या वतीने भरीव अर्थसाह्य दिले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार डॉ. कविता चंडक यांनी मानले.

## भाजप शहराध्यक्ष काळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पार्टीने नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत संपूर्ण राज्यासह सोलापूर शहरातील तीनही विधानसभांमध्ये विजय मिळवल्याबद्दल भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांचा भाजप पदाधिकाऱ्यांकडून आणि कार्यकर्त्यांकडून सत्कार करण्यात आला.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील दायमा इंडस्ट्रीजमध्ये या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपाचे शहर उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा म्हणाले, भाजप शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघात चांगली कामगिरी केली आहे. शहराध्यक्ष



नरेंद्र काळे यांनी तीनही विधानसभा मतदारसंघात पक्षाचे वरिष्ठ नेते, स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये समन्वय ठेवून अत्यंत कुशलतेने निवडणूक यंत्रणा राबवली. शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्यासह पदाधिकारी आणि भाजपा कार्यकर्त्यांनी केलेल्या अहोरात्र प्रयत्नांमुळे भाजपाला शहरातील तीनही जागांवर विजय मिळवण्यात यश आले आहे, असेही शहर उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी भाजपाचे शहर उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा, गोपीकृष्ण वड्डेपल्ली, प्रभाकर गणपा, शहर चिटणीस नागेश सरगम, शहर चिटणीस बजरंग कुलकर्णी, सदानंद गुंडेटी, श्रीनिवास दुभास, लालाशेठ दायमा, कृष्णा दायमा, गोपाल दायमा आदी उपस्थित होते.

## सोलापूर रेल्वे कार्यालयाला नगर राजभाषा कार्यान्वयन समितीचा प्रथम पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

भारत सरकार, गृह मंत्रालय, राजभाषा विभागाच्या धोरणाची उत्कृष्ट अंमलबजावणी केल्याबद्दल सोलापूर मंडल रेल प्रबंधक कार्यालयाला यंदाच्या वर्षी (२०२३-२४) केंद्र सरकारच्या कार्यालये/उपक्रमाच्या श्रेणीत प्रथम पुरस्कार-'राजभाषा शिल्ड' आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. नगर राजभाषा कार्यान्वयन समिती यांच्यावतीने दिनांक २७ नोव्हेंबर रोजी आयोजित सहामाही बैठकीत हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी सोलापूर विभागाचे




मंडल रेल प्रबंधक श्री नीरज कुमार दोहरे, अध्यक्ष,नराकास आणि बँक ऑफ महाराष्ट्र चे सहायक महाप्रबंधक संजीव कुमार, सहायक निदेशक, राजभाषा विभाग, गृह मंत्रालय, भारत सरकार राजेंद्र प्रसाद वर्मा आणि मुख्य महाप्रबंधक (परियोजना प्रमुख), एनटीपीसी लि., सोलापूर तपन कुमार बंदोपाध्याय व वरिष्ठ मंडल कार्मिक अधिकारी श्री ए.पी. भगत यांचा समावेश होता. सोलापूर मंडल रेल प्रबंधक कार्यालयाच्या या सन्मानाबद्दल कार्यालयाच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

## आठवणीतील प्र. द. निकते गुरुजी

कार्तिक वद्यदशमी शके १९४५ चा ७ डिसेंबर २०२३, हा दिवस. माध्यान्हीचा सूर्य अस्तंगताच्या दिशेनी भ्रमण करीत असतांना नामदेव गाथाव्रती, भागवताचार्य ह.भ.प. प्र. द. निकते गुरुजींचा जीवन प्रवास अस्तंगताकडे जात असतांनाच जणुकाही भगवान सूर्यनारायणाच्या स्वागतासाठीच दुपारी १ वा. ३० मिनिटांच्या सुमारास स्वर्गारोहणास सिद्ध झाला.

पाहता पाहता सकलस्तोत्र, अभंग गायन आणि श्री स्वामी समर्थाचा नामस्मरणजप करीत वैकुंठवासी झाला. त्याच क्षणी आकाश झाकाळले गेले. लखलखत्या दुपारी श्रीक्षेत्र पंढरपूरात प्र. द. निकते गुरुजींची जीवन- ज्योत मालवली. या घटनेला सोमवार दि. २५ नोव्हेंबर रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे.

प्रथम वर्ष श्राद्धाच्यावेळी आठवणींचा बांध फुटून आठवणीतील प्र. द. निकते गुरुजी स्मरणगाठ बनून एकेक उकल साकारतांना शब्द सरतात.

ओठी, अर्थ दचकतो जरा । अंतरी वाहे परि भावनेचा झरा।'' हेच खरे.


पुणे-नागपूर यांच्या विद्यमाने विद्वत जिजाऊ गौरव (पुरस्काराने जून मध्येच आमच्या दादासाहेबांचा अर्थात प्र. द. निकते गुरुजींचा न भूतो असा गौरव समारंभ पंढरीतच श्री शनैश्वर मंगल कार्यालयात जो झाला तो दृष्टावलाच. संत नामदेव अध्यासन, संत अध्ययन व संशोधन केंद्र, पुणे विद्यापीठाचा पहिला मानाचा जीवन गौरव पुरस्कार विद्यापीठाने श्री क्षेत्र पंढरपूरात श्री संत तुकाराम भवनमध्ये दिल्यानंतर नामदेवगाथाव्रती प्र.द. निकते गुरुजींच्या आध्यामिक मार्गावर विविध पुरस्काराच्या पायघड्या वरून विदवत मंडळीच्या मांदियाळीत निकते गुरुजीं चा जो प्रवास झाला तोच थक्क करणारा असा आहे.

एस.एस.सी., एस.टी.सी. होवून पंढरपूरातील लोकमान्य विद्यालयात ज्ञानदान करीत असतानाच आजन्म मी विद्यार्थीच। ही त्यांची धारणा असल्याने घडविता घडविता ते स्वतः ही घडले. बी.ए.बी. एड. झाले. व्यावहारिक शैक्षणिक पदवीपेक्षा पारमार्थिक, आध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी जो प्रवेश केला तोच मुळी श्रीसंत नामदेव महाराजांचे १६ वे वंशज वै.ह. भ. प. नामदेव पंढरीनाथ नामदास यांनी दादांच्याजवळ व्यक्त केलेल्या भावनेमुळेच!

**''प्रकाशराव, माझी एक खंत आहे. ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा यांची पारायणे होतात. पण, श्री संत नामदेवगाथेचे पारायण करणे मला जमले नाही.''**

महाराजांची ही खंत दूर करण्याचा संकल्पच करून पारायणप्रत कशी तयार करता येईल याचा ध्यास घेवून संशोधन करून आदर्श अशी श्री नामदेवगाथा पारायण प्रत तयार केली, एवढ्यावरच न थांबता दादांनी श्री नामदेव गाथा पारायण सर्व प्रथम पंढरपूरातील श्री संत नामदेव मंदिरात गोकुळाष्टमीच्या सप्ताहात सुरु करुन गुरुमाउली नामदास महाराजांची खंत दूर केली. याचा प्रचार, प्रसार एवढ्या मोठया प्रमाणात झाला की आज महाराष्ट्रासह इतर प्रांतातही श्री संत नामदेव गाथेचे पारायणे होवू लागली आहेत. याची नोंद पुणे विद्यापीठाने घेवून दादांना जीवन गौरव पुरस्काने सन्मानीत केले.

आजन्म विद्यार्थी मी या प्रवासात जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत (गुरू) या भावनेनी आध्यात्मिक प्रगतीसाठी दादा संत सज्जनांच्या सहवासात घडू लागले



मानवी जीवनाचे मूल्य हे सत्यशील, प्रामाणिकता, कुल आणि आचरणावरुन सिद्ध होते. महाभारतात स्पष्टच आहे -

**''अष्टौ गुणा: पुरुषं दीपयानी प्रज्ञा च कौल्यं च दम: श्रुतं च पराक्रमश्चा बहुभाषिता च दान यथाशक्ति कृतज्ञता च''**

याचा भावार्थ असा - बुद्धी, कुलीनता, इंद्रियनिग्रह, विद्या, पराक्रम, अधिक न बोलणे,यथाशक्ती दान आणि कृतज्ञता हे आठ गुण मानवी जीवन उजळून टाकतात. त्याला योग्य स्थानी पोचवितात आणि अशा गुणांनी युक्त असणारे मंगलमय जीवन हेच संतचरित्र म्हणून समाजाला दिशादर्शी ठरतात चरित्र संपन्नता हे-आपल्या संस्कृतीचे, जीवनशैलीचे लक्षणच आहे. यातून धर्मरक्षणही होते आणि तेच वंदनीय आणि अनुकरणीय ठरते.

आमच्या दादासाहेबांचा संतसहवास एवढा विपूल होता की तो स्वतंत्र लेखाचा विषय होवू शकतो. आज दादांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आठवणींची उकल करतांना संतसज्जनांचा परिसस्पर्श होत होत त्यांची जी प्रगती झाली ती प्राचार्य अनंतराव आठवले अर्थात् परमपूज्य स्वामी वरदानंदभारती या गुरुमाऊलींच्या सहवासानेच. पूज्य स्वामी वरदानंद भारतीच्या सुसंवादाच्या बैठकीत एकदा ते आपल्या परमप्रिय शिष्यांना म्हणाले, ''कोणाच्या प्रपंचात आपण डोकावणे बरे नाही हे खरे. पण, कोणी आपल्या प्रपंचात डोकावू नये इतका आपला प्रपंच वाईट असू नये.''

वरवर साधा-सोपा संदेश असला तरी त्याला फार मोठा अर्थ आहे तो आमच्या दादांनी जाणला. परिणामी त्यांचे जीवन पूर्णपणे बदलून गेले. सा. पंढरी संदेश या आध्यात्मिक क्षेत्राला वाहून घेतलेल्या साप्ताहिकाची धूरा दादांनी घेतली. यामुळे सर्वाभूती समभाव, समदृष्टी ही संत शिकवण त्यांनी जोपासली.

औसा संस्थानचे मठाधीपती वै. ज्ञानेश्वर माउली औसेकरांचा जिव्हाळा वृध्दिंगत झाला. आज ही या जिव्हाळ्यानेच दादांच्या पश्चात वहिनीसाहेब श्रीमती प्रतिभा प्रकाश निकते व परिवारांनी जोपासत प्रतिवर्षाप्रमाणे होणारा श्रावणातील औसेकर महाराज मठामध्ये नामदेव गाथा पारायणाची प्रथा जोपासत दादांचा वारसा पुढे चालू ठेवला हा ऋणानुबंध म्हणजे प्र.द. निकते गुरुजीच्या संत सहवासाचे विधासाचे फळ आहे.

आदर्श शिक्षक, समाजसेवक, विद्यार्थीप्रिय-प्रयोगशील शिक्षक आणि ''आजन्म विद्यार्थी मी'' या प्रामाणिक श्रध्देमुळेच प्र. द. निकते गुरुजी हे नामदेवगाथाव्रती, भागवताचार्य, प्रवचनकार, कथाकार, कीर्तनकार अशा विविध कारमधून प्रवासी म्हणून वावरताना प्रपंच आणि परमार्थ दादासाहेबांनी साध्य केले. यास्तव एवढेच

''दादा, निज देहाचे झिजवून चंदन नाम देवगाथाव्रती होऊन तुम्ही वेचला येथे कण कण भागवतधर्माची पताका घेऊन अनेका केले आपण मार्गदर्शन तव प्रथम पुण्यस्मरणास करितो वंदन स्मृतिस तुमच्या शतशः वंदन

**- प्रा. दीपक द. निकते, पंढरपूर**
**भ्रमणध्वनी ७७०९३०६१६७**

## संक्षिप्त वृत्त



### पंढरपुरातील 'स्वेरी'मध्ये भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा

**पंढरपूर, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत 'भारतीय संविधान दिन' साजरा करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून प्राप्त परिपत्रकानुसार व स्वेरीचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून विद्यार्थी व प्राध्यापकांच्या उपस्थितीत हा 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख डॉ.आर.एन. हरीदास यांनी उपस्थितांना 'भारतीय संविधानाची निर्मिती कशी झाली, भारतीयांचे मुलभूत हक्क व अधिकार, लोकशाही शासन पद्धतीचे महत्व, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सर्वधर्म समभाव आदी बाबत सविस्तर माहिती देवून भारतीय संविधानाचे महत्व पटवून दिले. आधुनिक भारताच्या प्रगतीचा खरा आधार म्हणजे आपले संविधान आहे असे त्यांनी आवर्जून नमूद केले. यावेळी भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून प्रतिज्ञा घेण्यात आली. पोलीस अधिकारी अशोक कामटे, हेमंत करकरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय साळसकर, पोलीस कर्मचारी तुकाराम ओंबाळे, मेजर उन्नी कृष्णन यांच्यासह शहिद झालेल्या भारत मातेच्या इतरही वीर जवानांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. यावेळी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, डॉ. एस.ए.लेंडवे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.डी.एस. चौधरी, डॉ. एम. एम. आवताडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



### व्हॉईस ऑफ मीडियाच्या बार्शी तालुकाध्यक्षपदी अस्लम काझी

**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**

भारतातील नंबर १ ची असलेली व जागतिक पातळीवर ४७ देशात ३ लाख ९० हजार पत्रकार सदस्य असणारी व्हाईस ऑफ मिडीयाच्या बार्शी तालुकाध्यक्ष पदी तालुक्यातील नारी येथील अस्लम काझी यांची तर उपाध्यक्ष पदी राहूल गुरव, राहुल भालशंकर कार्याध्यक्षपदी तर मुजमिल कौठळकर खजिनदारपदी तर सुशेन डमरे यांची सचिवपदी निवड करण्यात आली. निवडीचे पत्र व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या हस्ते देण्यात आले. बार्शी तालुक्यातील छोट्याशा नारी गावातील अस्लम काझी यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्नांना वाचा फोडून अनेक कामे मार्गी लावली. तसेच पत्रकारितेसोबत समाजकार्याची आवड असलेल्या अस्लम काझी यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना देशभरात नावलौकिक असलेल्या व्हाईस ऑफ मिडियाच्या बार्शी तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे कौतूक व अभिनंदन केले जात आहे. युवा पत्रकार अस्लम काझी हे गेल्या ३ वर्षांपासून जनता न्यूज व महाराष्ट्र माझा न्युज या डिजीटल माध्यमाम धून काम करत असून त्यांच्या या निवडी वेळी अजितदादा कुंकलोळ व हर्षद लोहार व सर्व पत्रकार उपस्थित होते. तसेच धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकरांनी त्यांचे अभिनंदन केले.



### संविधानातील तत्त्वांची जोपासना करावी : प्राचार्य डॉ. अब्दुल शेख

**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर**

भारतीय संविधानाचा अभ्यास जगभरातील तज्ञांकडून केला जात असून भारतीय जनतेने संविधानातील तत्त्व आणि मूल्य जोपासण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य महेंद्रकुमार ओव्हाळ, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. रामेश्वर कोठावळे, कला शाखा समन्वयक डॉ. बिरा पारसे, डॉ. दिपक जाधवर आदी म ान्यवर उपस्थित होते. पुढे प्राचार्य डॉ. शेख म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमाने भारतीय संविधान निर्माण झाले आहे. संविधानातील तरतुदीमुळे भारत एकात्म बनलेला दिसून येतो. यावेळी संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच भारतीय संविधानाची ओळख या पुस्तिकेच्या पन्नास प्रती विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शशिकांत शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राहूल पालके यांनी केले तर आभार डॉ. दैवशाला रसाळ यांनी मानले.

### अक्कलकोट येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेला प्रारंभ

**अक्कलकोट, दि. २९ नोव्हेंबर-**

श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके यांनी केला. कडबगाव केंद्रातील जिल्हा परिषद मराठी व कन्नड शाळा गौडगाव, जि. प. शाळा मराठी व कन्नड कडबगाव, जिल्हा परिषद मराठी शाळा अक्कलकोट स्टेशन, जिल्हा परिषद मराठी व कन्नड शाळा गुरववाडी व जिल्हा परिषद मराठी शाळा कुंभार आदी शाळांनी सहभाग घेतला. यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशट्टी, परमेश्वर व्हसुरे उपस्थित होते. कबड्डी खो-खो, लंगडी बुद्धिबळ व धावणे या स्पर्धा घेण्यात आल्या. पंच म्हणून तानाजी चव्हाण, कल्याणी गंगोंडा, संतोष चिंचोळीकर, महादेव चव्हाण, गणपती किणगी, बसवराज स्वामी, स्मिता शिंदे, त्रिभुवन जाधव, पी. एस. व्हसुरे आदींनी काम पाहिले.




# वळसंगचा पाणी प्रश्न १५ दिवसांत मिटवू

**आ. सचिन कल्याणशेट्टी यांची हमी; कुरनूर-वळसंग पाणीपुरवठा योजनेचे काम जलदगतीने पूर्ण करण्याचे आश्वासन**

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २९ नोव्हेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील नागरिकांनी दुसऱ्यांदा निवडून आलेल्या अक्कलकोटचे पाणीदार आ. सचिन कल्याणशेट्टी यांची भेट घेऊन केला. याचवेळी वळसंगचा पाणी प्रश्न आमदारांना सांगण्यात आला. यावेळी वळसंगचा पाणी प्रश्न १५ दिवसात सोडवू, असे आमदार सचिन कल्याणीशेट्टी यांनी आश्वासन दिले. कुरनूर ते वळसंग पाणीपुरवठ्याचे काम जलद गतीने करून पाण्याचा प्रश्न मार्गी लावू असे त्यांनी सांगितले.



> वळसंगवासीयांनी विकासाला महत्त्व दिले. गावचा विकास आणि पाणी संदर्भात विचार करून सचिनदादा यांना विजयी करण्यास मदत केली म्हणून त्यांचा मी आभार व्यक्त करतो. वळसंग व वळसंग जिल्हा परिषद गणातील सर्व गावांच्या विकासाची हमी मी घेतो. आ. सचिनदादांकडून रखडलेले काम तसेच नवीन विकासकामे नक्कीच करून घेऊ. **-महेश वैजनाथ बिराजदार, उद्योजक, दर्गनहळ्ळी**

यावेळी माजी सरपंच श्रीशैल दुधगी, सिद्धाराम कोडले, महादेव होटकर, माजी उपसरपंच स्वामीनाथ कोडले, शिवशरण थळंगे, ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, विनोद सुरपुरे, माजी तंटामुक्त अध्यक्ष बुडन कटरे, अनिल बर्वे, शिवानंद चिंचोळी, चनबसप्पा खैराटे, सिद्धाराम चौगुले, महेश खैराटे, सिद्धाराम तिपरादी, अक्षय गायकवाड, बालाजी पारसवार, वीरेश बागलकोटी, मुस्ताक शेख, पत्रकार अल्ताफ पटेल, लक्ष्मण चौगुले, सिध्दाराम म्हेत्रे, महादेव मुळेगाव, महेश दुधगी, रहीम कटरे, खाशिम दिवाणे, अशोक गायकवाड, सोन्या गायकवाड, संगण्णा खैराटे, ऑटोमोबाईल्स वर्कर्स असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष नागराजअप्पू कोंडे, अण्णप्पा चौगुले, नागनाथ म्हेत्रे, भीमा चौगुले, दीपक राठोड, बसवराज ढब्बे, पत्रकार कल्लय्या स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते.

वळसंग येथे शाळा, महाविद्यालय, श्री स्वामी समर्थ सहकारी सुत गिरणी, विविध बँका, पतसंस्था आहेत. या शिवाय परिसरातील गावासाठी मोठी बाजारपेठ आहे. यामुळे नेहमीच नागरिकांची गर्दी असते. वास्तव्यात असणाऱ्या लोकसंख्येबरोबरच धावती लोकसंख्या अधिक असल्याने पाण्याची जास्त गरज आहे. ती गरज आ. कल्याणशेट्टी यांच्या हमीमुळे पूर्ण होणार असल्याचे माजी सरपंच श्रीशैल दुधगी यांनी सांगितले.

**संतकवी श्री दासगणू महाराज पुरस्कार**

## 'भारतीय विचार साधना' पुस्तक प्रकाशन संस्थेस पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ नोव्हेंबर-**

हिंदू संस्कृती व परंपरा संवर्धनासाठी देण्यात येणारा संतकवी श्रीदासगणू महाराज पुरस्कार यावर्षी पुण्याच्या 'भारतीय विचार साधना' या पुस्तक प्रकाशन संस्थेस प्रदान करण्यात आला. श्रीदासगणू महाराज यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी कार्तिक वद्य १३, शके १९४६, गुरुवारी २८ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार प्रदानाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सव्वालाख रूपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असून श्रीराधादामोदर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ.कल्याणी नामजोशी यांच्या हस्ते व श्रीदासगणू महाराज प्रतिष्ठान, गोरटे, या संस्थेचे अध्यक्ष महेश अनंत आठवले यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदानाचा कार्यक्रम संपन्न झाला. राष्ट्रहित सर्वतोपरी हे ध्येय घेऊन राष्ट्रीय विचार, सत्व जागरण, देशभक्तांची चरित्रे या व अन्य प्रबोधनपर विषयांवर गेली ४० वर्षे ही संस्था पुस्तके प्रकाशित करीत आहे.

भाविसाच्या वतीने अध्यक्ष डॉ.गिरीश आफळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी भाविसाचे काशिनाथ देवधर, श्रीकृष्ण कात्रे, मकरंद ढवळे, मिलिंद भणगे, अरविंद रावेतकर हे पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान संस्कृत भाषा संवर्धनाचा पुरस्कार धाराशिव्या चि. हर्षद संतोष तोडकरी या विद्यार्थ्याला देण्यात आला. येथील आपटे उपलप प्रशालेची विद्यार्थीनी कु.रिद्धी मकरंद हरिदास हीचाहि शालांत परिक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्या बद्दल यावेळी गौरव करण्यात आला.

## बार्शीचे महावीर कदम 'फुल आयर्न मॅन' आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियात

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२९ नोव्हेंबर**

बार्शीतील भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष आणि लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊनचे अध्यक्ष महावीर कदम यांची आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण झाली आहे. ते १ डिसेंबर २४ रोजी ऑस्ट्रेलियातील बसल्टन शहरामध्ये होणाऱ्या 'फुल आयर्न मॅन' स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहेत.




या प्रतिष्ठित स्पर्धेत कदम यांना एकूण २२६ किलोमीटर अंतर १७ तासांच्या आत पूर्ण करावे लागणार आहे. यामध्ये ४ किलोमीटर समुद्रात पोहणे, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२ किलोमीटर धावणे यांचा समावेश आहे. उष्णतेचे आव्हान, प्रतिकूल हवामान आणि कठीण मार्ग यामुळे ही स्पर्धा शारीरिक आणि मानसिक क्षमतेची कसोटी पाहणारी ठरते. या स्पर्धेत जगभरातील १०० पेक्षा जास्त देशांमधील ३४०० स्पर्धक सहभागी होणार आहेत. महावीर कदम यांनी याआधी गोव्यातील आंतरराष्ट्रीय 'हाफ आयर्न मॅन' स्पर्धा, नागपूरमधील 'टायगर मॅन १८३' आणि अनेक हाफ व फुल मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे त्यांची 'फुल आयर्न मॅन' स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कदम यांनी २६ नोव्हेंबर रोजी मुंबईहून ऑस्ट्रेलियाकडे प्रयाण केले आहे. त्यांच्या या यशामुळे बार्शी शहर आणि समाजाच्या विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## खेळामुळे विद्यार्थ्यांचा शारिरीक, बौध्दिक, भावनिक विकास होतो : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ नोव्हेबर**



महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयाच्या वार्षिक क्रीडासप्ताहाचे उदघाटन संस्थेच्या संचालिका शांभवी सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी तर सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व सीनियर कॉलेज प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी विदयार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी व सांधिक भावना निर्माण व्हावी म्हणून या शाळेने क्रीडासप्ताहाचे उत्तम नियोजन केल्याबद्दल कौतुक करून खेळामुळे विद्यार्थ्याचे शारिरीक, बौध्दिक व भावनिक विकास होतो असे मत व्यक्त केले. प्रारंभी मशाल प्रज्वलित करून खेळाडुनी उत्कृष्ट संचालनाद्वारे मानवंदना दिली, त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ज्योत व मैदानाचे पूजन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या क्रीडासप्ताहात खो-खो, कबड्डी, क्रिकेट,लंगडी, धावणे, लांब उडी, ऊंच उडी, गोळा फेक, थाळी फेक इत्यादी खेळांचा समावेश करण्यात आला होता.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक कुमार जाधव, रंजना चव्हाण, दिगंबर जगताप, शरणबसप्पा चानकोटे, सागर मठदेवरू, पूजा कडबगावकर, रवीकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील यानी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार प्रदर्शन निशिगंधा कोळी यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना प्रवासी संघटनेचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २९ नोव्हेंबर-**

सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरजकुमार दोहरे व इतर वेगवेगळ्या विभागा मधील वरीष्ठ अधिकारी यांचा दौंड ते कुर्डूवाडी परीक्षण दौर्या दरम्यान जेऊर रेल्वे स्टेशन येथे प्रवासी सेवा संघ सोलापूर व जेऊर प्रवासी संघटनेचे पदाधिकारी यांनी संघटनेच्यावतीने विविध मागण्यांचे निवेदन विभागीय व्यवस्थापक यांना देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की माढा व जेऊर येथे हुतात्मा व उद्यान एक्सप्रेस ला थांबा द्यावा. सोलापूर ते दौंड डेमू हडपसर पर्यंत विस्तारीत करुन वाशिंबे येथे प्रवासी थांबा द्यावा.तसेच दिवाळी स्पेशल म्हणून सुरू केलेली दौंड कलबुर्गी शटल पूर्ववत करुम कायमस्वरूपी चालवावी, जेऊर येथे पार्सल बुकींग सेवा सुरू करुन प्लॅटफॉर्म एक वरील शेडची लांबी वाढवावी अशा मागण्यांचे निवेदन दिले आहे.

यावेळी सदर निवेदनातील मागण्याबाबत रेल्वे प्रशासन मुंबई व रेल्वे मंत्रालय नवी दिल्ली येथील वरीष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे रेल्वे प्रशासनाने सुचीत केले . प्रवासी सेवा संघाने केलेल्या मागण्याबाबत रेल्वे प्रशासन सकारात्म क दृष्टीने कार्यवाही करीत असून मागण्या पुर्तता करून प्रवाश्यांना चांगली प्रवासी देण्याचे प्रयत्न रेल्वे विभागाकडून केले जात आहेत असे रेल्वे प्रशासनाने प्रवासी संघटनेच्या पदाधिकारी यांना सांगितले आहे.

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या आश्लेषा बांगडेला सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२९ नोव्हेंबर-**

करमाळा- येथील विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा येथील विद्यार्थिने २४ नोव्हेंबर रोजी पुण्यातील लोणीकंद येथे महाराष्ट्र राज्याचे वरिष्ठ राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा संपन्न झाली. या कुस्ती स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची खेळाडू आश्लेषा बागडे हिने विविध महिला मल्लांना चितपट करीत अंतिम फेरीत प्रवेश करून विजय प्राप्त केला.



या स्पर्धेत ५७ किलो वजन गटांमध्ये तिने प्रथम क्रमांक पटकवला आहे.तिला राज्यस्तरीय सुवर्णपदक बहाल करण्यात आले आहे. पुढे वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी तिची निवड झाली. कुमारी आश्लेषा बागडे ही विहाळ येथील श्री.बागडे सर यांची कन्या असून महाविद्यालयामध्ये ती बी.ए. भाग २ मध्ये शिकत आहे. वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा पुढील महिन्यातील ६ ते ८ डिसेंबर रोजी कर्नाटक राज्यातील बेंगलोर येथे होणार असून ५७ किलो वजन गटांमध्ये आश्लेषा बागडे ही महाराष्ट्रातर्फे नेतृत्व करणार आहे.महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.राम काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव आदरणीय श्री. विलासरावजी घुमरे सर, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रम सुर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक,वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व करमाळा तालुका क्रीडा समन्वयक प्रा. राम काळे यांनी अभिनंदन केले.

# बार्शीतील म्युकरमायकोसिस समाजोपयोगी संशोधन कार्यास जर्मन पेटंट

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ डॉ. सुहास कुलकर्णी व अभ्यासिका डॉ. अमृता शेटे-मांडे यांनी कोरोनाच्या अत्यंत भयावह काळात म्युकरमायकोसिस या उद्भवलेल्या प्राणघातक रोगावरती संशोधन केले होते व ते समाजासाठी अत्यंत उपयोगी ठरले होते. सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाने त्यांच्या संशोधनाची दखल घेत त्यांच्या संशोधनाच्या आधारे अमृता शेटे-मांडे यांना पी.एचडी. पदवी प्रदान केलेली आहे. या त्यांच्या संशोधनच्या पद्धतीला व त्यावर आधारित न्टीफंगल उत्पादनाच्या डॉ. आरती कांबळे यांच्या संयुक्त कार्यास 'सिस्टीम फॉर द प्रोडक्शन ऑफ न्टीफंगल सबस्टन्स फ्रॉम स्ट्रेप्टोमायसीस फ्लेवोव्हीरीड्स एके-२' या विषयावरती आता जर्मन पेटंट प्राप्त झाले आहे.






म्युकरमायकोसिस हा काळ्या बुरशीमुळे होणारा रोग असून रुग्णाचे डोळे, मेंदू व फुफ्फुसावर परिणाम करतो. कोरोना काळात हा रोग मोठ्या प्रमाणात पोस्ट कोव्हिड रुग्णांमध्ये आढळून आला होता. या रोगाची उपचार पद्धती अत्यंत महाग असल्याने जीवघेणा ठरलेला आहे. आम्फोटेरिसिन-बी हे एकमेव इंजेक्शन उपयुक्त ठरले होते. या संशोधकांनी रोगाच्या बुरशीला घातक अशा औषध निर्मिती करणाऱ्या जंतूचा शोध लावून पर्याय उपलब्ध करुन दिला.

सदर बुरशी नाशक औषध तयार करण्यासाठी या जंतूची प्रयोग शाळेत वाढ करावी लागते. त्यासाठी विशिष्ट पद्धत अवलंबवावी लागते. याच जंतूच्या प्रयोगशाळेत वाढवाव्या लागणाऱ्या पद्धतीला पेटंट मिळाले आहे. त्यामुळे बुरशीनाशक औषध निर्मितीतील स्वामीत्वाचा पहिला टप्पा पार केल्याचे व त्यामुळे कमी खर्चात म्युकरम ायकोसिस या रोगावर उपचाराची शक्यता बळावली असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले आहे.

### हे आहेत संशोधक

डॉ. सुहास कुलकर्णी हे निवृत्त प्रोफेसर असून, त्यांच्या नावावर ५० हून अधिक रिसर्च पेपर्स, १५ शोध, २ एम. फील, ८ पी. एचडी, ३ प्रोजेक्ट, १२ पुस्तकातील लिखाण जमा आहे. अमृता शेटे मांडे या पी. एचडी. असून सध्या त्या श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे कार्यरत आहेत. त्यांचेही ३ रिसर्च पेपर्स, ४ प्रोजेक्ट प्रसिद्ध झाले आहेत. डॉ. आरती कांबळे (सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड) यांचे ९ रिसर्च पेपर्स, १० रिसर्च प्रोजेक्ट, ३ पुस्तके प्रकाशित आहेत व ३ अंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले आहेत. तसेच या संशोधन कार्यात डॉ. अश्विनी कोळी (अमृतेश्वर महाविद्यालय,विंझर, पुणे) यांचा ही सहभाग आहे त्यांचे ७ पेपर्स आहेत. तिघीही सूक्ष्मजीवशास्त्राच्या प्राध्यापिका व संशोधिका आहेत.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# राष्ट्रीय युवा महोत्सव १२ जानेवारीला

## स्पर्धेसाठी ५ डिसेंबरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

राष्ट्रीय युवा महोत्सव १२ जानेवारी २०२५ रोजी दिल्ली येथे होणार आहे. यात सहभागी होण्यासाठी विकसित भारत यंग लिडरर्स डायलॉगसाठी माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

प्रथम टप्प्यात विकसित भारत क्विझमध्ये वैयक्तिकरित्या स्पर्धकांना सहभागी होता येईल. प्रश्न मंजुषा स्पर्धा, सामान्यज्ञान व भारताची कामगिरी या बाबींवर ही स्पर्धा होणार आहे. यासाठी माय भारत पोर्टलवर शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांनी सहभाग नोंदवावा. ही स्पर्धा ५ डिसेंबरपर्यंत आहे. व्दितीय टप्प्यात विकसित भारत यावर निबंध लेखन स्पर्धा घेतली जाईल. यामध्ये शब्द मर्यादा १००० शब्दाची राहील, प्रथम टप्प्यात सहभागी होवून निवड झालेल्या युवांचा यामध्ये सहभाग राहील. निबंध स्पर्धा ऑन लाईन पध्दतीने दि. ८ ते १५ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. तृतीय टप्प्यात विकसित भारत पीपीटी चॅलेंजवर निर्धारित विषयांवर राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक राज्यातून ४ युवांची निवड करण्यात येणार आहे. दि २० ते २६ डिसेंबर कालावधीत या स्पर्धा होणार आहेत.


चतुर्थ टप्प्यात राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेल्या युवांना दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सादरीकरण करावे लागेल. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षाआतील युवक व युवतींनी माय भारत पोर्टलवर नोंदणी करून स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### आगामी निवडणुका रामभाऊ सातपुतेंच्या नेतृत्त्वात लढविण्याचा निर्धार

**नातेपुते, दि. २९ नोव्हेंबर-**



माळशिरस तालुक्यात आगामी जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गणाचे व ग्रामपंचायतीचे सर्व निवडणुका भारतीय जनता पार्टी,युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष,माजी आमदार राम विठ्ठल सातपुते यांच्या नेतृत्वात लढविण्याचा निर्धार माळशिरस येथील विश्रामगृहावर झालेल्या पत्रकार परिषदेत भाजप कार्यकारिणीने जाहीर यावेळी राज्य जिल्हा व तालुका भाजपा कार्यकारणीतील नेते व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.


यावेळी बोलताना हनुमंत सुळ यांनी भूमिका स्पष्ट करताना म्हणाले की, माळशिरस तालुक्यात आमचा विजय निसटता गेला अन्यथा जनतेने आमदारांच्या कार्यावर त्यांना साथ देऊन, भरघोस मत दिली. परंतु,जरी यावेळी आम्हांला अपयश आले असले तरी, भविष्यात तालुक्यात होऊ घातलेल्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती, ग्रामपंचायत व नगरपरिषद व इतर सहकारी संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप महायुतीच्या सर्व घटक पक्षांना बरोबर घेऊन आम्ही निवडणुकांना सामोरे जाणार आहोत यावेळी आमचे नेतृत्व सन्माननीय, माजी आमदार रामभाऊ सातपुते यांचे असेल.या वेळी पत्रकार परिषदेला धनगर कृती समितीचे हनुमंत सुळ, माळशिरस माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, भाजप जिल्हा समन्वयक के के पाटील, भाजप किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर, भाजप तालुका सरचिटणीस संजय देशमुख, भाजप माजी तालुकाध्यक्ष बाजीराव काटकर, भाजप माजी तालुकाध्यक्ष सोपान नारनवर, भाजप तालुकाध्यक्ष शरद मदने, सुजय माने पाटील यांनी विचार व्यक्त केले. जयराज माने पाटील रंजीत मोठे, भाजप माझी किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वावरे, लक्ष्मण गोरड, सांगोला विस्तारक हनुमंत कर्चे, हनुमंत शिंदे, युवराज वाघमोडे, महादेव कावळे,निलेश रणवरे,शिवराज पोकळे आधी भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### एनएबी निवासी अंधकार्यशाळेमध्ये महात्मा फुले यांची पुण्यतिथी साजरी

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

नॅब संचलित एन.ए.बी.निवासी अंधकार्यशाळेमध्ये महात्मा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थी मनोगतामध्ये हर्षद पुंडगे, दीपांजली केसकर, भगवान राठोड यांनी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. आपला अध्यक्षीय भाषणामध्ये कुलकर्णी यांनी महात्मा फुले यांचे महिला शिक्षण, पुनर्विवाह, केशवपन यातील भरीव कामगिरी विषयी माहिती सांगितली. सूत्रसंचालन बिरप्पा वाघे व शिवकुमार पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास रियाज मुल्ला व आकांक्षा भंडारे यांनी केले.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात संविधान दिन साजरा, शहिदांना अभिवादन

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळात संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच २६/११ मधील शहिदांना अभिवादन करण्यात आले. संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून भारताचे संविधान मधील प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले भारताचे थोर सुपुत्र व सोलापूरचे माजी पोलीस आयुक्त अशोक कामटे, मुंबईचे एसटी पथकाचे प्रमुख पोलीस अधिकारी हेमंत करकरे, चकमक फेम गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक विजय साळसकर, सोलापुरातील राज्य राखीव पोलीस गट क्रमांक १० चे जवान राहुल शिंदे, एन. एस. जी. मधील मेजर संदीप उन्नीकुष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार आपण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंडे, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, हिरा गोरे, महेश वालावलकर, रियाज अत्तार, ज्ञानेश्वर गरड, ताहीर, बिराजदार, रतन साळवे, आषिकेश लोखंडे, भालचंद्र साखरे, सायली ढोले, शुभम गायकवाड आदी उपस्थित होते.

# पंढरीच्या वैकुंठ स्मशानभूमीतील गॅस दाहिनी बंद

## त्वरित दुरुस्त करण्याची नागरिकांची मागणी; पारंपारिक पद्धतीनेच करावे लागताहेत अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ नोव्हेंबर -**

येथील वैकुंठ स्मशानभूमीतील ५० लाख रुपये खर्चून बसविण्यात आलेली गॅस दाहिनी गेल्या दोन ते तीन वर्षापासून बंदच आहे. त्यामुळे आपल्या आप्तस्वकीयांच्या पार्थिवावर या गॅसदाहिनी मध्ये अंत्यसंस्कार करण्याची इच्छा असताना देखील मृतांच्या नातेवाईक मंडळींना येथील स्मशानभूमीमध्ये सध्या पारंपारिक पद्धतीनेच अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. त्यामुळे बंद असलेली गॅस दाहिनी त्वरित सुरु करावी अशी मागणी शहर व उपनगरातील नागरिकांमधून केली जात आहे.

येथील वैकुंठ स्मशानभूमीत मृतदेहावर लाकडाचा वापर करुन अंत्यसंस्कार करण्यात येत होते. लाकडाच्या वाढलेल्या किंमती आणि लाकूड वापरामुळे प्रचंड प्रमाणात होत असलेले प्रदूषण तसेच दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे बिघडत चाललेले संतुलन यामुळेच इंधनासाठी लाकडा ऐवजी सोलार किंवा गॅसचा वापर करण्यावर केंद्र व राज्य सरकारकडून भर दिला जात आहे. दरम्यान पंढरपुरातील वैकुंठ स्मशानभूमीत राज्यसभेचे तत्कालीन खासदार राजकुमार धूत यांच्या खासदार निधीतून पन्नास लाख रुपये आणि येथील नगरपालिकेने काही निधी खर्चून मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी गॅस दाहिनी उभी केली होती.

गॅस दाहिनी उभी करण्यात आल्यावर देखील येथील स्मशानभूमीत पारंपारिक



> गॅस दाहिनी दुरुस्त झाल्यास मृतदेहावर अंत्यसंस्कार करणे सोपे होईल. या बरोबरच होणारे प्रदूषण टाळले जाईल,पर्यावरणाचा होणारा ऱ्हास देखील थांबला जाईल. त्यामुळे पालिकेने त्वरित बंद पडलेली गॅस दाहिनी सुरु करावी अशी आमची विनंती आहे.
> **- ज्ञानेश्वर कुलकर्णी, नागरिक**

पद्धतीने आणि गॅस दाहिनीवर अंत्यसंस्कार करण्याची सुविधा पालिकेकडून नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सुरुवातीला काही दिवस मृतांच्या अनेक इच्छुक नातेवाईकांकडून या गॅस दाहिनीमध्ये आपल्या आप्तस्वकीयाच्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले होते. तर ज्यांना गॅसदाहिनीमध्ये अंत्यसंस्कार करणे पटत नव्हते ते पारंपारिक पद्धतीने आपल्या नातेवाईकांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करीत होते.

मात्र गॅस दाहिनी सुरु झाल्यावर काही महिन्यांमध्येच कोरोनाच्या एक, दोन लाटा आलेल्या होत्या. त्या काळात कोरोना आजारामुळे मृत झालेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार करताना अंत्यसंस्कारासाठी उपस्थित असलेल्या इतरांना कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये याची काळजी घेऊन अंत्यसंस्कार करण्याच्या प्रशासनाकडून काही मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी अंत्यसंस्कारासाठी उपस्थितांच्या संख्येवर मर्यादा देखील लावण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी सुरुवातीला तर कुटुंबातील एक, दोघां सदस्यांच्या उपस्थितीत पालिका कर्मचाऱ्यांकडूनच कोरोनामुळे मृत

> येथील वैकुंठ स्मशानभूमी मधील गॅस दाहिनीची पालिकेच्या इंजिनिअर्सना सोबत घेऊन प्रत्यक्ष पाहणी करतो. जो काही गॅस दाहिनीचा बंद असण्याचा प्रॉब्लेम असेल तो लवकरच दुरुस्त करुन ती सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.
> **- प्रशांत जाधव,** मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर

झालेल्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येत होते.

येथील स्मशानभूमीत देखील खबरदारी घेऊन कोरोनामुळे मृत झालेल्या व्यक्तीच्या मृतदेहावर सुरुवातीला काही दिवस गॅस दाहिनीद्वारे अंत्यसंस्कार करण्यात आले. यासाठी येथील नगरपरिषदेकडून एक हजार रुपये एवढा माफक दर आकारण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींच्या काळात अंत्यविधीसाठीचा येणारा खर्च देखील कमी झाला. पर्यायाने होणारे प्रदूषणही देखील रोखले गेले. या बरोबरच अंत्यसंस्कार करताना अंत्यसंस्कारासाठी उपस्थित असलेल्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका देखील कमी झाला होता ही एकीकडे वस्तुस्थिती होती. तर दुसरीकडे मात्र कोरोनामुळे झालेले मृतदेह जाळल्यामुळे याचा परिणाम विपरीत झाला.

कारण कोरोनामुळे मृत झालेले मृतदेह हे प्लास्टिक बॅग मध्ये ठेवलेले असायचे. त्यामुळे अशा पार्थिवावर अंत्यसंस्कार करताना तो गॅस दाहिनीमध्ये तसाच ठेवला जायचा. अशा प्रकारे कोरोनामुळे मृत झालेल्या अनेकांच्या पार्थिवावर त्यावेळी या गॅसदाहिनी मध्येच अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामुळे गॅस दाहिनीच्या चिमणी मध्ये काजळी चढत गेली. परिणामी पर्यावरण पूरक असणारी ही गॅस दाहिनी बंद पडली.

दरम्यान पालिकेकडून पुन्हा या गॅस दाहिनीच्या दुरुस्तीसाठी कोणतेच प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे गेल्या दोन ते तीन वर्षापासून शहर तसेच उपनगरातील नागरिकांना आपल्या नातेवाईकांच्या मृतदेहावर गॅस दाहिनी मध्ये अंत्यसंस्कार करण्याची इच्छा असून देखील गॅस दाहिनी बंद असल्यामुळे त्यांना पारंपारिक पद्धतीनेच लाकडे जाळून अंत्यसंस्कार करावे लागत आहे. पारंपारिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यासाठी खर्च देखील मोठा येतो आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे यासाठी वृक्षतोड देखील करावी लागत आहे. पावसाळ्या मध्ये लाकडे ओली असल्यामुळे मृतदेहांवर अंत्यसंस्कार करताना कमालीचा त्रास होत असतो. त्यामुळे पालिकेने या सर्व बाबींचा विचार करुन लवकरात लवकर गॅस दाहिनीच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे. येत्या काळात ती दुरुस्त करावी आणि नागरिकांना गॅस दाहिनीमध्ये मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याची सुविधा पुन्हा एकदा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी शहर तसेच उपनगरातील सुज्ञ नागरिकांमधून केली जात आहे.

# पिलीव परिसरात थंडीचा कडाका वाढला

## जनजीवन विस्कळीत, शेकोट्या पेटू लागल्या

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २९ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात गेल्या काही दिवसापासून थंडीचा कडाका जोरदार वाढला असून यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

संध्याकाळी सहा वाजल्यापासून थंडीचा कडाका सुरू झाला की सकाळी अगदी दहा वाजेपर्यंत जोरदार थंडी जाणवत आहे. यामुळे संपूर्ण रस्त्यावर अगदी शुकशुकाट पाहवयास मिळत आहे. याच बोचऱ्या थंडीत शाळा ,कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा प्रचंड त्रास होत असून या



थंडीच्या कडाक्यातच त्यांना शाळा कॉलेजला जावे लागत आहे. तर शेतकऱ्यांना लाईटची जशी वेळ असेल तसे थंडीत जाऊन पिकांना पाणी द्यावे लागत आहे. तर ऊस जोडणाऱ्या कामगारांना सुद्धा थंडीचा प्रचंड त्रास होत आहे. या थंडीतच ऊस तोडायला लागत आहे तसेच ऐन रात्री थंडीचा कहर असतानाच उसाचे वाहन सुद्धा भरुन द्यावे लागत आहे. थंडीमुळे शेतातील कामे व इतर कामांवर सुद्धा याचा परिणाम दिसून येत आहे. या थंडीचा गहू ,हरभरा या पिकासाठी फायदेशीर आहे तर काही पिकांना ही थंडी नुकसानीची आहे यामुळे पिकांची वाढ योग्य पद्धतीने होत नाही. दिवसा कडक ऊन व रात्री प्रचंड थंडी यामुळे सध्या वेगवेगळ्या आजारांना आमंत्रण असून अनेक माणसांना थंडी ताप व इतर प्रकारचे आजार जडत आहे. वयस्कर व म्हाताऱ्या माणसांच्या आरोग्यासाठी ही थंडी अपायकारक आहे. कधी नव्हे ते यंदा अगदी नोव्हेंबर, डिसेंबर मध्येच प्रचंड थंडीचा कडाका जाणवत आहे. यामुळे संपूर्ण जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. अजून किती दिवस ही थंडी राहते याकडे लक्ष लागले आहे.

# प्रत्येक गावांगावामध्ये फाऊंडेशनच्या शाखा काढणार : प्रा. रामदास झोळ

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२९ नोव्हेंबर-**

करमाळा तालुक्यातील जनता आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी असून, करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक गावामध्ये प्रा. राम दास झोळ सर फाउंडेशनच्या माध्यमातून समाजकारण व राजकारणात कायम कार्यरत राहणार असल्याचे मत प्रा. रामदास झोळ यांनी व्यक्त केले.



करमाळा विधानसभा निवडणुकीनंतर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक कार्यकर्ता विचारविनिमय बैठकीत ते बोलत होते. यावेळी शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ कांबळे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ मंगवडे, ओबीसी काँग्रेस तालुकाध्यक्ष गफूर शेख, तालुका उपाध्यक्ष आनंद झोळ, दत्त कला शिक्षण संस्थेच्या सचिवा मायाताई झोळ, पोलीस मित्र संघटनेचे तालुकाध्यक्ष संभाजी शिंदे, वाशिंबेचे माजी सरपंच भगवान डोंबाळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र गोडगे, जिल्हा युवा नेते गणेश मंगवडे, तालुका उपाध्यक्ष सुहास काळे-पाटील, संजय जगताप, श्रीकांत साखरे-पाटील, भिमराव ननवरे यांच्यासह करमाळा माढा तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रा. रामदास झोळ म्हणाले की, करमाळा ही आपली जन्मभूमी असून त्याचे ऋण फेडण्यासाठी तसेच बारामती, पुणे, इंदापूर या शहराप्रमाणे करमाळा तालुक्याचा विकास करण्यासाठी आपण कटीबद्ध असून, संवैधानिक पदांच्या माध्यमातून तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज याचबरोबर शिक्षण, आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी आपण विधानसभेची निवडणूक लढवली. जरी आपला पराभव झाला असला, तरी परिवर्तनाच्या या लढाईमध्ये शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, युवक, महिलांचा मिळालेला पाठिंबा नक्कीच मला बळ देणार आहे.

### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाच्या पर्यवेक्षका रजनी राऊळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, हिरा गोरे, महेश वालावलकर, हर्षद चिंचनसुरे , रतन साळवे, आषिकेश लोखंडे , श्रावण भंडारे भालचंद्र साखरे, सचिन साखरे, छाया अलकुंटे, सायली ढोले आदी उपस्थित होते.

# सहकार महर्षि कारखान्याच्या १ लाख १ हजार १११ व्या साखर पोत्यांचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २९ नोव्हेंबर-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील साखर कारखान्यात उत्पादित झालेल्या १ लाख १ हजार १११ व्या साखर पोत्यांचे पूजन कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

चालू ऊस गळीत हंगाम १५ नोव्हेंबर रोजी सुरु झाला असून २८ नोव्हेंबरअखेर १ लाख २४ हजार ८६० मे. टन उसाचे गाळप होऊन १ लाख ६ हजार क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन झाले आहे.



सरासरी साखर उतारा ९.३५ टक्के व आजचा साखर उतारा ९.४० टक्के आहे. सध्या प्रति दिवस ८,५०० मे. टन याप्रमाणे उसाचे गाळप होत आहे. को-जन वीज निर्मिती प्रकल्पात १ कोटी ९ लाख ४५ हजार ९० युनीट वीज निर्माण झाली असून त्यामधून ६६ लाख ४६ हजार २१४ युनिट वीज विक्री केलेली आहे. डिस्टीलरीमध्ये १८ लाख ९४ हजार २१९ लिटर्स रेक्टीफाईड स्पिरीट तसेच १६ लाख ७८ हजार ४५४ लिटर्स इथेनॉल उत्पादन झाल्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी सांगितले. यावेळी व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षीरसागर, गोविंद पवार, सुभाष कटके, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक-रणजित रणनवरे, पांडुरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, राजेंद्र भोसले, धनंजय सावंत, हर्षाली निंबाळकर उपस्थित होते.

# मातंग समाजाचे प्रतिनिधी आ. अमित गोरखे यांना मंत्रिमंडळात घ्या : सुनील अवघडे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**

विधानपरिषदेचे आमदार, देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत जवळचे सहकारी, उच्च विद्या विभूषित व मातंग समाजाचे प्रतिनिधित्व करणारे आमदार अमित गोरखे यांना मंत्रिमंडळात घ्या, अशी मागणी दलित महासंघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे यांनी व जिल्ह्यातील तमाम मातंग समाज बांधवांनी भाजपाचे सर्वेसर्वा देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अपेक्षा व्यक्त केली आहे.

आमदार अमित गोरखे यांची विधान परिषदेवर नियुक्ती झाल्यावर त्यांनी बहुजन संवाद यात्रेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर दौरा करुन भाजपा व महायुतीच्या विरोधात गैरसमज असलेल्या दलित व मातंग समाज बांधवांना जागृत करुन भाजपा व महायुती सरकारने मातंग समाजाचे हिताचे निर्णय कसे घेतले आहेत हे पटवून देत मातंग समाजाच्या अस्मितेचा आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुणे येथील राष्ट्रीय स्मारकासाठी देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारने सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांचा निधी देऊन ते काम सुरु केले. तसेच मुंबई येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी याच भाजपा व महायुती सरकारने सुमारे दीडशे कोटी रुपयांचा निधी देऊन प्रत्यक्षात कामाला



सुरुवात केली. मातंग समाजाचा अस्मितेचा असलेला प्रश्न मातंग समाजातील शिक्षित समाज घडवा म्हणून अण्णाभाऊ साठे रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटरची केलेली सुरुवात. तसेच आरक्षणातील अ ब क ड वर्गवारीचा घेतलेला निर्णय इत्यादी महत्त्वाची भाजपा व महायुती सरकारने केलेली कामे समाज बांधवांच्यापर्यंत पोहोचवल्यामुळे दलित विशेषतां मातंग समाजाच्याकडून भाजपा व महायुतीला भरभरुन मतदान झाल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर संविधान बदलण्याची भाषा करणाऱ्या विरोधकांचं खोटारडेपणा आमदार अमित गोरखे यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणातून सर्वच समाज बांधवांना समजावून दिल्यामुळे निगेटिव्ह नॅरेटिव्हचा पर्दाफाश या युवा आमदाराने केल्यामुळे आमदार अमित गोरखे यांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री पद द्या, अशी सर्वच समाज बांधवांची मनोमन इच्छा आहे. सर्वांना सोबत घेणारा व अभ्यासू फडवणीस साहेबांच्या जवळचा सहकारी म्हणून आमदार गोरखे यांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात स्थान दिल्यास दलित समाजाचे विशेषतः मातंग समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लागतील.

त्यामुळे अमित गोरखे यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याची मागणी सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील चळवळीतील पदाधिकारी कार्यकर्ते व समाज बांधवांनी भाजपा वरिष्ठांकडे केली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील समाजाची ही मागणी भाजपाचे वरिष्ठ निश्चित पूर्ण करतील, अशी अपेक्षा दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे यांनी व्यक्त केली.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## व्यंकटेश महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात आर्थिक साक्षरता व संपत्तीचे व्यवस्थापन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्रमुख व्याख्याते म्हणून लातूर येथील योगेश मिरजगावकर हे उपस्थित



होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेमध्ये आर्थिक साक्षरता या विषयावर व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले.

ही कार्यशाळा महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती . या कार्यशाळेचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद बेरळीकर यांनी केले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### नळदुर्ग येथे रस्ते अपघातात महिलेचा मृत्यू

**नळदुर्ग, दि. २९ नोव्हेंबर-**

होर्टी ते किलज रस्त्यावर बुधवारी संध्याकाळी झालेल्या रस्ते अपघातात ५९ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला असून, दुसरी महिला गंभीर जखमी झाली आहे. शांताबाई विश्वनाथ तरमोडे (वय ५९) आणि सुवर्णा विजयानंद टिकंबरे (रा. होर्टी) या दोघी पायी जात असताना भरधाव वेगाने आलेल्या मोटरसायकलने (क्र. एमएच २५ एटी ९३०१) त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात शांताबाई तरमोडे या गंभीर जखमी झाल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर सुवर्णा टिकंबरे या गंभीर जखमी झाल्या




आहेत. अपघातास कारणीभूत ठरलेल्या मोटरसायकल चालकाविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिमाशंकर विश्वनाथ तरमोडे (वय ३८, रा. होर्टी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोटरसायकल चालकाविरुद्ध भादंवि कलम २८१, १२५ (ए), १२५ (बी), १०६(१) आणि १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटरसायकल चालक हा हायगयी आणि निष्काळजीपणे वाहन चालवत होता. अपघातानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

### आंबा उत्पादकांना नोंदणीकरीता मोफत अर्ज करण्याचे आवाहन

**धाराशिव, दि. २९ नोव्हेंबर-**

जिल्हयात विविध फळबाग योजनांच्या माध्यमातुन मोठया प्रमाणात आंबा फळबागांची लागवड होत असुन नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन निर्यातक्षम दर्जाचे आंबा फळांचे उत्पादन घेण्यात येत आहे . जागतीक बाजारपेठेतील ग्राहकांबरोबर स्थानीक बाजारपेठेत ग्राहकांमध्ये आरोग्याच्या सुरक्षतेबाबत विशेषत : किटकनाशकांच्या उर्वरीत अंशाबाबत जागरुक्ता निर्माण झालेली असून आंबा फळांचे उत्पादन करुन युरोपीयन व इतर देशांना निर्यात केले जाते . युरोपीयन देशांनी किटकनाशके उर्वत अंश मुक्तीची हमी अट घातल्याने सन २००४-२००५ पासून जिल्हयात अपेडाच्या मार्गदर्शनाखाली मँगोनेट या ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे निर्यातक्षम आंबा बागांची मोफत नोंदणी करण्यात येत आहे. सन २०२४-२५ या वर्षात दिनांक १ डिसेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत ट्रेसिबीलीटीनेट प्रणालीवर ऑनलाईन नोंदणी करण्यात येणार असून जिल्हयातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात नोंदणी झाल्यास निर्यातीस वाव मिळून शेतकऱ्यांना अधिक आर्थिक उत्पन्न मिळण्यास मदत होईल. याकरीता जिल्हयात कृषि विभागामार्फत गावपातळीवर विशेष मोहीम राबऊन कृषि सहाय्यक यांच्या मार्फत निर्यातक्षम आंबा बागांचे नोंदणीकीरता आंबा उत्पादक शेतकरी यांचे अर्ज घेण्याची कार्यवाही चालु आहे. जिल्हयातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी कृषि सहाय्यक यांच्याकडे नोंदणी अर्ज, ७/१२ , ८ अ उतारा, आधार कार्ड, मतदान कार्ड इत्यादी कागदपत्रे द्यावीत. अधिक माहितीसाठी गावातील कृषि सहाय्यक यांचेशी संपर्क करावा. जिल्हयातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी ट्रेसिबीलीटीनेट अंतर्गत नोंदणीकरीता मोठया प्रमाणात अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या वतीने करण्यात येत आहे .

### ज्ञानेश्वर बिराजदार यांचे निधन


**जळकोट, दि.२९ नोव्हेंबर-**



वागदरी (ता.तुळजापूर) गावचे माजी सरपंच, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर भाऊराव बिराजदार (वय ७५) यांचे दि. २८ रोजी रात्री ११ वाजता वाजण्याच्या सुमारास हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दि.२९ रोजी सकाळी ११.३०.वा. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस पाटील बाबुराव पाटील यांचे ते वडील होत.

### शिवशंकर वाघोले यांचे निधन

**जळकोट, दि. २९ नोव्हेंबर-**



येथून जवळच असलेल्या हंगरगा (नळ) या गावचे माजी सरपंच व विद्यमान महात्मा गांधी गाव तंटामुक्त समिती अध्यक्ष शिवशंकर आप्पाराव वाघोले (वय ८८) यांचे प्रदीर्घ आजाराने राहत्या घरी शुक्रवार (दि.२९) रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास निधन झाले. शिवशंकर वाघोले हे काँग्रेस पक्षाशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. शिवशंकर वाघोले यांनी हंगरगा (नळ) या गावचे सरपंचपद भूषवले असून, गावावर त्यांनी एकहाती सत्ता ठेवली होती. तंटामुक्त समितीचे ते सध्या अध्यक्ष होते. त्यांच्या पार्थिवावर उद्या शनिवार (दि.३०) रोजी दु.१ वा. हंगरगा (नळ) येथे त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात एक भाऊ, एक बहिण, एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. काँग्रेसचे कट्टर समर्थक व सामाजिक कार्यकर्ते संजय वाघोले यांचे ते वडील होत.

# कडकनाथवाडी साठवण तलावाला गळती

**गळती न थांबल्यास करोडो रुपये पाण्यात जाण्याची शक्यता**

**२०१७ देवेंद्र फडणवीसांनी नवीन तलावाचा घेतला होता आढावा**

**तभा वृत्तसेवा,**
**तेरखेडा, दि. २९ नोव्हेंबर-**

२०१४ ला राज्यात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी नागरिकांचे, शेतकऱ्यांचे प्रचंड हाल झाले होते. लोकांना पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागली होती. त्यात मराठवाड्यात मोठ्या दुष्काळाला सामोरे जावे लागले होते. शेती उद्योग मोडकळीस आला होता. दुष्काळात चारा छावण्या, नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय सरकारला कराव्या लागल्या होत्या. चारा आणि पाणी नसल्याने जनावरांचे प्रचंड हाल झाले होते. त्यावेळेस चे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही बाब लक्षात घेऊन दुष्काळ मुक्तीसाठी मराठवाड्यात मोठे पाऊल उचलले. त्यांनी दुष्काळी भागात भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. आणि अनेक दिवसांपासून आधीच्या काळात मराठवाड्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पाचा आढावा घेतला. मराठवाड्याची दुष्काळी ओळख कायमची मिटवण्यासाठी मराठवाड्यात अनेक उपाययोजना राबिवण्यास सुरुवात केली. यात नदी खोलीकरण, तलाव खोलीकरण तसेच नवीन तलावाची निर्मिती करत मराठवाड्याचा दुष्काळ हटवण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठे प्रयत्न केले. नोव्हेंबर २०१७ ला संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यात घेण्यात आलेल्या विविध निर्णयांच्या अमलबजावणीचा आढावा मुख्यमंत्र्यांनी एका बैठकीत घेतला होता. सन २०१७-१८ मध्ये कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पासह कृष्णा मराठवाडा प्रकल्पाला २५० कोटी रुपयांचा विशेष निधी



मंजूर करण्यात आला होता. यामुळे २००७ पासून रखडलेल्या कामाला गती प्राप्त झाली होती. मराठवाड्यातील पाण्याची गरज पाहता कोणत्याही परिस्थिती हे काम मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.

त्यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्यात वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी साठवण तलाव क्रमांक दोनचे काम पूर्ण करण्यात आले, असे सांगितले होते. यासाठी शासनाने करोडो रुपये निधी खर्च केला आहे. वाशी-भूम आणि परंडा तालुक्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या कृष्णा खोऱ्याचे पाणी याच कडकनाथवाडी साठवण तलावात लिफ्ट इरिगेशन आणि लोखंडी पाईपलाईन मार्फत येणार आहे. त्याचे कामही मोठ्या युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र ज्या कडकनाथवाडी साठवण तलावात पाणी येणार आहे. त्या साठवण तलावस मोठी गळती लागली आहे. तलावातून लाखो लिटर पाणी रोज वाया जात आहे. तलावाचे काम पूर्ण झाल्यापासून तलावाला गळती लागली आहे.

तलावाच्या भरावातून धबधब्या सारखे पाणी ओसांडून वाहत आहे. भरावातून पाणी जात असल्याने परिसरात भितीचे वातावरण आहे. यासंदर्भात नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागला तक्रारी केल्या आहेत. मात्र अधिकारी डोळेझाक करत आहेत. दुष्काळ निवारणासाठी कृष्णा खोऱ्यातून येणाऱ्या पाण्याच्या अगोदरच तलावातील पाणी निघून जात असल्याने तलावाच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. या तलावावर हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली येणार आहे. मात्र ही गळती न थांबल्यास तलावातून वाया जाणाऱ्या पाण्यासोबत शासनाचे करोडो रुपये ही पाण्यात वाहून जाणार आहेत. आणि शासनाचा उद्देश निष्फळ ठरणार आहे.

## दोन डिसेंबरला अणदूरच्या खंडोबाची यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**नळदुर्ग, दि. २९ नोव्हेंबर-**

नळदुर्ग (मैलारपूर) येथील श्री खंडोबा मंदिरात पावणेदोन महिन्याच्या वास्तव्यासाठी श्री खंडोबा देवाचे दि. ३ डिसेंबर रोजी पहाटे पाज वाजता वाजत गाजत आगमन होणार आहे. श्री खंडोबा देवाच्या आगमणाची नळदुर्गकरांना उत्सुकता लागली आहे.



नळदुर्ग (मैलारपुर)हे श्री खंडोबा देवाचे प्राचिन व पवित्र ठिकाण आहे. या खंडोबा देवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे हा खंडोबा देव सव्वा दहा महिने अणदुर येथील मंदिरात वास्तव्यासाठी असतात तर पावणेदोन महिने त्यांचे वास्तव्य नळदुर्ग (मैलारपुर) येथील मंदिरात असते. दि. २ डिसेंबर रोजी अणदूर येथे श्री खंडोबाची यात्रा भरते. ही यात्रा पार पडल्यानंतर दि. ३ डिसेंबर रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास श्री खंडोबा देवाचे नळदुर्ग (मैलारपूर) येथील श्री खंडोबा मंदिरात आगमन होते. रात्री बारा वाजता नळदुर्गचे मानकरी श्री खंडोबा देवाला आणण्यासाठी अणदुर येथील मंदिरात जातात. त्याठिकाणी त्यांचा मानपान करण्यात येतो. यानंतर अणदुर आणि नळदुर्गच्या मानकऱ्यांमध्ये खंडोबाची मुळ मुर्ती नेणे व आणण्याचा लेखी करार केला जातो. यानंतर रात्री अडीच वाजता खंडोबा मूर्तीचे पालखीमधून नळदुर्गकडे प्रस्थान होते.पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास श्री खंडोबा देवाचे आगमन नळदुर्ग (मैलारपूर) येथील मंदिरात होते. यानंतर या मंदिरात श्री खंडोबा देवाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात येते. याठिकाणी श्री खंडोबा देवाचे पावणेदोन महिने वास्तव्य असते. या कालावधीत याठिकाणी दर रविवारी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात. दर रविवारी याठिकाणी लहानशी यात्राच भरते. त्यानंतर दि. १२ ते १४ जानेवारी २०२४ या कालावधीत याठिकाणी श्री खंडोबा देवाची प्रचंड मोठी यात्रा भरते. यात्रेचा मुख्य दिवस १३ जानेवारी हा असुन या दिवशी याठिकाणी महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यातील लाखो भाविक उपस्थित असतात.

## कल्याण आखाडे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी; सावता परिषदेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**परंडा, दि. २९ नोव्हेंबर-**

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत स्टार प्रचारक म्हणुन महायुतीच्या बाजुने अत्यंत निष्ठेने भूमिका निभावली राज्यात झालेल्या विधानसभेच्या निकालामध्ये राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाची ताकद वाढविण्यामध्ये सावता परिषदेची मोलाची मदात झालेली आहे. कल्याणराव आखाडे या नेतृत्वाला न्याय म्हणून त्यांना विधान परिषद सदस्य म्हणुन संधी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडे सावता परिषदेचे प्रदेश संघटक शिवाजी अंबादास येवारे यानी केली आहे.

कल्याणराव आखाडे यांचा दांडगा जनसंपर्क व क्रीयाशील व्यक्तिमत्त्व म्हणुन त्याचा परिचय सावता परिषदेने महाराष्ट्राला दिलेला आहे. अमोघ वक्तृत्वाने त्यांनी समाजात जागर केला. साधता परिषदेच्या माध्यमातून राज्यातील माळी समाज जोडलेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. पक्षवाढीसाठी त्यांनी घेतलेली मेहनत सर्वांना ज्ञात आहे . नुकताच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत त्याची भूमिका निर्णायक राहिली राज्यात सावता परिषदेला मानणारा माळी समाजाची मते महायुतीच्या पारड्यात मिळाली अनेक मतदार संघात सावता परिषदेचा निर्णायक प्रभाव आहे, कल्याणराव आखाडे बानी अनेक मतदारसंघात प्रचार सभा घेतल्या घेतलेल्या प्रचार समेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भरभरून यश मिळालेले आहे. पाथरी विधानसभेत राजेश विटेकर यांचा विजय झालेला आहे. त्यांच्या होणा-या विधान परिषदेच्या रिक्त जागी कल्याणराव आखाडे यांना संधी दयावी. विधानपरिषदेत संधी देऊन आगामी काळात काम करण्यास बळ मिळेल अशी अपेक्षा अजितदादा पवार यांच्याकडे सावला परिषदेचे प्रदेश संघटक शिवाजी अंबादास येवारे ता.परंडा जि.धाराशिव व प्रदेश संघटक राष्ट्रवादी कॉंग्रेस शिवाजी अंबादास येवारे यांनी व्यक्त केली आहे.

### स्टॅन्ड अप इंडिया योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**धाराशिव दि.२९ नोव्हेंबर-**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील नव उदयोजकासाठी स्टॅन्ड अप इंडिया ही योजना सुरु केली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने जिल्हयातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील १८ वर्षावरील नवउद्योजकांना १० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टॅन्ड अप इंडिया योजनेतंर्गत ७५ टक्के कर्ज मंजुर केल्यानंतर उर्वरित फ्रॉन्ट एन्ड सबसिडी १५ टक्के राज्य शासनाकडून देण्यात येईल. तरी पात्र इच्छुक नवउद्योजकांनी समाज कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, धाराशिव कार्यालयाशी संपर्क साधावा.

## स्वाधार योजनेस १६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. २९ नोव्हेंबर-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तथा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन भत्ता,निवास भत्ता आणि निर्वाह भत्ता तसेच इतर शैक्षणिक सुविधा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार या योजनेतून उपलब्ध करुन देण्यात येतात.

समाज कल्याणाच्या वसतिगृह प्रवेश योजना व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ह्या https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. सन २०२४ -२५ करिता अर्ज सादर करण्यासाठी ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु विद्यार्थ्यांचे उशिरा सुरू होणारे शैक्षणिक सत्र,स्वाधार योजनेचे ऑनलाईन अर्ज करताना येत असलेल्या तांत्रिक अडचणींचा विचार करता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना १६ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे.तसेच ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज सादर केले आहेत. आणि वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे आपोआप स्वाधार योजनेसाठी वर्ग होणार आहेत. अशा विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेसाठी नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. तरी ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत अर्ज सादर केलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेकरिता १६ डिसेंबर २०२४ पूर्वी अर्ज करून स्वाधार योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

### नळदुर्ग नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला फायर बाईक प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**नळदुर्ग, दि.२९ नोव्हेंबर-**

अग्निशमन विभागाकडून नळदुर्ग नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला फायर बाईक प्राप्त झाली असून या फायर बाईकचा उपयोग शहरातील गल्ली बोळात लागलेली आग विझवण्यासाठी होणार आहे. नळदुर्ग नगरपालिकेला अग्निशमन विभागाकडुन फायर बाईक मिळाली असुन या फायर बाईकचे वैशिष्ट्ये असे आहे की ही फायर बाईक ग्रामिण भागातील गल्ली बोळात तसेच ज्या ठिकाणी अग्निशमनची मोठी गाडी जात नाही त्याठिकाणी जाऊन ही बाईक आग विझविण्याचे काम करणार आहे. या बाईकमध्ये १०० लिटर पाण्याची व्यवस्था असुन या बाईकमध्ये जो गण आहे त्याची क्षमता १०० मिटर अंतरापर्यंत उच्च दाबाने पाणी फवारणी करण्याची आहे. त्याचबरोबर या बाईकमध्ये सायरनचीही व्यवस्था आहे. ही बाईक एकच व्यक्ती हाताळु शकतो. त्यामुळे या बाईकचे फायदे जास्त आहेत. गल्ली बोळात आग लागल्याचे समजताच तात्काळ ही बाईक कितीही रस्ता अरुंद असला तरी त्याठिकाणी पोहचु शकते हे या बाईकचे वैशिष्ट्ये आहे.

## खुर्चीसाठी रात्रीचा दिवस करणाऱ्यांनी शेतकऱ्यांकडे लक्ष द्यावे

**आ. कैलास पाटील यांचा महायुतीवर निशाणा**

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. २९ नोव्हेंबर-**

सध्या महायुती सत्तेच्या सारीपाटामध्ये दंग आहे. यासाठी जसा वेळ देता तसा शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी द्यावा, सध्या सोयाबीन बाजारात कवडीमोल दराने विक्री होत आहे. अशावेळी ही सत्ताधारी मंडळी मात्र स्वतःच्या खुर्चीसाठी धावाधाव करत आहेत. निवडणुकीत लाडका शेतकरी म्हणनारी मंडळी आता काय करत आहे. असा प्रश्न आमदार कैलास पाटील यांनी महायुतीला केला आहे.

आमदार पाटील यांनी खरेदी केंद्रात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. तेव्हा पत्रकाराशी बोलताना म्हणाले की, सद्या धाराशिव जिल्ह्यात १८ ठिकाणी खरेदी केंद्र सुरु केली. आतापर्यंत २५ हजार क्विंटल खरेदी झाली आहे. पण जिल्ह्यातील उत्पन्न पाहता ही खरेदी अजून अर्धा टक्के सुद्धा झालेली नाही. जिल्ह्यात सोयाबीनच एकूण क्षेत्र चार लाख ६२ हजार ८७२ इतकं होत, त्यातून कृषि विभागाच्या अधिकृत आकडेवारी नुसार एकूण उत्पन्न हे ७८ लाख ५९ हजार ५६६ क्विंटल एवढं आहे. असं असताना आतापर्यंत फक्त २५ हजार क्विंटलच खरेदी झाली आहे.म्हणजे याचं गतीन खरेदी झाल्यास ९५ टक्के सोयाबीन हे खुल्या बाजारात पडेल त्या किमतीने शेतकऱ्यांना विकण्याची वेळ येणार आहे. त्यातही केंद्राच्या परिपत्रकानुसार १२ टक्के ओलाव्याची अट होती त्यात नंतर निवडणुकीत ते १२ ऐवजी १५ टक्के ओलावा असला तरी सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. मात्र हा निर्णय देखील चुनावी जुमलाच ठरल्याचं दिसत आहे. कारण अजूनही निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. अंमलबजावणीला जसा वेळ होईल तसं शेतकऱ्यांच्या सोयाबीनमधील ओलावा आपोआप कमी होत आहे.या निर्णयाची अंमलबजावणी लवकर करावी. तसेच सरकारने खरेदी केंद्राची संख्या अजून दुपट्टीने वाढवली तरच काहीप्रमानात ही खरेदी वाढेल. अन्यथा ही खरेदी जेमतेम चार ते पाच टक्केच्या पुढे जाणे शक्य नसल्याच आमदार पाटील यांनी म्हटले आहे. खरेदीस नकार दिलेल्या सोयाबीनच्या खरेदीचा प्रश्न मोठा असणार आहे.. काडी, कचरा, ओलावा व अन्य कारणांमुळे केंद्रावर रिजेक्ट केलेल्या सोयाबीनच्या खरेदीबाबत गोंधळ निर्माण झालेला असून त्याबद्दलही सरकारने ठोस भूमिका घेतली पाहिजे अशी अपेक्षा आमदार पाटील यांनी व्यक्त केली आहे.

सोयाबीनची चार हजार ८९२ रुपये क्विंटलच्या हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला असला तरी अटी व निकषामुळे एवढा दर शेतकऱ्यांना मिळत नसल्याच चित्र आहे. अटी व निकष लावल्याने शेतकरी या खरेदी केंद्राकडं पाठ फिरवत आहे, शेतकरी लाडका असेल तर त्याच्या कष्टाने पिकवलेल्या मालाला कसल्या अटी व निकष लावता असा सवाल सुद्धा आमदार पाटील यांनी सरकारला विचारला आहे.

### शिष्यवृत्तीचे पात्र अर्ज सादर करा; समाजकल्याण विभागाचे आवाहन

**धाराशिव दि.२९ नोव्हेंबर-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनेचे सन २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरण्याकरिता http://mahadbtmahit.gov.in हे संकेतस्थळ २५ जुलै पासून सुरू केले आहे. सन २०२४ -२५ या वर्षाकरिता महाडीबीटी प्रणालीवर अद्यापपर्यंत ३७५८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले असून त्यापैकी १७०२ अर्ज हे महाविद्यालयस्तरावर प्रलंबित आहेत. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अद्यापपर्यंत अर्जांची पडताळणी करून सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण या कार्यालयाकडे सादर केले नाहीत. जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी सन २०२४ - २५ करिता आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवर प्रलंबित असलेले अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे पात्र अर्ज मंजुरीकरीता तात्काळ या कार्यालयाकडे सादर करावे. ज्या अर्जात त्रुटी असतील असे अर्ज त्रुटी पुर्तता करुनच कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करावेत. महाविद्यालयाच्या लॉगिनला एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याकरिता महाविद्यालयस्तरावरून सूचित करावे. असे आवाहन समाज कल्याणाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांचा होणार भव्य नागरी सत्कार

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे नागरी सत्कार समितीकडून आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**

बीड विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार संदीप क्षीरसागर यांचा भव्य नागरी सत्कार बीड येथे रविवारी (दि.१) रोजी होणार असून याप्रसंगी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नागरी सत्कार समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील एकमेव निष्ठावंत आमदार संदीप क्षीरसागर यांची तब्बल दुसर्यांदा आमदार पदी जनआशिर्वादाने निवडून आले आहेत. अनेक अडचणी, दबाव, संकटे यांना न जुमानता आ.क्षीरसागर आपल्या आणि पक्षांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिले. याचेच बक्षीस म्हणून बीडच्या जनतेने आ.संदीप क्षीरसागरांना दुसर्यांदा विधानसभेत पाठवून प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आ.संदीप क्षीरसागर दुसर्यांदा आमदार झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी बीड शहर नागरी सत्कार समितीच्या वतीने रविवारी (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे सकाळी ११ वा. भव्य नागरी सत्कारा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मायबाप मतदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा असे आवाहन नागरी सत्कार समितीकडून करण्यात आले आहे.

# युवकांनी नवं नवीन उद्योगात उतरावे-राजेंद्र मस्के



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**

वाढती बेकारी आणि नोकऱ्यांचा तुटवडा लक्षात घेता तरुणांनी व्यवसाय उद्योगाकडे वळावे. गरज ही शोधाची जननी असून युवकांनी आपल्या परिसरात जनतेला आवश्यक असणाऱ्या विविध गरजांचा अभ्यास करून नव नवीन उद्योगात उतरून स्वावलंबी झाले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे नेते, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मोहिनिनाथ अर्थमुहर्स शुभारंभ प्रसंगी व्यक्त करून, उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व विलास काकडे यांना शुभेच्छा दिल्या.


बोरफडी गावचे उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व जरुड येथील युवा कार्यकर्ते विलास काकडे यांनी जेसीबी (पोकलेन) मशीनच्या माध्यमातून नवीन व्यवसायाला सुरवात केली. आज जरुड फाटा येथे मोहिनिनाथ अर्थमुहर्सचा शुभारंभ गोरक्षनाथ टेकडीचे महंत नवनाथ बाबा महाराज, भवानीगड संस्थानचे महंत अखंडानंद गिरी महाराज, जरुड संस्थानचे महंत नवनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व शेतकरी मित्र राजेंद्रजी मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

## आठरा पगड जातीचा माजलगांवचा देव खंडोबा

# चंपाष्टी निम्मित मंदीरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ नोव्हेंबर**

शहरातील पुरातन सर्वांचे कुलदैवत व आराध्य दैवत जागृत देवस्थान श्री. खंडोबा मंदीरात २९ नोव्हेबर शुक्रवार रोजी भक्तांचा उपस्थित घटस्थापना करण्यात आली व यात्रे ला प्रारंभ करण्यात आला आहे. चंपाष्टी यात्रा निम्मित मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे चे आयोजन केले आहे.तरी सर्वा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा आसे अवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तजनाने केले आहे.



एके काळी माजलगांव मध्ये आपल्या सर्वांचे कुलदैवत असलेले श्री खंडोबा मंदीर खंडोबा मैदानात. पाय ठेवायला जागा पुरत नव्हती एवढी मोठी खंडोबा यात्रा. भरत होती आता जागेच्या आभावीमुळे थोड्या प्रमाणात खंडोबा यात्रा भरते. पुरातन दगडी चिरेपासुन माजलगांवच्या खंडोबा मंदिर बनवलेले होते. तेच दगडी चिरे आज भी जशा तशे आसुन.मंदीराच्या आत मधील गभारात चिर किवां छिद्र सुध्दा दिसणार नाही आस मजबुत दगडी चिरेच्या बाहेरच्या लगत नवीन बांधकाम केलेले आहे.माजलगांव चे पुरातन खंडोबा मंदीर है ७० वर्षोंच्या पुढचे आहे. खंडोबाच्या समोरचा नंदी सुध्दा पन्नास वर्षाच्या पुढचा आहे. आजुक सुध्दा जसा तसा आहे. या खंडोबाच्या नंदीच वजन जास्त आहे. पाच जनाला सुध्दा उचलत नाही.श्री खंडोबा देव , म्हालसांदेवी व बानुदेवी या देवाच्यां मुर्ती साक्षात भूतलावर आवतरल्या सारख्या वाटतात.

२९ नोव्हेबर रोजी मंदीरात घटस्थापना , ६ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजता २१०० दिपोत्सवचा कार्यक्रम , ७ नोव्हेबर रोजी चंपाष्टी निम्मित ५ वाजता सकाळी देवाचा महाभिषेक ला सुरुवात होईल सकाळी ७ वाजता खंडोबा मल्हासादेवी ,बाणुदेवी यांचा विवाहचा कार्यक्रम ,व महाआरती सहीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे तरी भाविक भक्तानी धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तजनाने केले आहे

खंडेरायाला रेवड्या व भंडाराची उधलन

माजलगांवच्या खंडोबाला चंपाष्टी दिवशी माजलगांवतील आठरा पकड जाती चे भाविक खंडोबा मंदीरात येऊन. सदानंदाचा येळकोट येलकट जय मल्हार चा गजरात रेवड्या भंडाराची उधलन होते. रेवड्या व भंडारा मंदिरावर उधलेला भक्तजन प्रसाद म्हणून घेतात. व आपल्या कपाळावर भंडारा लावतात.

घरोघरी तली भंडारा

माजलगांव शहरातील भाविक आपल्या घरी चंपाष्टी दिवशी. देवाच्या ताब्यांचे कोंटुबाची पुजा करून. वाग्यांचे भरीत, बाजरीची भाकरी, काद्यांची पात. इत्यादी पदार्थाचा नैवेद्य. ठेवुन पाच वेळा सदानंदाचा येळकोट येलकट जय चा गजर करुन. तली भंडारा कार्यक्रम होतो. व वागीं व कांदा खानाची परवानगी मिलते

# अंबाजोगाईत मोबाईल हिसकावुन नेणारी टोळी जेरबंद;स्थानिक गुन्हे शाखा बीडची उल्लेखणीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

अंबाजोगाई शहरात मोटार सायकल वर येवुन पाई जात असलेल्या व्यक्तीचे मोबाईल हिसकावुन नेवुन चोरी करणारी टोळी सक्रिय झाली होती दरम्यान दोन गुन्हयांची नोंद पो.स्टे.अंबाजोगाई शहर ठाण्यामध्ये नोंदविण्यात आली होती. सदर चोरीचे अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण करुन स्थागुशा बीड येथील पोउपनि सुतळे यांना याकामी पाचारण केले. पोउपनि सुतळे यांनी दिनांक २८/११/२०२४ रोजी अंबाजोगाई शहर आरोपी शोध घेत असतांना गुप्त बातमी मिळाली की, निखील लक्ष्मण घाडगे रा.दौनापुर याचेकडे चोरीचा १० प्लस मोबाईल असुन तो मुकूंदराज सभागृह समोर आहे अशी खात्रीशिर माहिती मिळाल्यावरुन स्था.गु.शा.पथकाने तात्काळ रवाना होवुन नमुद ठिकाणावरुन निखील लक्ष्मण घाडगे व त्याचे दोन मित्रांसह मिळुन आला. निखील यास मोबाईल संदर्भात विचारपुस करता त्याने त्याचे इतर दोन मित्र (अल्पवयीन) यांचेकडुन घेतला असल्याने कळविले. दोन अल्पवयीन इसमांना मोबाईल बद्दल विचारपुस केली असता त्यांचेकडुन अंबाजोगाई शहर २५८/२०२४ कलम ३९२,३४ या गुन्हयातील गेलामाल मिळुन येवुन त्यांची संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यांचेजवळ



एक आय फोन १६ प्रो कं. मोबाईल मिळुन आला असुन सदर मोबाईल त्यांनी पाई जाणाऱ्या पादचाऱ्याचा हिसकावुन चोरी केला होता अभिलेख पाहता अंबाजोगाई शहर येथे गुरनं ४६१/२०२४ कलम ३०४(१) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयाची नोंद मिळुन आली. त्यानंतर त्यांचे ताब्यात दोन विनानंबरच्या दोन होंडा शाईन मोटार सायकली मिळुन आल्या अभिलेख पाहता १) पो.स्टे.यु.वडगाव गुरनं १७३/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. व पो.स्टे.परळी ग्रामीण गुरनं २३०/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयात चोरी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपी निखील लक्ष्मण घाडगे वय २० वर्षे रा.दौनापुर ता.परळी हा जबरी चोरीचे गुन्हयात निष्पन्न झाला व दोन विधीसंघर्षग्रस्त बालके त्याचे इतर एक मित्रासह जबरी चोरी व मोटार सायकल चोरी अशा चार गुन्हयात निष्पन्न झाल्याने त्यांचे कडुन चोरीचे दोन मोबाईल व दोन चोरीच्या मोटार सायकली व गुन्हा करण्यासाठी वापरलेले स्पेंडर मो.सा. असा एकुण २,१०,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नमुद आरोपींना पो.स्टे.अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास अंबाजोगाई शहर करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख, पो.नि.श्री. धिरज घोळवे अंबाजोगाइ शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, श्रेपोउपनि हनुमान खेडकर, पोह/ मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, राजु पठाण, अश्विनकुमार सुरवसे, चालक नितीन वडमारे, यांनी मिळुन केली आहे.

# अंबाजोगाईच्या गोदामातील धान्याला पाय फुटले

## गरीबांना मिळणारे मोफत धान्य कोणाच्या घशात
## पन्नास किलोच्या तांदळाच्या पोत्यात निघाले चाळीस किलो

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

येथील शासकीय गोदामात आलेल्या गहू व तांदळाला कट्ट्यागणीस दहा किलोला पाय फुटल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाला कोणाच्या पाठबळ आहे. हा संशय व्यक्त केला जात आहे. स्वस्त धान्य दुकानदारांच्या दिलेल्या धान्यातून पोत्यातून माल कसा गायब होतो. याकडे तहसीलदार व उपजिल्हाधिकारी लक्ष देणार का? याकडे लक्ष लागले आहे.



शासनाच्या वतीने गरीब नागरिकांना मोफत गहू व तांदळाचे वाटप कर्ते परंतु गरीबासाठी आलेले धान्य पोत्यातून गायब होवू लागले आहे. अंबाजोगाईच्या गोदाम रक्षक म्हणून एस.आर.बलुतकर यांची ऑर्डर झालेली असतानाही तहसीलदाराच्या आशिर्वादाने दुसर्याच व्यक्तीला या गोदामात बसविले आहे. त्यामुळे या गोदामात सध्या सावळा गोंधळ सुरू आहे. शासनाकडून पन्नास किलोच्या पोत्यामधील दहा किलो धान्य गायब होत असून हे धान्य कोणाच्या घशात जात आहे. हा संशयाचा विषय आहे. शासकिय धान्य घोटाळ्यात बीड पासून स्थानिक पातळीपर्यंत यंत्रणा बरबटली असून याकडे कोणी लक्ष देणार का? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. शासनाकडून नियमाप्रमाणे एका पोत्यामध्ये पन्नास किलो धान्य व पाचशे ग्रॅम पोत्याचे वजन क्रम बाह्य आहे. परंतु अंबाजोगाईच्या गोदामातून चाळीस किलो धान्य व पोत्याचे २४० या प्रमाणे धान्य स्वस्त धान्य दुकानदाराला वाटप होत आहे. आज शुक्रवारी अंबाजोगाई तालुक्याती येल्डा येथील ग्रा.प.कार्यालया अंतर्गत असलेल्या स्वस्त धान्य दुकानदाराला दिलेले धान्य पोत्यासह काट्यावर मोजमाप केले असता. चाळीस किलो धान्य निघाले. उर्वरीत दहा किलो धान्य कोणाच्या घशात गोदाम रक्षक घालित आहे. याची चौकशी करणे गरजेचे आहे. अंबाजोगाईतील सावळ्या गोंधळाकडे जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी चौकशी करणार का? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे.

# जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा वाळू माफीयांना पुन्हा एकदा दणका

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**



बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी नुकतीच वाळू माफीयांविरोधात कारवाई करत दोन हायवा जमा केल्या . यामुळे महसूल अधिकारी व कर्मचारी हे सतर्क झाल्याचे दिसून येत आहे . त्याचाच भाग म्हणून बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , त्यांचे अधिनस्त नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर हे दिवस रात्र गस्त घालत असून वाळू चोरीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे.

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी दि. २८ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह पथक प्रमुख नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व पथकाने पाली येथून केजकडे जात असताना नेकनूर रोडवर मांजरसुब्याजवळ अंदाजे ५ ब्रास अवैध वाळू वाहतूक करणारा एल पी ट्रक MH23-U0449 पकडून पोलीस स्टेशन नेकनूर यांचे ताब्यात दिला . सदर वाहनावर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही करण्यात येईल असे तहसीलदार यांनी सांगितले . या वाहनाचे मालक प्रशांत नवले , राहणार पाली , तालुका जिल्हा बीड हे असून, ड्रायव्हर उमेश नेमाने हा आहे.

या कार्यवाहीमध्ये मंडळ अधिकारी अशोक डरपे , मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे , पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंघाळे , तलाठी विकास ससाणे , तलाठी संजय नेवडे , तलाठी अनिल गायकवाड , तलाठी कृष्णा रत्नपारखी , तलाठी अक्षय शिंदे , महसूल सहायक अमोल डोंगरे यांचाही सहभाग होता.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी अशाच प्रकारच्या कारवाया जिल्हाभर सुरू ठेवण्याबाबत सर्व संबंधित विभागांना सुचित केलेले आहे.कोणीही अनधिकृत रित्या गौण खनिजाची वाहतूक करू नये तसेच नागरिकांनी सुद्धा अशा प्रकारची गौण खनिजाची अवैध वाहतूक होत असल्यास त्याबाबत संबंधित महसूल अधिकारी पोलीस अधिकारी यांना तात्काळ कळवावे असे बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची हयगय केली जाणार नाही, असा इशारा दिलेला आहे.अवैधरित्या गौण खनिजाची म्हणजेच वाळू , मुरूम यांची वाहतूक करणारी वाहने दिसल्यास अथवा साठे आढळून आल्यास त्याची माहिती संबंधित मंडळ अधिकारी , तलाठी , पोलीस अधिकारी , पोलीस पाटील यांना तात्काळ द्यावी आणि नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे असे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केलेले आहे.

# बिबट्याला जेरबंद करण्यासाठी टीम सक्रिय : 'त्या' शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यासाठी कार्यवाही सुरु - विजया शिंगोटे


**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

अंबाजोगाई तालुक्यातील काही भागात बिबट्याने धुमाकूळ घातला असून त्याच्या वावराने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. पुस - जवळगाव, ममदापूर - पाटोदा या नंतर आता बिबट्याने माकेगाव परिसरात मोर्चा वळवला आहे. माकेगाव येथील शेतकरी रवि देशमुख यांच्या शेतातील बैलाचा बिबट्याने फडशा पाडला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी त्याचा शोध घेत आहेत, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

या संदर्भात वन विभागाच्या अधिकारी विजया शिंगाटे यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी सांगितले की, अंबाजोगाई तालुक्यातील पुस - जवळगाव भागातील ग्रामस्थांनी बिबट्याची माहिती दिल्यानंतर आम्ही त्या परिसराला भेट देऊन त्या ठिकाणची पाहणी केली आहे. या पाहणीत आम्हाला बिबट्याचे ठसे आढळून आले आहेत. त्यानंतर काल रात्री ममदापूर - पाटोदा परिसरातील ग्रामस्थांनीही बिबट्याच्या वावराची माहिती दिली. त्याही भागात आम्ही काल रात्रीच पेट्रोलिंग करत पाहणी केली आहे. तसेच या परिसरातील ग्रामस्थांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

पंचनामा करताना वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी

दरम्यान, आज सकाळी माकेगाव परिसरातील रवि देशमुख यांच्या शेतातील बैलाचा बिबट्याने फडशा पाडला असल्याची माहिती मिळाली. आम्ही लागलीच त्या ठिकाणी आमची टीम घेऊन गेलो आणि सदरिल घटनेचा पंचनामा केला. त्यासोबतच पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही सदरिल घटनेचा पंचनामा करीत 'त्या' बैलाचे शवविच्छेदन केले आहे. यात बिबट्यानेच त्याचा फडशा पाडला असल्याचं उघडकीस आले आहे. त्यामुळे आम्ही बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पावले उचलली आहेत. त्यासाठी आम्ही या परिसराची पाहणी केली असून राडी शिवारात बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावणार आहोत. तसेच माकेगाव येथील शेतकरी रवि देशमुख यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कार्यवाही सुरु केली असल्याचे विजया शिंगाटे यांनी आमच्याशी बातचीत करताना सांगितले.



ग्रामस्थांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन

अंबाजोगाई तालुक्यातील पुस - जवळगाव, ममदापूर - पाटोदा या भागात ऊसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून या ठिकाणी लपण्यासाठी बिबट्याला पाहिजे तशी जागा आहे. त्यामुळे निश्चितच तो या ठिकाणी वावरत असणार आहे. शेतकऱ्यांनी शेतात जाताना एकटं जाऊ नये, त्यासोबतच शेतात राहणाऱ्या ग्रामस्थांनी लहान मुलांना एकटं सोडून नये, शेतात फिरताना जमावाने जावं आणि सोबत लाकडी काठी किंवा इतर साहित्य घेऊन जावं. पुस - जवळगाव, ममदापूर - पाटोदा या भागातील ग्रामस्थांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करीत बिबट्या दिसताच वनविभागाला कल्पना द्यावी, असं आवाहनही वन अधिकारी विजया शिंगाटे यांनी केले आहे.

# देशातील सर्वांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करणाऱ्या महात्मा फुलेंचा वारसा पुढे नेणे गरजेचे-जगताप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ नोव्हेंबर**

तत्कालीन संकटांना सामोरे जाऊन स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी पुढाकार घेणारे महात्मा ज्योतिबा फुले हे खऱ्या अर्थाने समाज नायक होत. केवळ स्त्रीयांनाच नाही तर देशातील सर्वांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करणाऱ्या महात्मा फुलेंचा वारसा पुढे नेणे गरजेचे आहे. शिक्षणाशिवाय समाजोपयोगी अनेक गोष्टींसाठी त्यांनी कार्य केले याचा ही अभ्यास आपण केला पाहिजे. असे प्रतिपादन उमेश जगताप यांनी केले. स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात महात्मा फुले स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते.



यावेळी विषय मांडणी करताना सौ. गौरी डावखरे यांनी महात्मा फुलेंचा जीवन पट विद्यार्थ्यांसमोर मांडला व त्यांच्या कार्याचे स्मरण केले.यावेळी कुमारी अमृता वडमारे हिने महात्मा फुले यांच्यावर आपले विचार व्यक्त केले.यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेशजी जगताप, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर, सौ. गौरी डावखरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन सौ स्मिता नरहरे यांनी केले.

# मंत्रीपदावर लाडके दादा आ.केराम यांची वर्णी लागावी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर दि.२९ नोव्हेंबर**

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला त्यात प्रामुख्याने भारतीय जनता पार्टीला आई श्री रेणुकादेवी, प्रभु श्री दत्तात्रेय,माता श्री अनुसया यांचे कृपाशिर्वादाने छप्परफाडके यश मिळाले आहे.मतदारांनी महायुतीला पुन्हा सत्तास्थापनेसाठी बहुमताने स्पष्ट कौल दिला आहे.भाजपाकडून सध्याचे हंगामी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आगामी मुख्यमंत्री होण्याचा मार्ग देखील महायुतीकडून मोकळा झाला आहे.आता सर्वांना प्रतिक्षा आहे ती राज्यातील नवीन सरकारच्या शपथविधीची.इकडे किनवट/माहूर विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार प्रदीप नाईक यांची भेदक गोलंदाजी फोडून ९२८३६ नॉट आऊट राहत दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार भीमराव केराम यांच्यासाठी अभी नहीं तो कभी नहीं म्हणत त्यांची मंत्रीमंडळात वर्णी लागावी म्हणून मुंबई मुक्कामी जोरदार फिल्डींग लावण्यात आली आहे..नांदेड जिल्ह्यातल्या एकूण नऊही विधानसभेत विरोधकांना पार वॉशआऊट करत महायुतीने विजयी झेंडा फडकावला आहे. गतपंचवार्षिक काळातील सत्तासंघर्षाच्या नाट्यमय घडामोडीनंतर उद्भवलेली राजकीय परीस्थिती महायुतीचे सरकारने चाणक्य नीतीने यशस्वीपणे हाताळली.परंतु,आधे इधर,आधे उधर,बचे हुए मेरे साथ लेकिन कौन किसके साथ याचा पार्टी प्रमुखासह जनतेलाही थांगपत्ता लागत नव्हता. त्यामुळे जिल्ह्यासाठी पालकमंत्री म्हणून जिल्ह्याबाहेरील आमदार आयात करावा लागला.यावेळी झालेल्या विधानसभा निवडणुकीत सर्वच्या सर्व आमदार हे महायुतीचे निवडून आले आहेत.त्यात भाजपचे ०५, शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे ०३ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचा ०१ अशा एकूण ०९ आमदारांचा समावेश आहे.ज्यामध्ये भाजपकडून किनवट-आ.भीमराव केराम, भोकर-आ.ड.श्रीजया चव्हाण, मुखेड-आ.डॉ. तुषार राठोड, शिवसेनेचे राज्यमंत्री दर्जा प्राप्त तथा विधानपरिषदेचे आ.हेमंत पाटील आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे लोहा - आ.प्रताप पाटील चिखलीकर हे पाच आमदार मंत्रीपदाच्या शर्यतीत असल्याची राजकीय वर्तुळातून चर्चा ऐकू येत आहे.यातील भाजपाचे आ.भीमराव केराम शर्यतीत सगळ्यात पुढे असल्याचे सांगण्यात येत आहे.तर भाजपकडूनच मुखेडचे आ. डॉ. तुषार राठोड यांच्या नावाची देखील चर्चा सुरू आहे.



शिवसेनेचे आ.हेमंत पाटील व राष्ट्रवादीचे लोहा चे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नावाची मंत्रीमंडळात वर्णी लागण्याची शक्यता राजकीय निरीक्षकांकडून वर्तविण्यात येत आहे.यामध्ये २०१९ पर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा बालेकिल्ला समजला जाणारा किनवट सारख्या आदिवासी बहुल मतदारसंघात सलग दोन निवडणुकीत भाजपाचा झेंडा फडकावलेले आदिवासी समाजातील अनुभवी आणि विकासाभिमुख दूरदृष्टी लाभलेले भाजपाचे आ. भीमराव केराम यांना आदिवासी समाजाला प्रतिनिधीत्व देण्याच्या दृष्टीने आ.केराम यांची यंदाच्या मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तविण्यात येत आहे.आणि हाच येथील आदिवासी बहुल मागासलेल्या माहूर व किनवट तालुक्यातील जनतेला दिलेला योग्य न्याय असेल यात काहीच शंका नाही.सोबतच राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेल्या माहूरला येणाऱ्या कोट्यवधी भाविकांना पुरेपूर सोयीसुविधा उपलब्ध करून देत तिर्थक्षेत्राचा विकास साधण्यासाठी देखील उचित ठरेल.

**किनवट मतदारसंघास २५ वर्षापासून मंत्रीपद नाही : गोपु महामुने**

किनवट-माहूर सारख्या आदिवासी बहुल मागासलेल्या मतदारसंघास गेली २५वर्षा पासून मंत्री पद नाही.ही अत्यंत खेदाची बाब आहे. आता ती खरी वेळ आली आहे.राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची आणि आदिवासी समाजाची बुलंद तोफ, आदिवासींचे फ्रंट नेतृत्व,आदिवासींचा आवाज, आदिवासींची अस्मिता, आदिवासींचा हित जपणारा नेता म्हणजे किनवट-माहूर विधानसभा मतदासंघाचे भाग्यविधाते नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना मंत्रीपद देऊन आदिवासींचे खांदे बळकट करण्याची नितांत गरज आहे.

**आ. केराम यांना मंत्रीपद देऊन सन्मानीत करावे : अनिल वाघमारे**

राज्याचे नेतृत्व लाडके उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी करावे अशी तमाम जनतेची भावना असून, एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा बालेकिल्ला समजला जाणारा किनवट मतदारसंघ एकवेळ नाही तर दुसऱ्यांदा गड काबीज केलेले,मतदारसंघात जमिनीवरचा सच्चा कार्यकर्ता तेसर्वसामान्यांसाठी धाऊन येणारा नेता अशी साधे राहणीमान मात्र उच्च विचारसरणी असलेले किनवट माहूर चे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिपद देऊन सन्मानित करावे आणि भाजपचा हा बालेकिल्ला आणखी मजबूत करावा.

**आ. केरामांना नामदार करण्याची गरज : कांतराव घोडेकर**

मंत्री मंडळ विस्ताराचा मार्ग आता मोकळा झालेला आहे. किनवट येथील प्रचार सभेत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आपल्या भाषणातुन किनवट व माहूर तालुक्याच्या विकास साधण्यासाठी विधानसभेत आमदार म्हणुन भीमराव केराम यांना प्रचंड मतानी विजयी करा असे आवाहन केले होते.झाले ते आमदार आता या मतदारसंघासाठी मंत्रीपद देऊन केराम यांना नामदार करण्याची गरज आहे.

**आ. केराम यांना मंत्रीपद मिळणे काळाची गरज : निर्मला जोशी**

राज्यातील जनतेने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवल्याने राज्यात महायुती बहुमतात आली व त्यासाठी आता राज्यास विकासाचे मॉडेल करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ हवी आहे.त्याकरिता आम्ही सर्व महिला पदाधिकारी व लाडक्या बहिणींनी आई रेणुकेच्या चरणी साकडे घातले आहे. त्याचप्रमाणे किनवट माहुर मतदारसंघ हा अतिदुर्गम डोंगराळ मागासलेला भाग असल्याने येथे उच्च शैक्षणिक सोई सुविधा व उद्योग धंद्यांची वाणवा आहे ते भरुन काढण्यासाठी आमदार भीमराव केराम यांना नामदार होणे गरजेचे आहे म्हणून त्यांना मंत्रिपद मिळणे ही काळाची गरज आहे.

## संक्षिप्त वृत्त



### हजरत टिपू सुलतान जयंती साजरी

**आदमपूर**-मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगांव येथे थोर भारतीय स्वातंत्र्य सेनानी,शहीद शेर-ए-हिंद हज़रत टिपू सुलतान रहेमतुल्लाह अलैह यांची जयंती सामुहिक साजरी करण्यात आली. प्रारंभी हज़रत टिपू सुलतान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी समाज बांधव आणि गावकरी यांनी एकत्र येऊन गाव परिसरातून वाजत गाजत मिरवणूक काढून जयंती उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी उलेमा वक्फ बोर्ड मुखेड तालुकाध्यक्ष काझी सय्यद सुबानी, शेख साबीर, शेख जावेद, पठाण अनवर खान,नासरखाँ पठाण, तंटामुक्त अध्यक्ष नारायण पाटील जाधव ,माजी सरपंच व्यंकटराव एकाळे, महाराष्ट्र ग्रामीण बँक सहाय्यक महमदरफी मदार, जयंती मंडळ अध्यक्ष सरदार शेख,उपाध्यक्ष माजीद शेख, सचिव हज़रत बालेसाब शेख,कोषाध्यक्ष शाहेद शेख, क्रमवार सदस्य मुजाहिद सय्यद, समीर शेख, मुस्तफा शेख,एजास सय्यद, मदार शेख, शौकत शेख, मुख्तार शेख, बबलू शेख, अली शेख, सैलानी शेख, नबीसाब शेख, रामदास काळे, किशनराव एकाळे, दादाराव पाटील, बालाजी पाटील व गावकरी यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

### निवघा(बा) येथे लहुजी साळवे जयंती साजरी



**निवघा (बा)**-ध्वजारोहण सरपंच शेख इस्माईल व माजी उपसरपंच शाम पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्ष आणि उपस्थित होते यावेळी भव्य दिव्य अशी मिरवणूक करण्यात आली. यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित पत्रकार खानजोडे के अरविंद भोरे के डी पवार दयानंद गायकवाड अनिल काळे विकास मात्रे पत्रकार महेश बोरकर पत्रकार अशोक गव्हाणे संजय वाघमारे कैलास वारुळे पत्रकार कोल्हे संदीप रणखांब सुभाष भांडवले व सर्व मातंग समाजातील समाज बांधव उपस्थित होते.

### जिल्ह्यात पशुगणना सुरु ; नागरिकांनी सहभागी होवून माहिती देण्याचे सहकार्य करावे

**नांदेड**-केंद्र पुरस्कृत पंचवार्षिक २१ वी पशुगणना २५ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत होत आहे. नांदेड जिल्ह्यात या कामासाठी ३०८ प्रगणक व ७९ पर्यवेक्षक यांची नियुक्ती पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आलेली आहे. या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन, पशुधनाची माहिती घेणार आहेत. प्रत्येक गाव व शहरातील प्रगणक नागरिकांशी संवाद साधून माहिती गोळा करणार आहेत. तरी नागरिकांनी या गणनेत सहभागी होऊन योग्य माहिती प्रगणकास देवून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी केले आहे.

# चिकुनगुन्या प्रभावित क्षेत्रास जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली भेट

## प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजनाबाबत केले मार्गदर्शन





**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

देगलूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, मरखेल अंतर्गत पेडपल्ली या गावात २३ नोव्हेंबर २०२४ रोजी चिकनगुनियाचे रुग्ण आढळून आले होते. या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांनी नुकतीच पेडपल्ली या ठिकाणी भेट दिली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष गृहभेटी देऊन, तात्काळ प्रतिबंधात्मक व उपचारात्मक प्रभावी काम कसे करायचे, या बाबतीत आरोग्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश गवाले यांना आवश्यक त्या सूचना केल्या.

तसेच प्रतिबंधासाठी मरखेलचे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. योगिता चामले, आरोग्य सहाय्यक डी. एल. कुलकर्णी, आरोग्य सेवक ए.एस. खांडरे, आरोग्य सेविका श्रीमती येदगिवार या वैद्यकीय पथकाद्वारे गावात रुग्णांवर उपचार केला जात आहे. चिकनगुनिया हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे. तो विशेषतः एडिस इजिप्ती आणि एडिस अल्बोपिक्टस प्रजातींद्वारे पसरतो. हे डास जेव्हा विषाणूने आधीच संक्रमित व्यक्तीला चावतात तेव्हा ते संक्रमित होतात. विषाणू प्राप्त केल्यानंतर, डास त्यांच्या चाव्याव्दारे इतर मानवांमध्ये पसरवू शकतात.

चिकुनगुनियाची लक्षणे साधारणपणे संक्रमित डास चावल्यानंतर ४ ते ८ दिवसांनी सुरू होतात. सामान्य लक्षणांमध्ये अनेकदा अचानक आणि १०२ओऋ (३९ओउ) पर्यंत पोहोचू शकते. सांध्यामध्ये तीव्र वेदना, विशेषत: हात आणि पाय जे अनेक दिवस टिकू शकतात. सामान्यत: स्नायूत वेदना होतात. सौम्य ते गंभीर डोकेदुखी अत्यंत थकवा आढळून येतो.

चिकनगुनियासाठी रक्ताची तपासणी आजाराच्या साधारणतः एक आठवड्यानंतर करतात. अँटिबॉडीची ही तपासणी चिकनगुनिया आहे की नाही हे सांगू शकते. आरोग्य विभागाकडून प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना केल्या जात असून, चिकुनगुनियाला प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी आपल्या घर परिसरात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. दर आठवड्यास शनिवारी कोरडा दिवस पाळावा. घर परिसरात फुटके डब्बे, टाकाऊ टायर्स, कप, मडकी इत्यादीची वेळीच सुयोग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. पाण्याचे साठे झाकणाने घट्ट झाकून ठेवावेत. संडासच्या पाईपला वरच्या टोकाला जाळी किंवा पातळ कपडा बांधावा. तसेच ग्रामपंचायतीने गावातील पाणी साचणारे खड्डे बुजवून घ्यावेत. तुंबलेली नाली व गटारी वाहत्या कराव्यात. चिकुनगुनियाची लक्षणे आढळून आल्यास नजीकच्या आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगिता देशमुख यांनी केले.

# शेतकरी ओळख क्रमांकासाठी संकेतस्थळाची निर्मिती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

भारत सरकारची ग्रीस्टॅक संकल्पना राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संकल्पनेनुसार शेतकऱ्यासाठी तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत. शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी या संकेतस्थळाचा णठङ्ु.ाहषी.रसीळ्रीींरलज्ञ.र्सीं.ळप याचा वापर करता येईल. या संकेतस्थळावर करावयाच्या कार्यवाहीचे सादरीकरण दिले आहे. त्यानुसार या संकेतस्थळाचा वापर करुन नागरिकांनी स्वत:चा शेतकरी ओळख क्रमांक करावा. तसेच शेतकरी ओळख निर्माण करण्याची कार्यवाही मोठया प्रमाणात होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणानी प्रचार व प्रसार करावा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताची आधार संलग्न माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच, भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच या बाबीचा समावेश यामध्ये असणार आहे. शेतकऱ्यांचा माहिती संच निर्माण करण्यासाठी मोहीम स्वरुपात शेतकरी माहिती संच निर्माण करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत भारत सरकारच्या मदतीने महाराष्ट्र राज्याचा शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी स्वयं नोंदणी संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. या संकेतस्थळाद्वारे शेतकऱ्यांना स्वत:चा शेतकरी ओळख क्रमांक निर्माण करता येईल व शेतकरी माहिती संचात समाविष्ट करता येणार आहे.

# नामदार होणाऱ्या उमेदवाराला पराभूत करणाऱ्या कोहळीकरांना नामदार करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २९ नोव्हेंबर**

पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ हदगाव येथील जाहीर सभेत लातूरातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते यांनी आमच्या उमेदवारास आमदार म्हणून मुंबईत पाठवा त्यांना आम्ही लाल दिव्याच्या गाडीत( नामदार करून ) पाठवु असे मतदारांना जाहीर आवाहन केले होते पण मतदार हे त्यांच्या भूलथापांना बळी न पडता महायुतीचे उमेदवार कोहळीकरांना भरघोस मतांनी निवडून दिले असून आता दोन्ही तालुक्यातील मतदारातून नामदार होणाऱ्या उमेदवाराला पराभूत करणाऱ्या कोहळीकरांना नामदार करण्याची हीच योग्य संधी असल्याचे मागणी जोर धरत आहे तरी कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता दोन्ही तालुक्यातील जनतेसाठी अहोरात्र



परिश्रम करणाऱ्या कोहळीकरांना लोकसभेची उमेदवारी चालून आली होती त्याचप्रमाणे नामदार होण्याची संधी आल्यास त्यांच्या रूपाने तालुक्याच्या विकास कामांना नक्कीच वेग येणार असेही या निमित्ताने बोलले जात आहे .

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता संबंध तालुक्यात प्रत्येक गावा-गावात कोणाला कोणत्या बुथवरून किती मतदान झाले. गावाच्या पुढारीने किती आघाडी दिली याचा निष्कर्ष काढण्यात जनता व्यस्त आहेत तरी सर्व समाजातील लोकांनी महायुतीच्या पारड्यात मतदानुरूपी भरभरून आशीर्वाद दिले असा निष्कर्ष आता निघत असताना त्याच वेळी एक चर्चा दोन्ही तालुक्यातील जनतेत मोठ्या प्रमाणावर होत आहे की महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ लातूर येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते यांनी इथल्या उमेदवारांना विजयी केल्यानंतर मुंबईत पाठवा त्यांना आम्ही नामदार करून पाठवू असे जाहीर आव्हान केले होते पण त्यास तालुक्यातील जनतेने सपशेल नाकारून महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून दिले तरी जनता आता अशी मागणी करते की, बाबुराव कदम कोहळीकर यांना न मागताच लोकसभेचे तिकीट भेटले त्याचप्रमाणे मंत्रिमंडळात समावेश व्हावा अशी अपेक्षा मतदार बाळगून आहे तरी नामदार होणाऱ्या उमेदवारास पराभूत करणे म्हणजे ते पण नामदारच आहेत अशी चर्चा देखील या निमित्ताने होत आहे.

# संविधान दिनानिमित्त रॅली



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

संविधान दिनानिमित्त दि.२६ नोव्हेंबर रोजी हि रली महात्मा ज्योतिबा फुले पुतळा पासून ते डा.बाबासाहेब आंबेडकर पर्यंत या रलीची समाप्ती करण्यात आली.सदरिल रलीत डा.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारप्राप्त संस्था अल ईम्रान प्रतिष्ठाणचे सचिव ईजि.ईम्रान खान व संस्थेचे ईतर सदस्य, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण, तरुणी, महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त गिरिष कदम, स.आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी हिरवी झेंडी दाखवून संविधान रलीची सुरुवात केली. समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन उपस्थित नागरिकांकडून करुन घेतले. संविधान घरोघरी व प्रत्येक तरुणाला संविधान कळावे यासाठी संविधानची प्रतिज्ञा घेण्यात आली.सदरिल रलीत समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, चंदा रावळकर, भगवान ढगे, समतादुत शे.ईरशद, दवणे, दुगाने, निरिक्षक मोरे आदिंची उपस्थिती होती.

# मागच्या काळात कधी जातीवाद केला नाही, भविष्यात पण जातीवाद करणार नाही : आ. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. २९ नोव्हेंबर**

मी निवडून आलो हे कार्यकर्त्यांच्या मेहनतीचं फळ आहे या निवडणुकीत जातीपातीचे मोठ्या प्रमाणात राजकारण झाले अनेकांनी जातींची फॅक्टरी चालवली जातीच्या फॅक्टरमध्ये काही जणांना यश ही मिळालं एवढ्या जातीपातीच्या राजकारणात पहीलं कधी निवडणूक झाली नाही कोणी जातिवाद केला तरी मी भविष्यात जातिवाद करणार नाही माझ्यासोबत सर्व जाती धर्माची मंडळी आहेत मी पहिले कधी जातिवाद केला नाही आणि भविष्यातही करणार नाही असे नवनिर्वाचित आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी कंधार शहरातील संपर्क कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना केले.



राष्ट्रवादी आणि महायुतीचे विजयी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी विजयाच्या सर्व शिल्पकारांचे अभिवादन करण्यासाठी आणि त्यांचे आभार मानून आगामी काळातील ध्येय धोरणे ठरविण्यासाठी कंधार शहरात आगमन केले असता शहरात जंगी स्वागत करण्यात आले शहरासह तालुक्यात अनेकांनी फुलांचा वर्षाव तर जेसीबीने मोठ-मोठे हार ढोल ताशांचा गजरात स्वागत करण्यात आले शहरातील बडी दर्गाला चादर चढवून साधू महाराज मठ संस्थानचे दर्शन घेत बौद्ध द्वार येथील आयोजित कार्यक्रमात बुद्ध विहारात उपस्थिती दर्शविली शहरातील सर्व महामानवांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

शहरात मोठी दर्गा येथे चादर चढवून आशीर्वाद घेतला यावेळी जफरोदीन बाहोदीन, समीर चाऊस, शेख आसिफ , शेख मजर, शेख मनू, शेख अमजद यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर साधू महाराज मठ संस्थान येथे मधुकर डांगे, व्यंकट मामडे, बाळू महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत साधु महाराज मठ संस्थान येथे दर्शन घेतले तिथून बुद्ध विहारात आयोजित कार्यक्रमास उपस्थित दर्शविली राजू कोकाटे, हनुमंत डुमणे, सुनील बापूराव कांबळे यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. छत्रपती शिवाजी चौकात स्वप्निल पाटील लुंगारे आणि धनराज लुंगारे यांनी स्वागत केले त्यानंतर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर पिंटू कदम, अनिता कदम, सुनील कांबळे आदींनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले अभिवक्ता संघातर्फे ड .दिगंबर गायकवाड यांनी स्वागत केले त्यानंतर खयूम शेठ, मुजीब सेठ, नगरसेवक बालाजी पवार, चेतन केंद्रे, बालाजी पवार, पैलवान बालाजी पवार, माधव गुंजाळे, दत्तात्रय चंदनफुले, व्यंकट नागलवाड महेश मोरे, कैलास कांबळे विकास कांबळे, मनोज कांबळे, हनुमंत मळगे, उत्तम पाटील जाधव, व्यंकट पाटील जाधव, केशव पाटील जाधव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय कंधार येथे कीशन डफडे, भगवान राठोड, बाळासाहेब गर्जे यांच्या प्रमुख उपस्थितीत जंगी स्वागत करण्यात आले बस स्थानका समोर गंगाधर कांबळे, सुनील कांबळे तर भीमगड येथे मामा गायकवाड यांनी स्वागत केले.

आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे त्यांच्या संपर्क कार्यालयात व्हॉइस ऑफ मीडिया कंधारचे तालुकाध्यक्ष सय्यद हबीब, उपाध्यक्ष मारुती चिलपिपरे सचिव विनोद तोरणे ,कार्याध्यक्ष माधव गोटमवाड , सहसचिव संतोष कांबळे, प्रसिद्धी प्रमुख उमर शेख, ज्येष्ठ पत्रकार दयानंद कदम आदींनी पुष्पहारासह साईबाबा यांची मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला.

# शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर विशेष मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ नोव्हेंबर**

कृषि विभागामार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत अनु. जाती व अनु. जमाती संवर्गाच्या शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर ३० नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजने अंतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या ठिबक व तुषार सिंचनाबाबत तालुकास्तरावर, मंडळस्तरावर व तसेच गावोगावी माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यात अनु. जाती व अनु. जमाती संवर्गातील शेतकऱ्यांसाठी लक्षांक उपलब्ध असून लक्षांका पेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले आहे. तरी जिल्ह्यातील अनु. जाती व अनु. जमातीच्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा व अधिकच्या माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले आहे.

**नगर पंचायत,कार्यालय अर्धापुर ता.अर्धापूर जि.नांदेड**

ई-मेल :- ardhapurcogmail.com फोन नं. (०२४६२) २७२१०९

जा.क्र. अनपं/आस्था/ ४००५/२०२४ दिनांक. २९/११/२०२४

**अर्धापूर नगरपंचायत अर्धापूर जि. नांदेड**

**जाहीर आवाहन २०२४-२०२५**

अर्धापूर नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ७१ / २०१३ मधील दिलेल्या निर्देशानुसार अर्धापूर नगरपंचायत हद्दीतील मुख्य रस्ते व इतर रस्ते यावरील खड्डे, मॅनहोल्स व रस्ते खुदाईबाबतच्या तक्रारी http://mahaulb.in या संकेतस्थळावर नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचेमार्फत विकसित करणेत आलेल्या Integrated Web Based Portal (IWBP) प्रणालीवरील तक्रार मोड्यूलचा वापर करून तसेच ardhapurcogmail.ला व फोन क्रमांक (०२४६२) २७२१०९ व टोल फ्री क्र. १८००२३३२१०९ याव्दारे अर्धापूर नगरपंचायतकडे तक्रार दाखल करता येईल.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपंचायत अर्धापूर जि. नांदेड

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## किलबिल शाळेचा वाद-विवाद स्पर्धेत तृतीय क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २९ नोव्हेंबर-**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त महात्मा फुले विद्यालय अहमदपूर या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




सदरील स्पर्धेमध्ये किलबिल शाळेतील इयत्ता आठवीतील कुमारी शर्वरी बालासाहेब बयास व प्रेरणा माधव लोंढे या विद्यार्थ्यांच्या गटाने ऑनलाइन शिक्षण पद्धती ही शिक्षणास तारक की मारक या विषयावर वाद-विवाद स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून तृतीय क्रमांक मिळवला.

तसेच तुषार बळीराम मुसळे व रुद्राक्ष शिवशंकर होनराव यांनी सहभाग घेतला. त्याबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले प्राचार्य संतोष पाटील उपप्राचार्य धर्मसिंग यांच्या वतीने सदरील विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.



## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. अफसर शेख यांनी स्वीकारला अल्पसंख्याक आयोगाच्या सदस्यत्वाचा पदभार

**औसा, दि. २९ नोव्हेंबर -**

औशाचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे लातूर जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी मुंबई येथील अल्पसंख्यांक आयोगाच्या सदस्यत्वाचा पदभार स्विकारुन कामकाजास सुरुवात केली आहे. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या शासन अधिसुचनेनुसार अल्पसंख्यांक समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा आणि त्यांचे आर्थिक दैनंदिन राहणीमान उंचवावे. यासाठी सामाजिक कार्य करणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांची निवड केली जाते.अल्पसंख्यांक समाजाची आर्थिक उन्नती प्रगती होण्यासाठी औशाचे माजी नगराध्यक्ष डॉ. अफसर शेख यांची महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे. त्यानुसार दि. १४ ऑक्टोंबर रोजी सदस्य, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग सदस्य पदाचा पदभार स्विकारला आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष जावेद शेख आणि फहद अरब होते.



### डॉ. अभय कुलकर्णी यांना राष्ट्रीय चरक पुरस्कार प्रदान

**लातूर, दि. २९ नोव्हेंबर-**

भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत चिकित्सा शास्त्रातील उत्कृष्ट कार्यासाठी दिला जाणारा राष्ट्रीय चरक पुरस्कार (शाखा: मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र) येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र विभागातील सहयोगी प्रा. डॉ. अभय कुलकर्णी यांना नुकताच प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते डॉ. अभय कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. सायोज्यता बांगर हे उपस्थित होते. भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत शाखेतील वेगवेगळ्या विषयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दंत रोग तज्ज्ञांना राष्ट्रीय चरक पुरस्कार दिला जातो. सन २०२४ मधील या पुरस्कारासाठी देशभरातून नामांकन अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र शाखेत डॉ. अभय कुलकर्णी यांनी केलेली रुग्ण सेवा, संशोधन, विविध पुस्तकांचे लेखन, कॉपी राईट व तंबाखु नियंत्रणासाठी केलेले भरीव कार्य लक्षात घेवून हा पुरस्कार त्यांना जाहिर झाला. मुंबई येथील जिओ कन्वेन्शन सेंटर येथे नुकताच पार पडलेल्या सोहळ्यात भारतीय दंत संघटनेचे अध्यक्ष डॉ. रविंद्रनाथ यांच्या हस्ते हा पुरस्कार डॉ. अभय कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्य सचिव डॉ. अशोक ढोबळे, प्रभारी डॉ. दिपक माखीजानी हे उपस्थित होते. या यशाबद्दल डॉ. कुलकर्णी यांचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, विविध विभागाचे प्रमुख यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### शिवनेरी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभागाच्या वतिने भारतीय संविधान व घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ दि २६ नोव्हेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करून सर्व प्रथम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरुण धालगडे यांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले. व संविधान पत्रिकेचे वाचन करून भारतीय संविधान दिन साजरा केला. भारतीय संविधान दिन साजरा करण्याचा उदेश संविधांनाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि डॉ बाबा साहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. याचाच एक भाग म्हणून शिवनेरी महाविद्यालयामध्ये संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन प्रा. हालसे व सर्व विद्यार्थ्यांनी करण्यात आले. यावेळी प्रा . डॉ. धुमाळे डी के राजशास्त्र विभाग प्रमुख यांनी संविधानाचे महत्व विशद करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. धालगडे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### पार्वतीबाई मुळे यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि. २९ नोव्हेंबर-**



दैठणा येथील पार्वतीबाई बापूराव मुळे (वय ९५ वर्षे) यांचे दि. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० च्या दरम्यान राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून त्या जिल्हा परिषद शाळा दैठणा येथील जेष्ठ शिक्षक तथा केंद्रप्रमुख रमेश मुळे यांच्या त्या आई होत.

## उदगीरमध्ये वाहतुकीची कोंडी कायम; पोलिस बघ्याच्या भूमिकेत

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २९ नोव्हेंबर-**

उदगीर येथे महिनाभरात अप्पर जिल्हा पोलिस अधीक्षक यांचे कार्यालय सुरू होणार व उदगीर येथे महिनाभरात स्वतंत्र वाहतुकीची शाखा सुरू करणार या दोन्ही तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी केलेल्या घोषणा आज घडीला हवेतच असताना शहराच्या मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. पालिका प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून आंधळे झाले आहे. तर पोलीस कर्मचारी बघ्याची भूमिका घेत आहेत.उदगीर येथे नव्याने सुरू करण्यात आलेले आर. टी. ओ. कार्यालयही नावालाच असल्याचे दिसून येत आहे.

उदगीर येथे अप्पर जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय सुरू करण्याची घोषणा तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी करून चार वर्षे झाली, तर वाहतूक शाखेची घोषणा करून एक वर्ष झाले तरी या दोन घोषणा आज घडीला हवेतच आहेत. शहरातून गेलेल्या मुख्य रस्त्यावरच वाहतुकीची कोंडी होत असताना पालिका प्रशासनाचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे, तर उदगीरकरांच्या ऐरणीवर असलेला हा प्रश्न नवीन पोलिस निरीक्षक अभिषेक शिंदे यांना आव्हान ठरणारा आहे. शिवाय उदगीर येथे नव्याने सुरू झालेले आर. टी. ओ. कार्यालयही आज घडीला नावालाच असल्याचे दिसून येत आहे.

उदगीर शहराच्या नांदेड-बिदर व देगलूर या दोन रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्त्यावर बसून भाजी विक्रेते भाजीपाल्याची विक्री करतात. दुधीया हनुमान, बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक व तहसील कार्यालय, पोलीस ठाणे ते जय जवान चौकात रस्त्याच्या मध्यभागी थांबणारे हातगाड्या व समोर थांबणारी दुचाकी व चारचाकी वाहने यामुळे या रस्त्यावरून पादचाऱ्यांना चालत जाणे कठीण झाले आहे. तत्कालीन पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी उदगीर शहरातील हा ऐरणीवर असलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी बृहत आराखडा तयार करून ही कोंडी दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले होते. मात्र, त्यांची बदली झाल्यामुळे आता नवीन पोलिस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्यासमोर मोठे आव्हान असणार आहे. बसस्थानकासमोर असलेल्या हातगाड्या व बसेस आत व बाहेर जाण्याच्या



**उदगिरातील या कामामध्ये हस्तक्षेप नको**

छत्रपती शाहू महाराज चौक ते उमा चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नाईक चौकापर्यंत जाण्यासाठी वाहन धारकांना व पादचाऱ्यांना तासनतास जीव मुठीत ठेवून मार्गक्रमण करावे लागते. उदगीर शहरातील दोन्ही रस्त्यांवर वाहने, हातगाडे थांबवून व रस्त्यावर बसून भाजी विक्री करणारे भाजी विक्रेते हे वाहतुकीची कोंडी करतात. यांच्याविरुद्ध कारवाई होत असताना कोणीही हस्तक्षेप करू नये. उदगीर येथे अपर जिल्हा पोलिस अधीक्षक व वाहतुकीची स्वतंत्र शाखा तात्काळ कार्यान्वित करावी. उदगीर येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या आर. टी. ओ. अधिकाऱ्यांनी उदगीरच्या बेशिस्त वाहन धारकांना शिस्त लावावी .अशी मागणी जिव्हाळा ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ मुडपे व अध्यक्ष रमाकांत बनशेळकीकर यांनी केली आहे.

मार्गावर ऑटोचालक थांबून रस्ता बंद करीत असल्यामुळे या ठिकाणी हाणामारीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. उदगिरातील रस्त्यावर वाहतुकीची कोंडी करणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध कार्यवाही करण्याची जबाबदारी पालिका प्रशासनाची आहे.

पालिका प्रशासनाने शहरात सुरू केलेले अतिक्रमण हटाव पथक आता बंद केले आहे. नूतन पोलिस निरीक्षक अभिषेक शिंदे व मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्या समोर हे मोठे आव्हान आहे. यासाठी प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांनी लक्ष घालण्याची गरज आहे.

**पालिकेने अतिक्रमण हटाव मोहीम तात्काळ सुरू करावी**

वाहतुकीची ही कोंडी दूर करण्यासाठी वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी व शहरातील वेगवेगळ्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठका होवून यावर ठोस निर्णय घेण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे तत्कालीन पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी उदगिरच्या वाहतुकीचा ब्रहत आराखडा तयार केला होता. त्यांची बदली झाल्यामुळे हा आराखडा कागदावरच राहिला आहे. या अगोदर नगर परिषेदेच्या वतीने अतिक्रमण हटाव पथक सुरू केले होते. या पथकास शहर पोलिसांचे सहकार्य मिळत असल्यामुळे वाहतुकीला शिस्त लागली होती. मात्र पालिकेने हे अतिक्रमण हटाव पथक बंद केल्यामुळे शहरातील वाहतुकीची समस्या गंभीर बनली आहे.

## औसा विधानसभेच्या निवडणुकीत १७ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २९ नोव्हेंबर-**

औसा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीत एकूण १९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यापैकी मनसे, वंचितसह १७ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले असून वंचित आणि मनसे यांनी हजारावर मते घेतली.तर इतर पंधरा उमेदवारांना हजारांच्या आत नीचांकी मते मिळाली आहेत.व नोटांचा आकडाही पाचशेच्या आतच राहिला आहे.

औसा विधानसभा निवडणुकीत दुसऱ्यांदा आ. अभिमन्यू पवार यांनी जोरदार मुसंडी मारली आहे. गेल्या निवडणुकीतील २६ हजारांच्या मताधिक्याचा विक्रम मोडून ३४ हजार मतांनी विजय मिळविला आहे. या निवडणुकीत एक लाख १५ हजार ५९० मते मिळाली. माजी आमदार दिनकर माने यांना ८२हजार ९२६ मते मिळाली. तिसऱ्या स्थानी शिवाजी कुंभार यांना ४ हजार १२४ मते मिळाली. मनसेचे उमेदवार शिवकुमार नागराळे यांना १ हजार ४२५ मते मिळाली आहेत, अन्य पंधरा उमेदवारांना एक हजारांच्या आतच मते मिळाली आहेत. नोटाला ४९७ मते मिळाली असून मतदारांनी अधिक पसंती न दिल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे मागच्या चार निवडणुकांच्या तुलनेत दिनकर माने हे गावेळी पराभूत झाले असले तरी त्यांच्या मतांचा टक्का वाढला आहे,

या निवडणुकीचा निकाल पाहता दुरंगी लढत पहावयास मिळालीआहे. एकूणच मतदारांनी मतांचा टक्का वाढवला. यात लाडकी बहीण योजना महिला मतदारांना भावली, यामुळे महिला मतांचा टक्काही वाढला आहे. एकूणच १७ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाल्याने या निवडणूकीत मतदारांनी प्रमुख दोन उमेदवारांना समोर ठेवूनच मतदान केले. यात भाजपच्या आ. अभिमन्यू पवार यांनी बाजी मारली आहे. गेल्या चार महिन्यापुर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या मतांची लीड तोडून महायुतीने विजय मिळवला आहे. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत औसा विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना ३४ हजारांहून अधिक मतांची आघाडी मिळाली होती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतील शिवसेनेचे उमेदवार निवडून येतील. अशी खात्री महाविकास आघाडीला होती. त्याचबरोबर राजकीय जाणकारांचा अंदाज होता. मात्र आ. अभिमन्यू पवार यांनी महाविकास आघाडी व जाणकारांचा विश्वास फोल ठरवत ३४ हजारांची आपाडी तोडून ३४ हजारांचे मताधिक्य मिळवीत आघाडीला अस्मान दाखवले, हे विशेष आहे.




## लालबहाद्दूर शास्त्री शाळेत पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २९ नोव्हेंबर-**

लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात, मा. शिक्षण अधिकारी साहेब जिल्हा परिषद लातूर यांच्या सूचनेनुसार दि. २७ नोव्हेंबर बुधवार रोजी लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालयात, अपार आयडी संदर्भात मार्गदर्शन पालक मेळावा उत्साहात झाला.

पालक मेळाव्यासाठी अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे प्रमुख पाहुणे म्हणून माधव केंद्रे, विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी तसेच विशेष उपस्थिती म्हणून शाळेचे पालक खंदाडे मंचावर उपस्थित होते.

पालक मेळाव्याच्या सुरुवातीला विद्येची देवता सरस्वती,तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पालक मेळाव्याचे प्रमुख पाहुणे माधव केंद्रे यांनी अपार आयडी विषयी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात अंकुश मिरगुडे यांनी विद्यार्थ्यांचा शाळेत प्रवेश झाल्यावर कोणकोणत्या पद्धतीने विद्यार्थी राज्यस्तरीय व केंद्रस्तरीय लॉगिनला जोडला जातो हे सांगितले तसेच, पालकांनी विद्यार्थ्यांचा प्रवेश घेतेवेळी अचूक कागदपत्र द्यायला हवीत असे सांगितले. अपार आयडी देशभरातील विद्यार्थ्यांची युनिक ओळख होणार आहे. तो आधार प्रमाणे १२ अंकी युनिक क्रमांक असेल. हा आयडी कोणत्याही विद्यार्थ्यांना नर्सरी, शाळा वा महाविद्यालयात प्रवेश घेताच मिळेल असे अध्यक्ष समारोपात सांगितले.

पालक मेळाव्यासाठी एकूण ८५ पालक बंधू- भगिनींची उपस्थिती होती.

## आ. रमेश कराड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २९ नोव्हेंबर-**

प्रदीर्घ संघर्षानंतर लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात नवे परिवर्तन घडून आले. सर्वसामान्य कार्यकर्त्यांची स्वप्नपूर्ती झाली. या मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार रमेश कराड यांचे अभिनंदन करण्यासाठी त्यांच्या चाहत्यांनी गावा गावातील वाडी वस्तीतील भाजपा कार्यकर्त्यांसह मतदारांनी आ. कराड यांच्या संवाद कार्यालयावर दिवसभर प्रचंड मोठी गर्दी केली.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आल्यापासून गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसचे आमदार निवडून आले. मांजरा परिवारातील साखर कारखान्यांचे जाळे मजबुत असल्याने हा मतदारसंघ देशमुखांच्या नेतृत्वातील काँग्रेसचा बालेकिल्ला असे समजण्यात येत होते. या मतदार संघातील तीन वेळेस झालेल्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या कोणत्याही आमदाराला दुसऱ्यांदा संधी मिळाली नाही हे विशेष. लातूर ग्रामीण मतदार संघातील गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या शेतकरी शेतमजुराच्या हितासाठी न्याय हक्कासाठी सतत भाजपा नेते रमेश कराड आंदोलने केली, मोर्चे काढले देशमुखांची एकाधिकारशाही, हुकुमशाही नष्ट करण्यासाठी संघर्ष केला या लढ्यात गरीब सामान्य कुटुंबातील कार्यकर्ते सक्रियपणे सहभागी झाले त्यांनी प्रत्येक वेळी साथ दिली. मागील दोन वेळा विधानसभा निवडणुकीत पराभव पत्करूनही कधीच खचून न जाता सातत्याने सर्व सामान्याचे हितासाठी कार्यरत राहिल्याने आ. रमेश कराड यांच्यावर जनतेचा विश्वास मजबूत झाला आणि त्यातूनच महायुतीचा विजय होऊ शकला. रमेश कराड जनतेच्या मतातून निवडून यावेत त्यांनी विधानसभा सभागृहात काम करावे ही सर्वसामान्यांची अनेक वर्षांची इच्छा या निवडणुकीत पूर्ण झाली. मीच विजयी होणार माझे आप्पा आमदार होणार या भावनेतून प्रत्येक जण मोठ्या जिद्दीने निवडणुकीच्या काळात कार्यकर्ता काम करत होता.



गेल्या पाच वर्षात काँग्रेसच्या आमदार महोदयांनी जनतेला दिलेली कुठलीच आश्वासने पूर्ण केली नाहीत. कुठल्या गावाला कोणती योजना आणली, काय काम केले हेही सांगू शकले नाहीत. एवढेच काय तर जनतेला भेटत नाहीत. कुणाच्या अडीअडचणी सोडवत नाहीत हेच कारण काँग्रेसला पराभवाकडे घेऊन गेले. उलट रमेशआप्पांचे काम पाहून पक्षश्रेष्टीने त्यांना आमदार म्हणून विधान परिषदेवर काम करण्याची संधी दिली मिळालेल्या संधीच्या माध्यमातून गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे आणि ग्रामीण भागातील गावागावात वाडी वस्ती वीज, विकास कामांना कोट्यावधीचा निधी मिळून दिला. मिळालेल्या संधीचं सोनं करून दाखवलं. भाजपाचे नेते रमेश कराड लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून निवडून यावेत यासाठी वर्षानुवर्ष संघर्ष आणि प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्याच्या मेहनतीला यश आले आहे निवडणुकीचा निकाल जाहीर होताच मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत कार्यकर्त्यांसह मतदारांनी मोठा आनंद उत्सव साजरा केला. आपले आप्पा आमदार झाले ही भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होती. नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड हे निवडणूक निकालानंतर मुंबईला जाऊन आले. त्यानंतर काल आणि आज भाजपाच्या संवाद कार्यालयात हितचिंतकाबरोबरच भाजपासह महायुतीतील कार्यकर्त्यांनी मतदार बंधू-भगिनींनी आप्पांचा यथोचित सत्कार करून पेढे भरवून प्रत्येक जण त्यांचे अभिनंदन करीत होते. दिवसभर अभिनंदन करणाऱ्यांची आणि शुभेच्छा देणाऱ्यांची प्रचंड गर्दी झाली होती. आपल्या हक्काचा माणूस आमदार झाल्याची भावना प्रत्येकातून व्यक्त केली जात होती. यावेळी नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांना आमच्या गावी या आम्हाला वेळ द्या सत्कार करायचा आहे असे अनेकजण बोलून दाखवत होते. येणाऱ्या काळात मतदार बंधू भगिनींचे माझ्या लाडक्या बहिणीचे आभार व्यक्त करण्यासाठी मतदार संघातील प्रत्येक गावागावात येणार आहे असे त्यांनी बोलून दाखविले.



## प्रा. बालाजी सूर्यवंशी यांना उत्कृष्ट रासेयो कार्यक्रमाधिकारी पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. बालाजी पांडुरंग सूर्यवंशी यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. तसे पत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या आदेशान्वये राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी दिले.

प्राध्यापक सूर्यवंशी यांनी वृक्ष दान दत्तक अभियानाच्या माध्यमातून अनेक गावांमध्ये वृक्षारोपणाचे कार्य केले आहे. महाविद्यालयाच्या वतीने दत्तक घेण्यात आलेल्या मौजे बामणी येथील वृक्षारोपण कार्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे. यासोबतच अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान, ग्रामसर्वे, जल नियोजन, मतदार जनजागरण, बौद्धिक व्याख्याने व विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केलेले आहे या पुरस्काराबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, सचिव पांडुरंगराव शिंदे, उपाध्यक्ष माधवराव पाटील व सर्व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

## माजी सरपंच पंडितराव भुरे-पाटील यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २९ नोव्हेंबर-**



येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा किनी कदुचे गावचे माजी सरपंच पंडितराव माणिकराव भुरे-पाटील यांचे अल्पशा आजाराने दि. २८ रोजी गुरुवारी सांयकाळी सात वाजता वयाच्या ७२ व्या वर्षी अहमदपूर येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सूना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे.